मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद
नियतकालिक
(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर पौष–चैत्र १९४१

जाने.–मार्च २०२० / खंड ४३, अंक ४

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना

# ८ मार्च

# आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा




शुभेच्छुक

**प्रा. डॉ. रामदास यशवंतराव माहोरे**

अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जाने.-फेब्रु.-मार्च २०२०/ खंड ४३ / अंक ४

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. राहुल शं. म्होपरे :
संपादकीय ........ २९७

२. तेजस्विनी बाजीराव मुडेकर :
केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ : शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण योजनांवर दृष्टिक्षेप ........ २९९

३. मंजुषा मुसमाडे :
स्थलांतराचे अर्थशास्त्र ........ ३०५

४. सुनीती नागपूरकर
प्रादेशिक असमतोल आणि भारताची बदलती संघराज्य व्यवस्था ........ ३१७

५. अमृता सूर्यवंशी
भारतीय अर्थव्यवस्था - मंदीच्या उंबरठ्यावर ? ........ ३३२

६. सीमा विश्वनाथ भोसले
अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक स्थिती ........ ३३८

७. प्रतिभा एस. काळमेघ
महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार.... ३४५

८. शोभा आर. पाटील
स्त्री-पुरुष समानता - काळाची गरज ........ ३५३

९. युगंधरा एस. टोपरे
लिंगभावसापेक्ष अर्थसंकल्प (जेंडर बजेट) : भारतातील उपयोजन आणि आढावा ........ ३६०

१०. नीता सुधाकर वाणी
महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या : एक चिंतन ........ ३६७

११. जयश्री दिलीप सरोदे
महिलांचे स्वावलंबन आणि स्त्री उद्योजकता ........ ३७४

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

**रामदास यशवंतराव माहोरे (नागपूर)**

- **कार्याध्यक्ष**

**कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

**रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

**राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

**जगन्नाथ पाटील (सातारा)**
**आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
**रामकृष्ण टाले (नागपूर)**

- **सदस्य**

**महादेव पाटील (मिरज-सांगली)**
**संतोष कदम (सोलापूर)**
**सुभाष पाटील (पुणे)**
**विनोद गावंडे (अमरावती)**
**अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
**मारोती तेगमपुरे (अंबड)**
**विजय भोपाळे (नांदेड)**
**स्नेहा देशपांडे (नागपुर)**
**बळवंत कोरे (कराड)**
**गणेश मांगडे (दापोली)**
**माधव शिंदे (अहमदनगर)**

- **स्वीकृत सदस्य**

**सुरेश भास्कर ढाके (भुसावळ)**
**शिवाजी कारभारी ढगे (पिंपळगाव पिसा)**

- **स्थानिक कार्यवाह**

**प्रितम प्रवीन कोठारी (सोलापूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
इमारत निधी : रु.२०००/-
सदस्य सूची : रु. १००/-
एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

शैक्षणिक संस्था : रु.२०००/-(त्रैवार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु.२०००/-(त्रैवार्षिक)
ग्रंथालये : रु.३०००/- (पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवून त्याची माहिती पोस्टाद्वारे संपादकांना पाठवावी.
- मनीऑर्डर व **वार्षिक वर्गणी** स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

संपूर्ण जगात शंभर पेक्षाअधिक वर्षांपासून महिला विकास आणि समानतेचे प्रतीक म्हणून ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून पाळला जातो. वर्ष २०२० साठी संयुक्त राष्ट्रसंघाने या दिवसासाठीची थीम (विशेषता) ''I am Generation Equality : Realizing Women's Rights'' अशी घोषित केलेली आहे.

८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिनासाठी का निवडला गेला याला विशिष्ट इतिहास आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत संपूर्ण जगात महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. या अन्यायाविरुद्ध त्या काळात महिला मोठा संघर्ष करीत होत्या. महिला मतदान हक्काचा लढा देण्यासाठी १९०७ साली स्टुडगार्डमध्ये पहिली 'आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद' भरवण्यात आली. अमेरिकेत मतदान हक्काच्या लढ्यासाठी 'दी नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोशिएशन' स्थापन करण्यात आली. परंतु ही असोशिएशन देखील वर्णद्वेशी आणि स्थलांतरितांकरिता पूर्वगृही स्वरूपाची होती. ८ मार्च, १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये हजारो महिला कामगारांनी यासाठी ऐतिहासिक निदर्शने केली आणि दहा तासांचा कामाचा दिवस, सुरक्षितता, लिंग, वर्ण, संपत्ती, शिक्षण, मतदानाचा हक्क अशा मागण्या या सर्व महिलांनी निदर्शनाद्वारे केल्या. पुढे वर्ष १९१८ मध्ये इंग्लंडने तर १९१९ मध्ये अमेरिकेने महिलांच्या या मागण्या मान्य केल्या. तोपर्यंत सर्व महिलांनी आपला लढा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या चालूच ठेवला होता. त्यामुळे तेथून पुढील काळात ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभरात महिला दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळात ८ मार्च १९४३ साली मुंबई येथे पहिला महिला दिन साजरा झाला.

सर्व वाचकवर्ग जाणतोच, मागील ४३ वर्षे अखंडितपणे अर्थसंवादच्या माध्यमातून मराठी अर्थशास्त्र परिषद, मराठी लेखकांचे आर्थिक प्रश्नांवरील दर्जेदार लेखन देशभर पोचवित आहे. परिषदेने अर्थसंवादच्या संपादक पदाची जबाबदारी माझ्याकडे सुपुर्द केल्यानंतर मी या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न मी वरिष्ठ तसेच सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वतोपरी करीत आहे. संपादक या नात्याने मी मागील तीन वर्षात दोन विशेषांक काढले असून आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून आपल्या सर्वांच्या हाती हा तिसरा महिला विशेषांक सुपुर्द करीत आहे. अर्थसंवादच्या मागील ४३ वर्षाच्या इतिहासातील हे तीनही विशेषांक (पहिला अंक - माजी अध्यक्षांचा विशेषांक, दुसरा अंक - महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुखांचा विशेषांक आणि तिसरा अंक महाराष्ट्राच्या विविध विभागांतील महिलांचा विशेषांक) नावीन्यपूर्ण आणि वेगळी वाट चोखाळणारे आहेत असे मला मनापासून वाटते.

प्रस्तुत महिला विशेषांकासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतील निवडक १० महिलांनी

संशोधनपर लेखन केलेले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या महिला सदस्यांबरोबरच दोन विशेष महिला लेखिकेंच्या निमंत्रित लेखांचा या अंकामध्ये समावेश केलेला आहे. महाराष्ट्रातील अर्थशास्त्राशी संबंधित महिला लेखिकांचे दर्जेदार लेखन संपूर्ण देशभर अर्थसंवादच्या माध्यमातून जावे यासाठी अंकरूपी हा छोटासा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत अंकातील पहिला लेख तेजस्विनी मुडेकर यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ वर आधारित लिहिलेला असून यामध्ये त्यांनी अर्थसंकल्पातील शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण योजनांवर प्रकाश टाकून अत्यंत सुंदर आणि चिकित्सक पद्धतीने या सर्व पैलूंवर भाष्य केलेले आहे. अर्थसंवादच्या नियमित लेखिका मंजुषा मुसमाडे यांनी स्थलांतराच्या अर्थशास्त्रावर आधारित आपल्या लेखाची सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण मांडणी केलेली आहे. सुनिती नागपूरकर यांनी आपल्या लेखाद्वारे प्रादेशिक असमतोल आणि भारताची बदलती संघराज्य व्यवस्था या वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयावर सांख्यिकीय माहितीचा आधार घेऊन परिपूर्ण भाष्य केलेले आहे. अमृता सुर्यवंशी व प्रतिभा काळमेघ यांनी आपल्या लेखाद्वारे महिला सक्षमीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना उजाळा दिलेला आहे. शोभा पाटील यांनी आपल्या लेखाद्वारे स्त्री-पुरुष समानता ही काळाची गरज असल्याचे भक्कम पुराव्यांनीशी चांगल्या पद्धतीने प्रतिपादन केलेले आहे. युगंधरा टोपरे यांनी जेंडर बजेटवर आधारित भारतातील उपयोजन आणि आढावा सांख्यिकीय माहितीच्या परिणामकारक मांडणीद्वारे घेतलेला दिसून येतो. प्रस्तुत लेखातील संशोधिकेचे निष्कर्ष निश्चितच दिशादर्शक आहेत. नीता वाणी यांनी आपल्या लेखाद्वारे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न वाचकांसमोर अद्ययावत सांख्यिकीच्या आधारे चांगल्या पद्धतीने ठेवला आहे. जयश्री सरोदे यांनी महिलांचे स्वावलंबन आणि स्त्री उद्योजकता याबाबतचे सुंदर विश्लेषण आपल्या संशोधनपर लेखाद्वारे उंबरठ्यावरील भारतीय अर्थव्यवस्थेचे विश्लेषण अत्यंत देखण्या पद्धतीने केले आहे. जयश्री सरोदे यांनी आपला लेख सखोल संशोधनावर आधारित लेखन केल्याचे दिसून येते.

प्रस्तुत अंकाच्या संपादनाचे काम जरी मी केले असले तरी या अंकासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील निवडक महिला लेखिका निवडण्यासाठी मला परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिल सूर्यवंशी, आर. बी, भांडवलकर, प्रमोद लोणारकर, भरत सोलापुरे, संतोष कदम, अशोक खाचणे इ. मंडळींनी सर्वतोपरी मदत केलेली आहे, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. याबरोबरच हा अंक काढण्यासाठी मला परिषदेचे विद्यमान अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह, माजी अध्यक्ष आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य यांनी देखील मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल संपादक या नात्याने मी त्यांचे आभार मानतो. सरतेशेवटी एवढेच सांगू इच्छितो, प्रस्तुत अंकातील चांगले असेल ते तज्ज्ञांचे असून उणिवा या संपादक या नात्याने पूर्णतः माझ्या आहेत. सदर उणिवा आपण माझ्या निदर्शनास आणून दिल्यास मला आनंद तर होईलच परंतु सुधारण्यास देखील संधी मिळेल.

**- राहुल शं. म्होपरे**

# केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ : शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण योजनांवर दृष्टिक्षेप

**तेजस्विनी बाजीराव मुडेकर**[†]

**प्रस्तावना**

भारत हा एक खंडप्राय देश आहे. या खंडप्राय देशाच्या पुढील वार्षिक आर्थिक उलाढालींचा लेखाजोखा मांडणे ही नेहमीच तारेवरची कसरत असते. जागतिक स्तरावर असलेल्या मंदीतून एकटा भारत देश हा बाहेर राहू शकत नाही. देशात आर्थिक मंदीचे मळभ तर आहेच. आर्थिक वृद्धिदर हा ४.५ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. पण जागतिक स्तरावरील सध्याच्या आढाव्यावरून भारत हा मंदीतून सावरत असल्याचीही चिन्हे आहेत. अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी सरकारी खर्चात वाढ, पायाभूत सोयी-सुविधांचा विकास आणि जनतेच्या हातात पैसा जाण्याचे म्हणजेच त्यांची क्रयशक्ती वाढविण्याचे विविध मार्ग शोधणे या अपेक्षांचे ओझे अर्थसंकल्पाची मांडणी करताना होते. कल्याणकारी सरकारला शेती विकास, उद्योगांना चालना याबरोबरच सामाजिक पायाभूत सोयी-सुविधांकडेही विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. यात शिक्षण, आरोग्य, महिलांच्या विकासासाठी तरतुदी ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सोयी, सामाजिक न्याय या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

**शिक्षण क्षेत्रासाठी तरतूद व योजना**

''देशातील तरुण पिढी देशाचे राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशाप्रकारे त्यास शिक्षण देणे हे देशातील विद्याखात्याचे कर्तव्य आहे'' (केसरी अग्रलेख, १९०६ अंक ४७).

भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील मोठ्या शिक्षण व्यवस्थेमध्ये गणली जाते. देशात एकूण ९२० विद्यापीठे, १२६ अभिमत विद्यापीठे, ५० केंद्रीय विद्यापीठे, ३४० खाजगी विद्यापीठे, ५१,६४९ कॉलेज, ८,४०,५४६ प्राथमिक शाळा, ४,२९,६२४ उच्च प्राथमिक शाळा, १,३९,५३९ माध्यमिक शाळा, १,१२,६३७ उच्च माध्यमिक शाळा आहेत. एकूण २४,७८,५३,६८८ विद्यार्थी शालेय शिक्षण घेत आहेत. ९४,१६,८९५ शिक्षकांद्वारे शिक्षण प्रसाराचे पवित्र कार्य केले जाते. एवढ्या मोठ्या शिक्षण व्यवस्थेच्या विकासासाठी घटनेमध्ये ८ टक्के खर्च करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रावरील खर्च ९४,८५४ कोटी रुपये होता. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात तो

[†] प्राचार्या, कमला कॉलेज, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. : ६१७, भ्रमणध्वनी : ९६०४३४३४००, ई-मेल : tbmudekar@gmail.com

९९,३०० कोटी करण्याचे निश्चित केले आहे. याचा अर्थ ही वाढ साधारण साडेचार हजार कोटींच्या आसपास आहे. चलनवाढीचा विचार करता ही 'वाढ' आहे असे म्हणता येणार नाही. तरीही ही केलेली तरतूद काही नव्या शैक्षणिक योजनांसाठी खर्च केली जाणार आहे. सरकारद्वारे नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले जाणार आहे. या शैक्षणिक धोरणावर सुधारणेसंबंधीच्या २ लाख सूचना आल्या आहेत. त्या सूचनांचा विचार करून योग्य शैक्षणिक धोरण अवलंबिले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करू. देशात डॉक्टरांची संख्या अपुरी आहे ती वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा रुग्णालयातून वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची योजना प्रस्तावित आहे. देशातील इंजिनिअरिंग शिक्षणाची वाताहत आहे हे लक्षात घेऊन मेडिकल कौन्सिलच्या धरतीवरती इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांना शहरी स्थानिक बोर्डामध्ये एक वर्षापर्यंत इंटर्नशिप उपलब्ध करून दिली जाणार आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या पदरी अनुभव येईल. समाजातील वंचित घटक यांना उच्च शिक्षण घेण्याची आस आहे; पण सुविधा उपलब्ध नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी पूर्णवेळ ऑनलाईन पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारीतील पहिल्या १०० क्रमांकावर असलेल्या अशा आघाडीच्या शैक्षणिक संस्थांमधून हा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात यातील काही शैक्षणिक संस्थांवर ही जबाबदारी सोपविली जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या कोर्समधील वंचित घटकांचा सहभाग, मिळालेल्या प्रमाणपत्राची इतर शिक्षणासाठी स्वीकारार्हता, ऑनलाईन शिक्षण पद्धतीतील अडथळे या सर्वांचा विचार करता या योजनेच्या यशस्वितेसाठी सरकारला फार मोठे आव्हान स्वीकारावे लागणार आहे. 'स्टडी इन इंडिया' हे नवीन मिशन आहे. यात भारतात शिकण्यास उत्सुक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इंड-सॅट ही परीक्षा घेतली जाणार आहे. त्यायोगे मुख्यत: आशियाई व आफ्रिकन देशांमधील विद्यार्थी भारतात शिष्यवृत्तीसह शिक्षण घेऊ शकतील. दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण क्षेत्रास विदेशी प्रत्यक्ष थेट गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली आहे. तसे परदेशी संस्थांना निधीसाठीही प्रोत्साहन दिले जाणार आहे. कारण गुणवंत शिक्षक या क्षेत्रात आकर्षित होणे गरजेचे आहे. तसेच संशोधन व चांगल्या प्रयोगशाळा बांधणीसाठी मोठ्या प्रमाणात पैसा शिक्षण क्षेत्रात येणे गरजेचे आहे. २०३० पर्यंत जगातील सर्वाधिक कार्यप्रवण मनुष्यबळ भारतात असणार आहे तेव्हा ते शिक्षित जगातील कौशल्याधारित असणे गरजेचे आहे त्यामुळे 'स्किल इंडिया'साठी ३००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. साधारण श्रेणीतील विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी १५० उच्च शैक्षणिक संस्था उमेदवारीशी निगडित पदवी किंवा पदविका अभ्यासक्रम मार्च २०२१ पर्यंत सुरू केले जाणार आहेत. संरक्षण व्यवस्थेतील अधिक कर्मचाऱ्यांची गरज लक्षात घेऊन 'नॅशनल पोलीस युनिव्हर्सिटी' स्थापन करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात मांडला आहे. भारताला उच्च शिक्षणाचा हब बनविण्याचे स्वप्न या अर्थसंकल्पात पाहिले आहे. शिक्षण तसेच इतर क्षेत्रात भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात खूप संधी आहेत. तशी मागणीही आहे; परंतु भाषेची अडचण आणि त्यांच्या गरजांना सुसंगत नसणे प्रामुख्याने या दोन कारणांमुळे आपले विद्यार्थी या संधीचा लाभ घेऊ शकत नाहीत. ही उणीव भरून काढण्यासाठी ब्रीज कोर्सेस सुरू केले जाणार आहेत. ब्रीज कोर्सेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्याचा

प्रयत्न केला जाणार आहे.

परदेशांमधून ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यांना शुश्रूषेची गरज भासते. या क्षेत्रात भारतीय युवा वर्गाला मोठी संधी आहे. त्या स्वरूपाचे प्रशिक्षण आपल्याकडे दिले जात नाही. या स्वरूपाच्या ब्रीज कोर्समुळे या संधीचा युवावर्ग लाभ उठवू शकेल.

आय.आय.एम. व आय.आय.टी.च्या धर्तीवर लिबलर आर्ट विद्यापीठे स्थापन केली जाणार आहेत. ४०० कोटी रुपयांची तरतूद जागतिक दर्जाच्या शिक्षण संस्था निर्माण करण्यासाठी केली आहे. रोजगाराची मागणी व पुरवठा याचा समन्वय साधण्यासाठी राष्ट्रीय रोजगार एजन्सी स्थापन केली जाणार आहे. अराजपत्रित सरकारी नोकऱ्यांसाठी आता एकच राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय न्यायिक विज्ञान विद्यापीठाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. एकूणच कौशल्याधारित रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करून कुशल मनुष्यबळ निर्मितीचा निर्धार असून काळाची गरज ओळखून रोजगारक्षम युवक-युवती तयार केले जाणार आहेत. १ कोटी विद्यार्थ्यांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्याचा मानस आहे.

**आरोग्य क्षेत्रासाठी तरतूद व योजना**

केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी ६९,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पात ही तरतूद ६२,६५९ कोटी रुपयांची होती. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील ही वाढ १० टक्क्यांची आहे. भाववाढीचा दर पाहाता ही वाढ अपुरी आहे. जी.डी.पी.च्या केवळ २% ही तरतूद आहे. आरोग्यविषयक जुन्या योजनांना निधी व काही नवीन योजना, संकल्प या अर्थसंकल्पात केलेले दिसतात. मागील पंचवीस वर्षात आपण पोलिओमुक्त झालो पण गेल्या काही वर्षात क्षयरोगाचे रुग्ण वाढलेले आहेत. क्षयरोगावर अजूनही मात करता आलेली नाही. क्षयरोगाने दरवर्षी ४ लाख ४८ हजार भारतीयांचा मृत्यू होतो तर दरदिवशी १४०० हून अधिक जण मृत्यूमुखी पडतात. २०२५ पर्यंत क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे अर्थसंकल्पात म्हटले आहे. 'टी.बी.हरेगा, भारत जितेगा' या नावाने हे अभियान चालवले जाणार आहे. याचा गरीब घटकातील लोकांना लाभ होईल. सर्वसामान्यांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यावर सरकारचा भर असल्याचे अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या विविध योजनांवरून दिसून येते. पंतप्रधान जनआरोग्य योजनेसाठी ६४०० कोटी रुपयांची तरतूद केली असून या योजनेअंतर्गत सध्या २० हजारांहून अधिक रुग्णालये आहेत. त्यात वाढ केली जाणार असून तेथे 'आयुष्यमान भारत योजने'च्या लाभार्थ्यांवर उपचार केले जातील असे जाहीर करण्यात आले आहे. द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या ज्या शहरांमध्ये आयुष्यमान यादीतील रुग्णालयांचा समावेश नाही त्यांचा समावेश केला जाणार आहे. 'मिशन इंद्रधनुष्य' या योजनेचा आवाका वाढविण्यात आला असून त्यात १२ आजारांचा नव्याने समावेश केलेला आहे. त्याशिवाय पाच नवीन लसीकरणांचा समावेश आहे. सर्वसामान्य जनतेला स्वस्त दराने औषधांचा पुरवठा व्हावा या उद्देशाने देशातील प्रत्येक जिल्ह्यात २०२४ पर्यंत 'जन औषधी केंद्र' उभारण्याचा संकल्प सरकारने या अर्थसंकल्पात केला आहे. त्या केंद्रामध्ये दोन हजार औषधे आणि तीन हजार सर्जिकल्स उपलब्ध होतील, असे आश्वासन सरकारने दिले आहे. वैद्यकीय उपकरणांच्या माध्यमातून कररूपाने मिळणारा पैसा रुग्णालयांच्या बांधकामासाठी वापरला जाणार आहे. त्यामुळे रुग्णालयांची संख्या वाढण्यास मदत होईल.

कररूपाने मिळणाऱ्या पैशाचा योग्य विनियोग होण्यास मदत होईल. त्या निमित्ताने आरोग्य क्षेत्राला बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतातील अनेक आजारांचे कारण अस्वच्छता हे आहे. त्यामुळे अस्वच्छतेस दूर लोटण्यासाठी 'स्वच्छ भारत' अभियानासाठी १२,३०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 'स्वच्छ भारत मोहीम' ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. यासाठी सन २०१८-१९ मध्ये १९,४२७ कोटी रुपये, सन २०१९-२० मध्ये १२,६४४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मागील दोन वर्षांच्या तुलनेत या वर्षीच्या अर्थसंकल्पातील तरतूद थोडी कमी केल्याचे दिसते. ग्रामीण व शहरी भागात ही योजना परिणामकारक पद्धतीने राबविण्यावर भर देण्यात आला आहे. उघड्यावर शौचास बसण्यापासून जनतेला परावृत्त करण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील, असे अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात नमूद केले.

देशातील ५,६६,२४८ गावांमध्ये (९४.५%) उघड्यावर शौचास केली जात नसल्याचे केंद्राने यापूर्वीच घोषित केले आहे. परंतु पुन्हा वास्तव तपासून पाहण्याची गरज भासते. ग्रामीण भागात मैला व्यवस्थापन आणि पाण्याच्या पुनर्वापरावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यामध्ये नव्या तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ड्रेनेज स्वच्छतेसाठी कुठल्याही व्यक्तीला प्रत्यक्ष ड्रेनेजमध्ये उतरून काम करावे लागणार नाही. कचऱ्यापासून ऊर्जानिर्मितीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्याचा निर्धार अर्थमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि दूषित पाण्याचे व्यवस्थापन हे एक मोठे आव्हान सरकार समोर आहे. नळाद्वारे स्वच्छ पाणी पुरवठ्यासाठी ३.०६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**महिला व बालविकासावरील तरतूद व योजना**

महिला आणि बालकल्याण मंत्रालयासाठी मागील अर्थसंकल्पात २६,१८४ कोटी ५० लाख रुपयांची तरतूद होती. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात ती १४ टक्क्यांनी वाढवून ३०,००७ कोटी १० लाख रुपये इतकी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांनी बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणेसाठी महत्त्वाचे योगदान दिले असून या अर्थसंकल्पात बचत गटांसाठी विशेष योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. शेतीमालाचा योग्य साठा करण्यासाठी गोदामांच्या उभारणीसाठी महिला बचत गटांना प्रोत्साहित करून नाबार्ड आणि मुद्रा योजनेतून कर्जपुरवठा करण्यात येणार आहे. तसेच महिला व बालविकासाच्या काही योजना खालीलप्रमाणे -

- **पंतप्रधान मातृवंदना योजना**

पंतप्रधान मातृवंदना योजनेला २५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या योजनेनुसार गरोदर महिलांना प्रतिमहा ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. तसेच प्रसुतीकालीन लाभ व बाल सुरक्षेचाही विचार केला आहे.

- **कृतिदलाची स्थापना**

महिला कल्याण योजनांसाठी २८६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुलींचे लग्नाचे वय पूर्वी १५ वर्षे होते. सध्या ते १८ वर्षे आहे. परंतु मुलींचे शारीरिक पोषण होणे गरजेचे आहे. तसेच सध्या मुलींच्या शिक्षणाचे प्रमाणही वाढले आहे. १८ वर्षे लग्नाचे वय असल्याने अनेक वेळेस मुलींचे विवाह त्या वयात केले जातात. त्यामुळे इच्छा असूनही मुलींना शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागते आणि तिच्यावर मातृत्व लादले जाते. त्यामुळे या

अर्थसंकल्पात मुलीचे विवाहाचे वय निश्चित करण्यासाठी कृती दलाची स्थापना करण्यात येईल, त्याचा अहवाल सहा महिन्यात येईल, त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल असे सुतोवाच अर्थमंत्र्यांनी केले. तसेच आई होण्यासाठीही वयोमर्यादा निश्चित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दिली. हे दोन्ही निर्णय महिला विकासाच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह असे आहेत.

**● राष्ट्रीय बालसंगोपन कार्यक्रम**

एकिकृत बालविकास विभागाच्या अंतर्गत बाल सुरक्षा सेवा कार्यक्रमाला १५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. राष्ट्रीय बालसंगोपन योजनेसाठी ७५ कोटी रुपयांची तरतूद आहे. नोकरदार महिलांना बाल संगोपनाची काळजी वाटू नये यासाठी महानगरात ही योजना राबविण्यात आली आहे.

**● वन स्टॉप सेंटर**

लैंगिक अत्याचार तसेच अन्य हिंसाचारास बळी पडलेल्या महिलांना एकाच छतासाठी वैद्यकीय मदत, पोलीस सहाय्य, कायदेविषयक सल्ला आणि मनो-सामाजिक समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन केले जाते. या योजनेवरील तरतूद २०४ कोटी रुपयांवरून ३८५ कोटी रुपये इतकी वाढविण्यात आली आहे. यामुळे अशा अत्याचारग्रस्त महिलांना दिलासा मिळणार आहे.

**● बेटी बचाव, बेटी पढाव**

मुलींचे घटते प्रमाण सावरणे व तिला शिक्षण प्रवाहात आणणे या उद्देशाने सरकारने राबविलेली ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. यासाठी २२० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्याचा परिणाम आता दिसू लागला असून शिक्षणातील मुलींची टक्केवारी वाढत आहे. त्या संदर्भात अर्थमंत्र्यांनी कौतुकोद्गार काढले. प्राथमिक शिक्षणात मुलींचे प्रमाण ९४.३२% तर मुलांचे ८९% आहे. माध्यमिक शिक्षणात मुली ८१.२% तर मुले ७८% आहेत. उच्च शिक्षणात मुली ५९% तर मुले ५७.७४% आहेत. मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना हाती घेतल्याचे हे फळ आहे.

**● वसतिगृहाची निर्मिती**

नोकरदार महिलांची राहण्याची सोय करण्याच्या उद्देशाने वसतिगृह योजना हाती घेण्यात आली असून त्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच उज्ज्वला योजनेचा हेतू महिलांची तस्करी रोखून त्यांचा बचाव करण्याचा आहे. या योजनेसाठी ३० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे.

**● कुपोषित बालकांना बळ**

या अर्थसंकल्पात पोषण संबंधित कार्यक्रमांसाठी ३५,६०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. कुपोषणावर मात करण्याचे लक्ष्य सरकारने समोर ठेवले आहे. ०.६ वयोगटात सध्या ३८.४% कुपोषित बालके आहेत. हे कुपोषण २०२२ पर्यंत २५ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट सरकारचे आहे. राष्ट्रीय पोषण अभियानासाठी अर्थसंकल्पात ३७०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ६ लाखांहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांना स्मार्टफोन देण्यात आले आहेत.

**निष्कर्ष**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ मध्ये शिक्षण व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्याचे योजले आहे. रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षण घेत असतानाच कोणते ना कोणते कौशल्य आत्मसात करून युवा-पिढी बाहेर पडेल की जी केवळ नोकरीची अपेक्षा न करता स्वयंरोजगार निर्माण करू शकेल. इतकी सुंदर स्वप्ने रंगविताना शिक्षण क्षेत्राला अर्थसंकल्पात निधीची तरतूद मात्र

अपुरी वाटते. या अर्थसंकल्पात आरोग्यपूर्ण भारताच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. जनसामान्यांचा विचार केला जात आहे. पंतप्रधान जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजना राबविताना रुग्णांवर अन्याय होऊन रुग्णालये तर संपन्न होत नाहीत ना या बाबींची चाचपणी होणे अत्यंत आवश्यक आहे. आरोग्य क्षेत्रासाठी केलेली तरतूदही पुरेशी नाही. महिला व बालकल्याणावरील तरतुदीत १४ टक्क्यांनी केलेली वाढ स्वागतार्ह आहे. मुलींचे आरोग्य, शिक्षण या बाबी विचारात घेऊन लग्नाची व मातृत्वासंबंधीच्या वयाबाबतचा पुनर्विचार ही बाब अतिशय स्तुत्य अशी आहे.

**संदर्भ सूची :**


- **संकेत स्थळे**

१. www.indiabudget.gov.in

२. www.thehindu.com

३. prsindia.org/parliamenttrack/budgets/union-budget-2020-analysis.

- **सर्वेक्षण**

१. Economic Survey of India : 2019-20.

- **इतर**

१. Budget Speech of Finance Minister - Nirmala Sitaram.

२. Business Standard, Sunday Times, Indian Express. (02 Feb. 2020)

- **वृत्तपत्रे**

दै.पुढारी, दै.तरुण भारत, दै.सकाळ, दै.पुण्यनगरी, दै.लोकसत्ता, दै.लोकमत- विविध तज्ज्ञांचे लेख (दि.२ फेब्रुवारी २०२०).


◆

---

जेव्हा एक पुरुष शिकतो तेव्हा तो एकटाच सुशिक्षित होतो; मात्र जेव्हा एखादी महिला शिकते तेव्हा तिची पूर्ण पिढी सुशिक्षित होऊ शकते

**- ब्रिघम यंग**

---

संशय हा एक खूप मोठा शत्रू आहे. आपण कोण आहोत आहेत, आपला जन्म कशासाठी आहे हे माहीत असणं गरजेचं आहे

**- जेनिफर लोपेझ**

---

# स्थलांतराचे अर्थशास्त्र

**मंजुषा मुसमाडे**†

**प्रास्ताविक**

अर्थशास्त्र हे सामाजिकशास्त्र असल्याने त्याच्या मूळ सैद्धांतिक स्वरूपात कालानुरूप बदल होणे अनिवार्य आहे. गेल्या काही दशकांत मूळच्या शुद्ध आर्थिक स्वरूपात अनेक बिगर-आर्थिक घटकांचा समावेश झाल्याने आता अर्थशास्त्राला अस्पर्श असे काहीच उरले नाही, असे म्हणणे फारसे अतिशयोक्तीचे होणार नाही. अलीकडच्या काळात अर्थशास्त्राच्या कक्षेत मानवी स्थलांतर या ज्वलंत घटकाची भर पडली आहे. मानवाचे स्थलांतर ही प्रतिकूलतेवर मात करून अधिक चांगले आयुष्य जगण्यासाठी घेतलेल्या धाडसी निर्णयाची कार्यवाही तसेच, सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे.

सध्या जागतिकीकरण, संपर्कक्रांती आणि दळणवळणाच्या सुविधांमुळे स्थलांतरात वाढ होत आहे. या प्रक्रियेने अनेक आव्हाने आणि संधी निर्माण केल्या आहेत. स्थलांतर आणि विकास यांच्यातील स्पष्ट आणि घनिष्ट संबंध निर्विवादपणे दिसून येतो आहे. यामुळे सर्व जगाचे लक्ष या विषयावर केंद्रित झाले आहे.

असे म्हटले जाते की, विसाव्या शतकातील जगातील प्रमुख वैचारिक वाद हा भांडवलशाही आणि साम्यवाद यांच्यात होता, तर एकविसाव्या शतकात मात्र असा जागतिक पातळीवरील वैचारिक संघर्ष वाढत्या स्थलांतरामुळे निर्माण होणारी बहुसांस्कृतिकता (Cosmopotinism) आणि स्थानिकवाद (Nativism) यांच्यात होईल. त्यामुळे आर्थिक विकासातील स्थलांतराच्या विविध पैलूंशी निगडित मुद्यांचा परामर्श घेणे संयुक्तिक ठरते. स्थलांतरातील अनिश्चितता, आणीबाणी, गुंतागुंत, धाडसी निर्णयप्रक्रिया यामुळे त्याचा अभ्यास आव्हानात्मक बनला आहे. या अभ्यासातून स्थलांतराचे अर्थशास्त्र ही नवी शाखा उदयाला आली आहे. ही आंतरविद्याशाखा असून यात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, तंत्रज्ञान इ. विषयांचा समावेश होतो.

भारताचे सांस्कृतिक वैविध्य हे दीर्घकाळात झालेल्या स्थलांतराचा परिपाक असल्याचे आणि स्थलांतरामुळे उद्भवलेल्या संघर्षातून देश समृद्ध होत गेला असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करतात. नुकत्याच

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र. : ९३१, भ्रमणध्वनी : ९८८१३४०७२५, ईमेल : manjushamusmade@gmail.com

संमत झालेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याविषयी चाललेल्या उलटसुलट आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर या विषयाचा आढावा घेणे  समयोचित ठरेल.

**संकल्पना आणि महत्त्व**

मानवी स्थलांतर म्हणजे लोकांनी एका भौगोलिक स्थानावरून दुसरीकडे स्थायिक होण्याच्या दृष्टीने केलेले स्थानांतर होय. ही क्रिया जितकी गतिशील आहे तितकेच त्याच्याशी निगडित असणारे विविध पैलूही गतिशील स्वरूपाचे आहेत.

कोणकोणते समूह स्थलांतर करतात याविषयी चिन्मय तुंबे या अभ्यासकाने रोचक पद्धतीने इंग्रजी भाषेतील बाराखडीच दिली आहे. मराठीत भाषांतर करून ती अशी सांगता येईल - लेखापाल, प्राणी, कारागीर, साधू, आया, बंजारी, वसाहतवादी, स्वयंपाकी, दूत, दरबारी मंडळी, मनोरंजन करणारे, खलाशी, भाडोत्री सैनिक, व्यापारी, धर्मप्रसारक, संन्यासी, भटक्या जमाती, ख्रिस्ती जोगिणी, जहाजे, यात्रेकरू, धर्मगुरू, वेश्या, गुलाम, हेर, विद्यार्थी, चोर, प्रवासी, योद्धे, विणकर, पत्नी आणि कामगार. या यादीवरून स्थलांतर ही सर्वव्यापी आणि दीर्घकाळापासून घडत आलेली सामाजिक प्रक्रिया असल्याचे लक्षात येऊ शकते.

स्थलांतरात मूळ देशातील नागरिक व शासन, नव्या देशांतील नागरिक व शासन आणि खुद्द स्थलांतरित व्यक्ती अशा सर्वच संबंधित घटकांचे परस्परसहकार्य आणि सामूहिक प्रयत्न निगडित असतात. एवढेच नव्हे, तर युनोसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांची यांतील भूमिका पूरक आणि समंजस असणेही गरजेचे असते. स्थलांतराच्या वाढत्या महत्त्वामुळे गेल्या दोन दशकांपासून दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस जागतिक स्थलांतरदिन म्हणून साजरा केला जातो. अशा आंतरराष्ट्रीय दिनाची उपयुक्तता लोकांमध्ये जागृती करणे, स्थलांतराला पोषक राजकीय इच्छाशक्ती आणि संसाधने निर्माण करण्यास हातभार लावणे आणि मानवजातीने स्थलांतराद्वारे मिळवलेले यश साजरे करणे, अशा प्रकारे सांगता येते.

इ.स.२०३० साठीच्या शाश्वत विकासाच्या कार्यक्रमपत्रिकेच्या उद्दिष्टांमध्ये प्रथमच स्थलांतराचे शाश्वत विकासाठी असलेले योगदानाचे महत्त्व विशद केलेले आहे. एकूण १७ उद्दिष्टांपैकी ११ उद्दिष्टे स्थलांतराशी निगडित आहेत. विकासाच्या प्रक्रियेत 'कोणालाही मागे सोडू नका, अगदी स्थलांतरितालाही,' हे या उद्दिष्टांचे सूत्र आहे.

**स्थलांतराचे प्रकार-** स्थलांतराच्या स्वरूपानुसार ऐच्छिक, सक्तीचे, तात्पुरते, कायमस्वरूपी, अल्पअंतराचे, दीर्घ अंतराचे, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत, राज्यांतर्गत, जिल्हांतर्गत, परतीचे इत्यादी विविध प्रकाराने वर्गीकरण करता येते. अर्थातच, स्थलांतराचे अंतर आणि काळ जितका मोठा असेल तितके त्याचे परिणाम अधिक गुंतागुंतीचे ठरतात.

**स्थलांतराबाबत काही निरीक्षणे**

प्रत्येक मानवी स्थलांतराचे स्वरूप आणि परिणाम भिन्न असले तरी जागतिक स्थलांतर अहवाल,२०१९ मध्ये नोंदलेली काही निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत-

प्रत्येक स्थलांतरामुळे बदली किंवा परतीचे स्थलांतर होते. बहुतांश स्थलांतर अल्पअंतराचे असते. स्थलांतराचे प्रमाण आणि भौगोलिक अंतर यातील संबंध व्यस्त असतो. बहुधा दीर्घ अंतरावरील स्थलांतर टप्प्याटप्प्याने होते आणि एका जागेवरील स्थलांतरित लोकांची जागा नव्याने येणाऱ्या स्थलांतरितांकडून भरून काढली जाते. दीर्घ अंतरावरील स्थलांतर मोठ्या शहरांत होते. शहरी-ग्रामीण विकासातील तफावतीमुळे स्थलांतर घडून येते. शहरी नागरिक ग्रामीण नागरिकांपेक्षा कमी प्रमाणात स्थलांतर करतात.

कुटुंबापेक्षा तरुणांचे आंतरराष्ट्रीय स्थलांतर अधिक प्रमाणात असते. स्थलांतरात वयाचा घनिष्ट संबंध असतो. दर सात स्थलांतरितांपैकी एक व्यक्ती वीसपेक्षा कमी वयाची असते. मोठी शहरे नैसर्गिक वाढीपेक्षा स्थलांतरामुळे  वाढत जातात आणि स्थलांतरातील आर्थिक पैलू महत्त्वाचे असतात.

युनोच्या आर्थिक आणि सामाजिक घडामोडी खात्यातील लोकसंख्या विभागाकडून जगभरातील स्थलांतरित लोकांची वयोगट, लिंग, मूळ देश इत्यादी विषयक अद्ययावत सांख्यिकी पुरवली जाते. ही माहिती त्या त्या देशातील जनगणना, लोकसंख्या नोंदणी अहवाल आणि राष्ट्रीय पाहण्या याद्वारे मिळवली जाते. त्यानुसार जगातील स्थलांतरित लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ३% आहे; परंतु जगाच्या एकूण स्थूल उत्पादनात ह्या लोकसंख्येने निर्माण केलेल्या उत्पादनाचा वाटा ९% इतका आहे.

जगात होणारे ८०% नवे शोध आणि नवोन्मेष स्थलांतरित लोकांमुळे होत असल्याचे आढळून आले आहे. त्यांच्यामुळेच प्रगतीशील आणि नवोन्मेषवादी राजकीय वातावरण निर्माण होते. स्थलांतरित लोकांमुळे स्पर्धेत वाढ होऊन उत्पादकतावाढ होत असल्याचे दिसून आले आहे.

आंतरराष्ट्रीय स्थलांतर अहवालात आढळलेली एक धक्कादायक बाब म्हणजे जगभरात सक्तीच्या स्थलांतराचे विस्थापन प्रमाण वाढते आहे. अर्थातच, ही अतिशय चिंताजनक गोष्ट आहे.

**स्थलांतरविषयक काही निवडक सिद्धांत**

स्थलांतर क्रियेच्या अनिश्चित आणि गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे एकच एक ठाम सिद्धांत मांडणे अशक्य आहे. स्थलांतराच्या विविधांगी सिद्धांताचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे-

१. नवअभिजात आर्थिक सिद्धांतानुसार स्थलांतर दोन भिन्न भौगोलिक स्थानांमधील वेतनदरातील तफावतींमुळे होते.

२ दुहेरी श्रमबाजार सिद्धांतानुसार स्थलांतर विकसित देशांतील खेचून घेणाऱ्या (Pull factors) घटकांमुळे होते. या देशातील प्राथमिक श्रमबाजार अतिकुशल श्रमिकांसाठी असतो तर दुय्यम श्रमबाजार कमी कुशल श्रमिकांचा असतो. यात श्रमाच्या मागणीत वाढ झाल्याने स्थलांतर होते, कारण कनिष्ठ दर्जाचे श्रम करण्याची स्थानिक श्रमिकांची तयारी नसते.

३. श्रमिकांच्या स्थलांतराचे नवे अर्थशास्त्र असे मानते की, स्थलांतर ही व्यापक सामाजिक घटना आहे आणि स्थलांतरित श्रमिक मूळ स्थानावरील आपल्या कुटुंबाला पैसे पाठवत असल्याने वित्तप्रेषण मूळ देशावर त्याचे आर्थिक परिणाम होतात.

४. सापेक्ष वंचितता सिद्धान्तानुसार, वित्तप्रेषणामुळे अल्पकाळात विषमतेत वाढ होते, मात्र दीर्घकाळात ती घटते. कारण स्थलांतरित कामगाराच्या आर्थिक वर्तनाचे दोन टप्पे असतात. पहिल्या टप्प्यात ते स्वतःचे मानवी भांडवल सुधारण्यासाठी गुंतवणूक करतात, तर दुसऱ्या टप्प्यात आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी भांडवली गुंतवणूक करतात.

५. जागतिक व्यवस्था सिद्धांतात असे म्हटले आहे की, वसाहती राजवट संपुष्टात आल्यानंतरदेखील जर दोन्ही देशांत खुला व्यापार राहिला तर एकूण स्थलांतर घटते.

६. डीजेल्ती २०१७ या तज्ज्ञाने मांडलेल्या अलीकडच्या सिद्धांतानुसार मानवी स्थलांतराद्वारे दोन्ही समाजाच्या ज्ञानात नकळत भर पडते आणि त्यामुळे समानता निर्माण होते.

७. समाजशास्त्रीय सिद्धांतानुसार मानवजातीच्या वंश, सामाजिक संरचना अशा घटकांमुळे सामाजिक संघर्ष होतो आणि सामाजिक प्रेषण घडून येते.

८. स्थलांतराच्या राजकीय सिद्धांतात प्रमुख योगदान अल्बर्ट हर्शमान यांचे आहे. सुरक्षा, नागरिकत्व, आंतरराष्ट्रीय संबंध, देशाची मृदू शक्ती (Soft power), स्थलांतराचे राजकारण आणि स्थलांतरामुळे मूळ देशांमध्ये होणारा परिणाम या बाबी त्यात महत्त्वाच्या आहेत.

९. 'ली'च्या नियमात स्थलांतराला विकसित भागातील 'खेचणारे' (Pull factors) आणि अविकसित प्रदेशातील 'ढकलणारे' (Push factors) घटक कारणीभूत असतात. काही 'खेचणारे' घटक म्हणजे रोजगारसंधी, चांगले राहणीमान, राजकीय आणि धार्मिक स्वातंत्र्य, शिक्षण, आरोग्य, सुरक्षाविषयक चांगल्या सुविधा, एवढेच नव्हे तर विवाहाच्या अधिक शक्यता हे आहेत. तर अविकसित प्रदेशातील 'ढकलणारे' घटक प्रतिकूल परिस्थिती, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्ती, राजकीय आणीबाणी, गुलामी आणि वेठबिगारी, अपुऱ्या सुविधा, सामाजिक भेदभाव इ. आहेत.

१०. हवामानचक्रिय सिद्धांत, या आधुनिक सिद्धांतानुसार, इतिहासात युरेशियामध्ये नियमित स्थलांतराचे चक्र आढळून येते. पशूपालक अवस्थेपासून सुरू झालेले हे चक्र आजही चालू आहे, असे म्हटले जाते. या व्यतिरिक्त व्यस्त अंतर सिद्धांत, गुरुत्वाकर्षण प्रारूप, मानवी गतिशीलतेचे किरणोत्सर्जन, बाजार नियमन सिद्धांत अशा इतर अनेक सिद्धांतांद्वारे मानवी स्थलांतराची गुंतागुंत स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**आंतरराष्ट्रीय स्थलांतर**

आंतरराष्ट्रीय स्थलांतर हे देशांतर्गत होणाऱ्या स्थलांतरापेक्षा अधिक गुंतागुंतीचे आणि गंभीर परिणाम करणारे असते, हे स्वाभाविक आहे. ज्या देशातून स्थलांतर होते तो देश (Source country) आणि ज्या देशात स्थलांतर होते तो देश (Destination country) या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांवर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम घडून येतात. एकूणापैकी साधारणपणे निम्मे स्थलांतरित दहा देशांत राहातात. २०१९ या वर्षातील अशा दोन्ही

| क्रमांक | स्थलांतर होणारे देश | क्रमांक | मूळ देश | संख्या दशलक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका | १ | भारत | १७.५ |
| २ | जर्मनी | २ | मेक्सिको | ११.८ |
| ३ | सौदी अरेबिया | ३ | चीन | १०.७ |
| ४ | रशियन महासंघ | ४ | रशियन महासंघ | १०.५ |
| ५ | युनायटेड किंग्डम | ५ | सिरीयन अरब प्रजासत्ताक | ८.२ |
| ६ | युनायटेड अरब अमिरात | ६ | बांगलादेश | ७.८ |
| ७ | फ्रान्स | ७ | पाकिस्तान | ६.३ |
| ८ | कॅनडा | ८ | फिलिपिन्स | ५.४ |
| ९ | ऑस्ट्रेलिया | ९ | अफगाणिस्तान | ५ |
| १० | इटली | १० | इंडोनेशिया | ३.५ |

स्रोत - The International Migration Stock 2019, Population Division of the United Nations Department of Economic and Social Affairs (DESA).

स्तरावरील सर्वोच्च दहा देशांची यादी दिली आहे.

वर उल्लेख केलेल्या अहवालानुसार, या सर्वोच्च दहा देशांतून होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण एकूण आंतरराष्ट्रीय स्थलांतराच्या सुमारे निम्मे आहे. यावरून त्याची व्याप्ती लक्षात घेता येईल.

**जगदीश भगवती यांचे स्थलांतरावरील विचार**

जगदीश भगवती या प्रख्यात भारतीय-अमेरिकन अर्थतज्ञाचे स्थलांतर या विषयावरील विचार खळबळजनक आहेत. जागतिक पातळीवरील विचारवंत हर्बर्ट ग्रूबेल, स्कॉट आणि जॉन्सन यांच्या विचारांच्या विरुद्ध असणारे त्यांचे विचार बहुसांस्कृतिकता सिद्धांत (Cosmopolitan Theory) या नावाने ओळखले जातात. त्यांचे असे प्रतिपादन आहे की, स्थलांतरामुळे मूळ देशातून होणाऱ्या बुद्धिवहनासाठी (Brain Drain) स्थलांतरितांवर कर लादला जावा. याला 'भगवती-कर' असे नाव दिले जाते. मात्र, अमेरिकेचा शेजारी देश मेक्सिको येथून होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील अवैध स्थलांतराबाबत त्यांची भूमिका मानवतावादी आहे. अवैध मार्गाने अमेरिकेत येऊ पाहणाऱ्यांना सीमेवरच रोखावे, मात्र एकदा ते देशात आले की त्यांना माणुसकीनेच वागवायला हवे, असे सांगताना ते मुळात अमेरिका अशा स्थलांतरातूनच निर्माण झाली आहे, त्यामुळे हे तिचे कर्तव्यच आहे, असे परखडपणे म्हणतात.

स्थलांतरितांचे हक्क संरक्षित करण्यासाठी भगवती यांच्या मते जागतिक स्थलांतर संघटना (World Migration Organization) स्थापन केली पाहिजे. या संघटनेने अवैध स्थलांतरितांच्या किंवा निर्वासितांच्या हक्कांचे रक्षण करावे, इतर देशांच्या राहणीमान पातळीशी तुलना करावी, असे ते सुचवतात. ही संघटना म्हणजे जागतिकीकरणाचे अंतिम स्वरूप असेल, असे त्यांना वाटते. कदाचित स्वतः अमेरिकेत स्थलांतरित झाल्यामुळे स्थलांतरित लोकांविषयी त्यांना वाटणाऱ्या सहानुभूतीतून त्यांनी हा विचार मांडला असावा. मात्र, वाढत्या स्थलांतरामुळे होणारे आर्थिक दुष्परिणामही ते दुर्लक्षित नाहीत. स्थलांतरित लोकांमुळे नेहमीच उत्पादकता आणि विकास वाढेल, हे त्यांना मान्य नाही. तसेच, आफ्रिकन देशांमध्ये परदेशांत अनावश्यक शिक्षण घेऊन पांढरपेशा वर्गात जाण्याची अपप्रवृत्तीही वाढीला लागली आहे, असे ते दाखवून देतात. एकंदरीत, स्थलांतर हा घटक मानवजातीचे भविष्य घडवेल, असे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे.

**स्थलांतराचे आर्थिक परिणाम**

संबंधित देशांच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने स्थलांतराचे महत्त्वाचे आर्थिक परिणाम खालील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात सांगता येतील-

**राष्ट्रीय उत्पादन-** स्थलांतराचे होणारे समग्रलक्षी आणि दूरगामी परिणाम साधारणपणे सकारात्मक असतात असे मानले जाते. प्रामुख्याने स्थलांतरामुळे रोजगार आणि आर्थिक विकासात लक्षणीय भर पडते. जागतिक पातळीवर २०१५ मध्ये एकूण लोकसंख्येत असणाऱ्या ३.३% स्थलांतरितांनी जागतिक स्थूल उत्पादनात दिलेले एकूण योगदान ९.४% इतके होते. जागतिक विकास केंद्राच्या मते जर सर्व देशांच्या सीमा खुल्या केल्या तर त्यामुळे जागतिक उत्पादनात सुमारे ७८ खर्व (Trillion) अमेरिकन डॉलर्सची भर पडू शकते.

**रोजगार -** स्थलांतराचे अर्थशास्त्र असे मानते की, जर एखाद्या स्थलांतरिताने नव्या देशातील कोणाचा तरी रोजगार हिरावून घेतला तरी तो दुसरा एखादा रोजगार निर्माणही करत असतो. डेव्हिड कार्ड्स यांच्या १९९० मधील अभ्यासात त्यांना असे आढळले की, क्युबाच्या निर्वासितांनी मियामी फ्लोरिडा येथे गर्दी केली होती तरी श्रमबाजारावर आणि वेतनावर फारसा

परिणाम झाला नाही. अर्थात, यावर अजूनही वादविवाद चालू आहेत. त्यांच्या मते स्थलांतराचे स्थानिक कामगारांवर होणारे नकारात्मक परिणाम जर असलेच तर तुलनेने कमी आणि अल्पकालीन असतात. असाच निष्कर्ष युरोपियन महासंघात दिसून आला. कमी वेतनाच्या देशांकडून ब्रिटनमध्ये होणारे स्थलांतर कोणतेही बंधन नसल्याने तिप्पटीपेक्षा जास्त झाले (एकूण कामगारवर्गाच्या ७%). परंतु, त्याचा ब्रिटनमधील श्रम बाजारावर कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. वाढत्या स्थलांतरामुळे स्थानिक कामगारांचा रोजगारही वाढतो.

याउलट, १९६५ मध्ये अमेरिकेने मेक्सिकोतून होणाऱ्या स्थलांतरावर निर्बंध आणले. परंतु, त्यामुळे स्थानिक वेतनदर वाढला नाही. उलट, शेतकऱ्यांनी पीक पद्धती बदलून, खर्चिक तंत्रज्ञान आणल्यामुळे श्रमाची मागणी घटली होती. एकंदरीत स्थलांतरितांमुळे स्थानिक रोजगार घटतो, असे मानणे हे चुकीचे अर्थशास्त्र आहे. 'स्थलांतरित लोक स्थानिकांचा रोजगार हिसकावून घेतात,' हा गैरसमज असल्याचे अर्थशास्त्रात मानले जाते.

**उत्पादकता-** स्थलांतराचा पहिला परिणाम लोकसंख्येत वाढ होणे हा असतो. जर स्थलांतरित कमी कुशल असतील तर कदाचित उत्पादकता वाढणार नाही. परंतु, अमेरिका आणि इटलीमध्ये कमी कुशल स्थलांतरितांमुळे कुशल स्थानिक स्त्रियांचा रोजगार सहभाग वाढल्याचे दिसून आले. याचे कारण सुशिक्षित स्त्रियांना बालसंगोपन, घरकामाला नोकर मिळाल्याने नोकरी करणे शक्य झाले. म्हणजेच, कमी कुशल स्थलांतरितांमुळे अतिकुशल स्थानिकांच्या काम करण्याच्या प्रेरणेत वाढ होते. यामुळे त्यांचा पुरवठा वाढून त्यांची मागणी किंवा वेतनपातळी घटल्याचे युरोप आणि अमेरिकेत आढळले. मात्र, ब्रिटनमधील संशोधनानुसार, स्थलांतराचा उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम होतो.

ज्या देशांत मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते, तेथे इतर परिस्थिती कायम असताना वृद्धी वेगाने होते. २०१६ मधील पाहणीनुसार, जर लोकसंख्येत स्थलांतरितांचे प्रमाण एक टक्क्याने वाढले, तर उत्पादकता आणि दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादनात दोन टक्क्याने वाढ होते.

**बुद्धिवहन** (Brain Drain):

प्रचलित समज असा आहे की, विकसनशील देशांतून विकसित देशांत श्रमिकांच्या होणाऱ्या स्थलांतरामुळे विकसनशील देशांची बौद्धिक संपत्ती घटते आणि त्यांचे आर्थिक नुकसान होते. मानवी संपत्तीचा प्रवाह भांडवलाच्या प्रवाहापेक्षा निराळ्या दृष्टीने अभ्यासायला हवा. विकसनशील देशांची ही हानी भरून काढण्यासाठी स्थलांतरितांवर कर लादला जावा, अशी मागणी भगवती आणि इतर काही विचारवंत मांडत आहेत, हे आपण पाहिले आहेच. कराचे स्वरूप कसे असावे याबाबत भगवती यांनी पुढीलप्रकारे ऊहापोह केला आहे. बुद्धिवंतांना कौशल्य, शिक्षण देण्यासाठी देशाचा आजवर जो एकूण खर्च झाला असेल, त्याचे सध्याच्या पातळीतले मूल्य किंवा सध्याच्या त्यांच्या उत्पन्नाचा काही भाग इतका कर लावावा म्हणजे, स्थलांतरितांच्या शिक्षणाची पातळी हा निकष धरला जावा, असे त्यांचे मत होते. ॲरो आणि स्पेन्स (१९७३) यांनी हा विचार मांडला असला तरी स्थलांतरितांच्या प्रशिक्षणावर विकसित देशही खर्च करतात असा भगवती, फिल्ड आणि श्रीनिवासन यांचा सिद्धांत (१९७३-७७) आहे.

**वित्तप्रेषण**

वित्तप्रेषण अवलंबित्व (Remittance Dependent Economy) असलेले देश म्हणजे ज्या

देशांच्या राष्ट्रीय उत्पादनात देशातून स्थलांतर केलेल्यांनी दुसऱ्या देशात कमावलेले पैसे मायदेशांत पाठवण्याचे प्रमाण लक्षणीय असते, असे विविध देश आहेत. अलीकडच्या काळातील अशा प्रमुख देशांच्या यादीवर एक नजर टाकूया.

**तक्ता क्र. १**

**वित्तप्रेषण अवलंबित्व देश**

| क्रमांक | देश | वित्तप्रेषण (अब्ज) | राष्ट्रीय उत्पादनाशी % |
|---|---|---|---|
| १ | भारत | ८० | २.८० |
| २ | चीन | ६७ | ०.४९७ |
| ३ | फिलिपिन्स | ३४ | ९.१४४ |
| ४ | मेक्सिको | ३४ | १.५४ |
| ५ | फ्रान्स | २५ | ०.९६ |
| ६ | नायजेरिया | २२ | ५.८४ |
| ७ | इजिप्त | २० | ८.४३ |
| ८ | पाकिस्तान | २० | ६.५७ |
| ९ | बांगलादेश | १७.७ | ५.७३ |
| १० | व्हिएतनाम | १४ | ६.३५ |

स्रोत- World Bank- 'Migration and Remittances Fact Book' 2016.

या कोष्टकावरून असे दिसून येते की, जरी भारतात विविध देशांतून होणारे वित्तप्रेषण निव्वळ रकमेच्या दृष्टीने प्रथम स्थानावर असले तरी फिलिपिन्स, इजिप्त, नायजेरिया या देशांच्या एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील बराच मोठा वाटा वित्तप्रेषणाचा आहे. त्या अर्थाने हे देश वित्तप्रेषण अवलंबित्व (Remittance Dependent Economy) असलेले देश आहेत. याचे अनेक गंभीर परिणाम या देशांच्या अर्थव्यवस्थेवर होत असणार यात शंका नाही.

**स्थलांतराचे सामाजिक पैलू**

अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे स्थलांतराशी अनेक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक पैलू निगडित आहेत. त्यातील काही सकारात्मक तर काही नकारात्मक स्वरूपाचे आहेत. त्यापैकी एक सकारात्मक असणारा सामाजिक परिणाम ऊर्ध्व गतिशीलता (Upward Mobility) या संकल्पनेतून दाखवता येऊ शकतो. मूळ ठिकाणी असणारे व्यक्तीचे सामाजिक स्थान स्थलांतरामुळे बदलते. सामाजिक बंधने शिथिल होतात आणि त्यामुळे व्यक्ती मुक्तपणे आपली आर्थिक प्रगती साधून सामाजिक उतरंडीच्या वरील पायरीवर जाऊ शकते. हा स्थलांतराचा मोठाच सकारात्मक परिणाम आहे.

**भूमिपुत्र चळवळ-** (Son of Soil)

स्थलांतरित लोकांमुळे स्थानिक लोकांचा रोजगार हिरावून घेतला जातो, या मुख्य समजुतीवर ही

सामाजिक चळवळ आधारित आहे. साधारणपणे प्रगत अशा महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यांत ती पसरल्याचे दिसते. तसेच, आसाममध्ये शेजारील बांगलादेशातून येणाऱ्या स्थलांतरितांच्या लोंढ्यामुळे गेली काही दशके या चळवळीचे उग्र स्वरूप पाहायला मिळते आहे. ही चळवळ काही राज्यांतच दिसून येण्याच्या कारणांचा सखोल अभ्यास महत्त्वाचा ठरतो. नव्या लोकांमुळे मूळ संस्कृती, लोकसंख्या आणि इतर आर्थिक व सामाजिक स्थितीत होणारे बदल सांस्कृतिक संघर्षाला जन्म देतात. काही संरचनात्मक बदलाबरोबरच असे बदल सकारात्मकतेने स्वीकारण्याची मानसिकता निर्माण होणे, हा यावरील उपाय असू शकतो. मायरन विनर (१९३१-१९९९) या राजकीय शास्त्रज्ञाने भारतातील भूमिपुत्र चळवळीचा तपशीलवार अभ्यास केलेला आहे.

एकंदरीतच, स्थलांतर या मूळच्या आर्थिक कारणाने होणाऱ्या सामाजिक आणि भौगोलिक प्रक्रियेला आता राजकीय आयामही येऊ लागले आहेत. त्यामुळे हा विषय अधिकच नाजूक आणि गुंतागुंतीचा बनत चालला आहे.

**भारतीय स्थलांतराचे स्वरूप**

भारताच्या आधुनिक आर्थिक इतिहासावर स्थलांतराचा मोठा प्रभाव आहे. परंतु, खेदाची बाब ही आहे की तो आजवर बराचसा दुर्लक्षित राहिला आहे. कोष्टकात पाहिल्याप्रमाणे स्थलांतर करणाऱ्या लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात पहिला क्रमांक आहे. त्याचप्रमाणे भारतात होणारे स्थलांतरही मोठ्या प्रमाणात आहे. २०१९ मधील पाहणीवरून भारतात एकूण ५.१ दशलक्ष लोक स्थलांतरित आहेत. तसेच, २०१०-१९ या दशकात भारतातील स्थलांतरित लोकांचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण स्थिर म्हणजे ०.४% इतकेच राहिलेले आहे. २०११च्या जनगणनेनुसार, प्रथम श्रेणीतील शहरांमध्ये (एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणारी) असणाऱ्या शहरी लोकसंख्येचे १९५१ मधील ४४.६% प्रमाण वाढून ७०% झाले होते.

**स्थलांतराचे टप्पे**

नजीकच्या आर्थिक इतिहासातील स्थलांतराच्या अनुषंगाने तीन टप्पे सांगता येतील. एकोणिसाव्या शतकापर्यंतचा स्थलांतराचा इतिहास हा एकारलेल्या पद्धतीने करता येतो. मुख्यत्वे अश्वशक्ती आणि समुद्री वारे यावर आधारित घडलेल्या स्थलांतराचा हा अभ्यास आहे. मात्र, त्यानंतरच्या काळातील स्थलांतर आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, हवामानविषयक अशा बहुआयामी स्तरावर घडून येत आहे. अश्वांच्या शक्तीपासून यांत्रिक अश्वशक्तीवर अवलंबून झालेले हे स्थलांतर हा एक आंतरविद्याशाखीय अभ्यास आहे.

१) १८५०-१९५०- या काळातील ब्रिटिश वसाहतवादामुळे झालेल्या देशी उद्योगांच्या ऱ्हासामुळे असंख्य विणकर आणि कारागीर ग्रामीण भागाकडून शहरांकडे स्थलांतरित झाले. या शतकभराच्या काळात प्रामुख्याने देशांतर्गत स्थलांतरामुळे कोलकाता, मुंबई तसेच मालेगाव, भिवंडी या वस्त्रोद्योग आणि हातमागावर आधारित अशा शहरांची जडणघडण झाली. याच काळात झालेल्या रेल्वेमार्गाच्या प्रसारामुळे देशांतर्गत स्थलांतराचा वेग आणि प्रसार वाढला. वाहतुकीच्या खर्चात कपात झाल्यामुळे आणि टपाल खात्याद्वारे पैसे पाठवण्याच्या सुविधेमुळे या प्रक्रियेला चालना मिळाली. स्थलांतरित अशिक्षित लोकांनी गावाकडील नातेवाईकांना शिक्षित लोकांकडून पत्रे लिहवून घेण्याचा एक नवा पांढरपेशा रोजगारही यातून निर्माण झाला होता.

ब्रिटिश काळात वारंवार पडणारे तीव्र आणि दीर्घ

दुष्काळ या आपत्तीमुळेही शेतीवर अवलंबून असणारे लोक उदरनिर्वाहासाठी शहरांकडे जाऊ लागले. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील दोन महायुद्धांचाही अप्रत्यक्ष परिणाम स्थलांतरात वाढ होण्यात झाला. या स्थलांतरितांमधून देशाला अनेक राजकीय नेते, बुद्धिवंत, शास्त्रज्ञ, अधिकारी इ. उदयाला आले हा खरोखरच फायदा म्हणावा लागेल.

२) १९६०- १९८०-९०- स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षणामुळे लोकांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या. त्यामुळे विशेषकरून मोठ्या शहरांमध्ये आणि विकसित देशांत स्थलांतर करण्याचा वेग वाढला. तसेच, कर्नाटकातील उडुपी भागातून मुख्यत्वे उपहारगृहाच्या व्यवसायासाठी झालेले स्थलांतर हाही एक कुतूहलपूर्ण अभ्यासाचा विषय आहे. यात मोठ्या प्रमाणात ऊर्ध्व सामाजिक गतिशीलता दिसून येते, हा त्याचा एक सकारात्मक पैलू आहे.

३) १९९१ नंतर - भारताने स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणामुळे प्रामुख्याने शहरी उच्चशिक्षित युवकांना माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात परदेशातील रोजगार संधी आकर्षित करू लागल्या. भारताने या क्षेत्रात जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवला आहे आणि एक कृषिप्रधान देश सेवाप्रधान होण्याकडे वाटचाल झाली.

२०११च्या जनगणनेत असे आढळलेले आहे की, एकूण कार्यकारी लोकसंख्येच्या १/५ म्हणजे ५० दशलक्ष लोकांनी आर्थिक कारणासाठी स्थलांतर केलेले आहे. एकंदरीत सांगायचे तर आर्थिक वृद्धी आणि जागतिकीकरण यांच्या प्रभावामुळे भारतात 'स्थलांतराची महालाट' (Great Indian Migration Wave) दिसून येत आहे.

भारतातील देशांतर्गत स्थलांतराची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील-

**१) सामूहिक स्थलांतर :** सहसा ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे होणारे स्थलांतर हे एकट्यादुकट्याचे नसून गटागटाने होते.

**२) पुरुषप्रधान स्थलांतर :** भारतातील अंतर्गत किंवा देशाबाहेर होणाऱ्या स्थलांतरावर पुरुषांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. रोजगाराच्या शोधात कुटुंबातील तरुण पुरुषवर्ग शहरात किंवा देशाबाहेर जातो आणि मूळ गावी कुटुंबातील स्त्रिया, मुले आणि वृद्ध व्यक्ती राहतात हे सार्वत्रिक चित्र आहे.

**३) हंगामी आणि अर्ध कायमस्वरूपी स्थलांतर :** भारतातील स्थलांतर प्रामुख्याने अर्धकायम स्वरूपाचे असते. म्हणजेच, काही काळाने गावाकडची परिस्थिती सुधारल्यास अथवा निवृत्तीच्या वयात मूळ गावी येण्याचा स्थलांतरितांचा कल असतो. याला अर्थातच सामाजिक घटक कारणीभूत आहेत. तसेच, स्थानिक उदाहरण द्यायचे झाल्यास मराठवाड्यातील शेतमजूर, अल्पभूधारक दरवर्षी पावसाळ्यानंतर आपली गावे सोडून पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या परिसरात ऊसतोडणीसाठी जात असतात.

**४) वित्तप्रेषण स्थलांतर :** शहरात रोजगार मिळवून मूळ गावी राहत असलेल्या कुटुंबाला पैसे पाठवणे आणि त्या पैशांवरच प्रामुख्याने त्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होणे हे भरतीतील स्थलांतराचे ठळक वैशिष्ट्य आहे. यासाठी राज्यांतर्गत स्थलांतराचे महाराष्ट्रातील कोकण आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतरासाठी केरळ ही उदाहरणे सांगता येतील. गेल्या शतकाच्या आरंभापासून कोकणातून मुंबई शहरात रोजगारासाठी आणि १९७० नंतर केरळमधून विशेषकरून आखाती देशांत मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. कोकणात (Mango) आंबा आणि (Man-Go) मनुष्याचे गमन अशा दोन गोष्टी घडतात असे काहीसे विनोदाने म्हटले

जाते. केरळच्या स्थूल उत्पादनात वित्तप्रेषणाचा वाटा ३०% इतका लक्षणीय आहे. केरळ आणि बिहार या राज्यांतून होणाऱ्या स्थलांतराचा दर जागतिक पातळीवर सर्वोच्च असल्याची नोंद आहे. जगातील सर्वोच्च पाच वित्तप्रेषण अर्थव्यवस्थांमध्ये केरळचा समावेश होतो. मात्र, बिहारमधून सतत होणाऱ्या मोठ्या प्रमाणातील स्थलांतरामुळेदेखील तेथील सार्वत्रिक गरिबी फारशी हटलेली नाही, हे एक कटू वास्तव आहे.

विकासप्रकल्प, नैसर्गिक आपत्ती, वांशिक संघर्ष, नक्षलवादी चळवळी अशा अनेक कारणांमुळे भारतात देशांतर्गत स्थलांतर आणि लोकांचे विस्थापन होत असते. तसेच, शेजारील देशांतील अस्थिर आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे तेथून भारतात विस्थापितांचे लोंढे येत असतात. भारतीय स्थलांतराविषयी आणखी एक वास्तववादी आणि विसंगत निरीक्षण असे आहे की आजवर भारतात आंतरराष्ट्रीय विस्थापितांना देशांतर्गत विस्थापितांच्या तुलनेत चांगल्या सुविधा आणि वागणूक मिळालेली आहे.

**भविष्यातील भारतातील स्थलांतर**

प्रामुख्याने भारताशी निगडित एकविसाव्या शतकातील स्थलांतर आणि त्याचे संभाव्य परिणाम कसे असतील याबाबतचे काही आडाखे बांधले जातात.

१) चालू शतकाच्या उर्वरित काळात भारतात मुख्यत्वे उत्तरेकडून दक्षिणेच्या दिशेने स्थलांतर होण्याचा अंदाज व्यक्त केला जातो. कारण दक्षिणेकडील राज्यातील लोकसंख्या घटत्या जन्मदरामुळे उत्तरेकडील राज्यांपेक्षा झपाट्याने वृद्ध होत जाईल आणि तेथे उत्पादक वर्गाची मागणी निर्माण होईल. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत आशिया खंडातून युरोपकडे होणाऱ्या स्थलांतराच्या धर्तीवर हे स्थलांतर घडेल.

२) स्थलांतराच्या वाढत्या प्रवाहामुळे भाषिक बंधने नष्ट होतील आणि पूर्वीप्रमाणेच उत्तरेकडील भोजपुरी भाषिक पट्टा स्थलांतर करण्यात अग्रेसर राहील.

३) हे स्थलांतर अर्ध-कायम आणि कायमस्वरूपी असेल.

४) विवाहाच्या कारणाबरोबरच स्त्रियांच्या वाढत्या शिक्षणपातळीमुळे त्यांच्यातही स्वतंत्र स्थलांतरही घडून येईल.

५) देशांतर्गत बौद्धिक गळती होत राहील, त्यामुळे राज्याराज्यांतील संबंध संघर्षपूर्ण होतील.

६) हवामानबदलप्रणीत अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही प्रकारच्या स्थलांतराचा योग्यरीतीने सामना करण्याचे आव्हान भारतापुढे असेल.

७) भारताच्या वाढत्या विकासाबरोबर शेजारील देशांबरोबरच इतरही देशांतून भारतात स्थलांतर होत जाईल. त्यामुळे मेट्रो शहरांची संरचना बदलेल. सामाजिक-आर्थिक गुंतागुंत वाढेल.

काहीसे आश्चर्यजनक असे एक भाकीत केले जाते की, कदाचित भविष्यात महाराष्ट्रातून बिहारकडे आणि अमेरिकेतून भारतात स्थलांतर होण्याचा आणि त्याविरुद्ध स्थानिकांनी आंदोलने करण्याची किंवा अमेरिकन लोकांना भारतीय व्हिसाचे नियम कडक होण्याचीही शक्यता असू शकते. अर्थातच, हे अगदी नजीकच्या काळात संभाव्य दिसत नाही.

**स्थलांतराचे 'नोबेल' अर्थशास्त्र**

२०१९चे अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळवणारे भारतीय वंशाचे अभिजित बॅनर्जी आणि इस्थर डफ्लो या दाम्पत्याने लिहिलेल्या 'Good Economics for Hard Times' या पुस्तकातील विवेचनाचा आधार घेत स्थलांतराचे नवे अर्थशास्त्र पुढीलप्रमाणे सांगता येईल-

स्थलांतर ही कायम चालणारी बाब असली तरी, स्थलांतरितांच्या 'लोंढ्या'ने स्थानिक अर्थव्यवस्था, संस्कृती आणि जीवनपद्धतीस धोका निर्माण होतो, अशी राजकीय हाकाटी होणे ही बाब आता आपल्या परिचयाची आहे. कधी हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्थलांतराबाबत निर्माण होतो, तर कधी आंतरप्रांतीय स्थलांतर अशा प्रचाराचा विषय होतो. अमेरिकेत मेक्सिकन सीमेवर भिंत बांधण्याचा मुद्दा पुढे येतो, तर भारतात नोकऱ्यांत भूमिपुत्रांना आरक्षण देणे आणि नागरिकत्व कायद्यात बदल करून स्थलांतरितांना परत पाठवणे हे प्रमुख राजकीय कार्यक्रम होतात. पण प्रत्यक्षात स्थलांतरितांचे प्रमाण कमी असते. त्यांचा यजमान देशातील अर्थव्यवहार, रोजगार किंवा वेतन यावर नेहमीच विपरीत परिणाम होतोच असे नाही. बहुतेक लोक स्थलांतर करण्याचा निर्णय परिस्थितीच्या रेट्याने घेत असतात आणि सामान्यतः स्थानिक अर्थव्यवहार आणि रोजगार यांवर त्याचे अनुकूल परिणाम होतात. स्थलांतरित जी कामे करतात, ती अनेकदा स्थानिक लोक करण्यास तयार नसतात. कुशल आणि अकुशल कामगारांच्या स्थलांतराचे परिणाम भिन्न असतात. तसेच भिन्न घटकांचा या प्रक्रियेवर परिणाम होत असतो, असे लेखकद्वयांनी मांडले आहे. महत्त्वाचे म्हणजे अभिजित बॅनर्जी आणि इस्थर डफ्लो यांचे विवेचन प्रत्यक्ष निरीक्षण आणि प्रयोगांवर आधारित आहे. स्थलांतराची अचूक माहिती उपलब्ध झाली, तर स्थलांतराचे चांगले परिणाम अनुभवण्यासाठी स्थलांतरास पूरक ठरणारी धोरणे आखण्याची शिफारसही त्यांनी केली आहे.

**स्थलांतर आणि शासकीय धोरण-** एकंदरीत स्थलांतराचे कार्यक्षम आणि न्याय्य व्यवस्थापन व प्रशासन ही प्रत्यके शासनापुढची डोकेदुखी ठरते. 'गरजेच्याच' स्थलांतरितांना प्रवेश देणे हे व्यवहारात शक्य नाही. केवळ कागदोपत्रीच्या शिक्षणावरून कोण किती उपयुक्त ठरेल हे सांगता येणार नाही. मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणानुसार असे मानले जाते की, साधारणपणे आर्थिक नियोजनात शासन फार चांगली कामगिरी करू शकत नाही आणि श्रमाच्या बाजाराविषयी तर नाहीच नाही. केवळ देशच आपले स्थलांतरित निवडत नसतो, तर स्थलांतरित सुद्धा देशाची निवड करत असतात. यामुळे शासनाचे काम आणखीच किचकट बनते. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प मानतात त्याप्रमाणे जर निर्यात अर्थव्यवस्थेसाठी चांगली असेल, तर आयात वाईट असली पाहिजे, हे चुकीचे अर्थशास्त्र आहे. त्याचप्रमाणे स्थलांतराविषयी म्हणता येईल. व्यापार किंवा स्थलांतर या दोहोतही शून्य-बेरीज-खेळ (Zero Sum) स्थिती असत नाही.

स्थलांतराच्या अर्थशास्त्राचे तत्त्व अगदी साधे आणि आणि साधारणपणे बाजाराला लागू होणारे आहे. ज्याप्रमाणे 'अति बाजार धोरण' यशस्वी होत नाही, त्याप्रमाणेच अति स्थलांतरही घातक ठरते. मुक्त व्यापार आणि स्थलांतर समानधर्मी आहेत. त्यामुळे कार्यक्षमता वाढू शकते, परंतु वितरणावर परिणाम होऊ शकतात. राजकीय अस्थिरता नसल्यास स्थलांतरितांना लाभ मिळतात.

**समारोप**

स्थलांतरित आणि स्थानिक नागरिक या दोहोंनी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाशी जुळवून घेणे गरजेचे ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की आदर्श समाज गतिशील असला पाहिजे. एका जागी होणारे बदल दुसऱ्या जागी वाहून नेण्यासाठी त्यात योग्य व्यवस्था असली पाहिजे. अशा आदर्श समाजाची जगाला नितांत गरज आहे. स्थलांतराचे प्रशासन हा जगातील जवळजवळ प्रत्येक देशातील कळीचा मुद्दा ठरू लागला आहे. स्थलांतराशी

निगडित योग्य शासकीय धोरणे तसेच लोकांची स्वागतशील आणि सामाजिक बदल स्वीकारणारी सहिष्णू मानसिकता यांद्वारेच हे साध्य होऊ शकेल. परिणामी, 'वसुधैव कुटुंबकम्' या प्राचीन कल्याणकारी मूल्यावर आधारित सर्वांगीण आर्थिक विकास घडून येऊ शकेल. तसेच, युनोने जाहीर केल्यानुसार 'स्थलांतराचा फायदा सर्वांना' (Migration works for all) हे सूत्र अंमलात येऊ शकेल.

**संदर्भ सूची :**


१) Banaerjee, Abhijit and Esthar Duflo, 2019, 'Good Economics for Hard Times,' Jagarnaut Book, India.

२) Bhagwati, Jagadish and Gordon Hanson. 2011'Skilled Immigration Today: Prospects, Problems and Polices.'OUP. U.K.

३) Bhagawati, Jagadish. 1998 ' A Stream of Windows - Unsettling Reflection on Trade, Immigration and Democracy,' MIT Press, U.S.

४) Gujlielmo Baron and Sauro Mocetti Article in American Economic Journal - Labour Economics, 2011.

५) Patricia Cortes and Jose Tessades, Article in American Economic Journal- Applied Economics 2011.

६) The International Migration Report, 2019, United Nations.

७) Tumbe, Chinmay, 2018, 'India Moving- A History of Migration,' Penguin Viking Publication, Gurgaon, Haryana, India.

८) World Bank-'Migration and Remittances Fact book 2008-2011-2016.

९) World Migration Report by International Organisation for Migration IOM, 10 editions since 1999.

१०) कुलकर्णी अविनाश,(२०१९) 'स्थानिक व स्थलांतरित संघर्षाचे सैद्धान्तिक विश्लेषण', 'अर्थसंवाद' खंड ४३, एप्रिल-मे-जून २०१९, पृ. ४३-४७.

११) मुसमाडे, मंजूषा, २०१३ 'मागोवा अर्थविचारांचा,' शब्दश्री प्रकाशन, जुन्नर, पुणे.


◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# प्रादेशिक असमतोल आणि भारताची बदलती संघराज्य व्यवस्था

**सुनीती नागपूरकर**†

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर गेल्या सात दशकांमध्ये आर्थिक विकासाच्या संदर्भात भारताची कामगिरी अगदी नेत्रदीपक जरी नाही तरी नजरेत भरण्यासारखी नक्कीच झाली आहे. सद्य परिस्थितीत मंदावलेला आर्थिक वाढीचा वेग लक्षात घेऊन सुद्धा भारत तुलनात्मकदृष्ट्या आज जगातील वेगाने विकसित होणारी एक बलाढ्य अर्थव्यवस्था गणली जाते. जागतिक पातळीवरील वित्तीय संस्था यांनी वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या अहवालांनुसार, आजमितीला जगातील ५ बलाढ्य अर्थव्यवस्थांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा समावेश होतो. असे असले तरी या प्रगतीला लागलेले एक गालबोट म्हणजे अर्थव्यवस्थेच्या विविध गटा/घटकांमधील प्रचंड तफावत आणि विविध क्षेत्रीय प्रादेशिक पातळींवरील विषमता. प्रस्तुत शोधनिबंधांमध्ये अशा प्रादेशिक पातळीवरील विषमतेचा आढावा गेल्या काही वर्षात दिसून येत आलेले संघराज्य व्यवस्थेमधील कल आणि नीती आयोगाच्या स्थापनेनंतर त्या कलांना मिळालेली बळकटी या पार्श्वभूमीवर घेण्याचा प्रयत्न केला आहे.

शोधनिबंधाच्या पहिल्या भागात आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, पतमानांक संस्था, भारत सरकार आणि संबंधित मंत्रालये तसेच वैयक्तिक संशोधक यांच्या अहवाल/शोधनिबंधातून प्रादेशिक असमतोलावर मिळणाऱ्या माहितीचा थोडक्यात ऊहापोह केला आहे. दुसऱ्या भागात 'संघराज्य' रचनेत दिसून आलेले कल आणि नीती आयोगाची धारणा यावर संकल्पनेच्या पातळीवर थोडक्यात चर्चा केली आहे तर तिसऱ्या व शेवटच्या भागात उपलब्ध तथ्यानुसार भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व तात्विक चर्चा माहितीच्या दुय्यम स्त्रोतांच्या साहाय्याने केली आहे. निबंधाच्या शेवटी संदर्भसूची व उद्धृत केलेले संदर्भ दिले आहेत.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रादेशिक असमतोल**

साधारण ८० च्या दशकामध्ये प्रादेशिक विकास असमतोलाची चर्चा धोरणकर्ते, संशोधक अशा विविध पातळीवर जोम धरू लागली. महाराष्ट्राच्या संदर्भात विचार करायचा झाला तर श्री.वि.म.दांडेकरांच्या अध्यक्षतेखालील तथ्य संशोधन समितीच्या अहवालातून ही बाब प्रकर्षाने पुढे आली.

† निवृत्त सहाय्यक प्राध्यापक, मुंबई,
भ्रमणध्वनी : ९८३३२१६७०१, ई-मेल : sunitinagpurkar@yahoo.com

राज्याराज्यांमधील विकास असमतोल तसेच राज्यांतर्गत विकास असमतोल अधोरेखित झाला.

प्रादेशिक असमतोलाचे विविध पैलू आहेत. उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरणाबाबतीत विचार करता, स्वातंत्र्यानंतरच्या ३ दशकांमध्ये भारतातील उद्योगधंदे (कारखानदारीप्रणित) प्रामुख्याने ५ राज्यांमध्ये एकवटले होते. महाराष्ट्र, तामिळनाडू, गुजरात, पश्चिम बंगाल आणि आंध्रप्रदेशात मिळून एकूण उद्योगधंद्यांच्या ४०% मोठे उद्योगधंदे, एकूण कारखानदारी रोजगारीपैकी ५५% रोजगारी, एकूण औद्योगिक उत्पादनाच्या ५९% उत्पादन आणि ५८% मूल्यवर्धित योगदान हे केवळ ५ राज्यांमध्ये एकवटले होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार, १९६१ ते १९९१ या कालावधीत भारतातील २० राज्यांच्या त्यांनी केलेल्या पाहणीनुसार, श्रीमंत आणि गरीब राज्यांमधील दरडोई उत्पन्नातील तफावत दरवर्षी फक्त १.५% दराने भरली गेली. या दराने एखाद्या राज्याचे सुरुवातीचे दरडोई उत्पन्न आणि सर्व राज्यांचे दीर्घकालीन सरासरी दरडोई उत्पन्न यातील निम्मी तफावत भरून निघण्यासाठी सुमारे ४५ वर्षांचा कालावधी लागेल. याचाच अर्थ जरी तफावत थोड्या फार प्रमाणात भरून निघायला सुरुवात झाली होती तरी एकंदर पाहता समतोल विकासाच्या उद्दिष्टापेक्षा भारतीय अर्थव्यवस्था खूप दूर होती. खरं तर योजना आयोगाच्या ६ व्या पंचवार्षिक योजनेत 'एरिआ प्लॅनिंग' वर बराच भर देण्यात आला होता; परंतु लक्ष्य गाठण्यात फारसे यश आले नाही.

विवेक दहेजा आणि प्रवीण चक्रवर्ती यांनी 'आर्थिक सुधारणा पूर्व आणि नंतर' अशा मोठ्या कालावधीचा अभ्यास केला. त्यांच्या १९६० ते १९९० मधील पाहणीनुसार, भारताच्या १२ आर्थिकदृष्ट्या सर्वात बलाढ्य राज्यांचे दरडोई उत्पन्न हे सर्व राज्यांच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा खूप जास्त होते आणि या दोघांमधील अंतर कमी होण्याऐवजी वाढत होते म्हणजे उत्पन्नाचे अभिसरण (Convergence) न होता त्यांचे विचलन (Divergence) होत होते. या संशोधकांच्या पाहणीनुसार, जरी अर्थशास्त्रातील सिद्धांतानुसार मोठ्या संघराज्य देशातील विविध प्रांतांतील दरडोई उत्पन्नांमध्ये अभिसरण होणे अपेक्षित असते (Catch up and trickle down effect) तरी भारतातील विविध राज्यांमध्ये असे दिसून येत नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार राज्याराज्यांमधील तफावत ही फक्त दरडोई उत्पन्नाच्या बाबतीतच नसून ती सामाजिक, सांस्कृतिक लोकसांख्यिकी अशा सर्वच बाबतीत आहे. हे सर्व घटकच उत्पन्न विचलनास कारणीभूत आहेत. संशोधकांच्या पाहणीनुसार, राज्याराज्यांतील विचलन १९९१च्या आर्थिक सुधारणांनंतर मोठ्या प्रमाणात वाढले. त्यांच्या पाहणीनुसार, १९९१ ते २०१४ या कालावधीत भारतातील ३ सर्वात श्रीमंत राज्यांचे (महाराष्ट्र, पंजाब, गुजरात) सरासरी दरडोई उत्पन्न गरीब राज्यांच्या दरडोई उत्पन्नांच्या तिप्पट होते.

भारत सरकारच्या अहवालानुसार, २००० साली भारताच्या सर्वात श्रीमंत व राज्यांतील सरासरी दरडोई उत्पन्न सर्वात तळातील राज्यांच्या तुलनेत १४५% आर्थिक होते. २०१०-११ मध्ये ते २८९% होते तर २०१७-१८ मध्ये ते ३३८% जास्त होते.

दुसऱ्या एका पाहणी अहवालानुसार, २००३-०४ मध्ये पश्चिम भारतातील राज्यांचे दरडोई उत्पन्न रु.१३,८१७ होते तर पूर्वेकडील राज्यांचे दरडोई उत्पन्न रु.७०४४ इतके होते. दक्षिणेकडील ४ राज्यांची दरडोई उत्पन्नाची क्रमवारी ५ ते ९ अशी होती. ते श्रीमंत व गरीब राज्यांच्या मधोमध होते. या अहवालानुसार, आर्थिक सिद्धान्ताला छेद देत. (Catch up

hypothesis & trickle down effect शी विसंगत.) महाराष्ट्र व गुजरात या दोन सर्वात श्रीमंत राज्यांच्या लगत असून सुद्धा मध्य प्रदेश हे गरीबच राहिले आणि अशी उदाहरणे भारताच्या सर्वच पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण सर्वच विभागांत दिसतात.

क्रिसिल या पतमानांकन संस्थेच्या जानेवारी २०१९ च्या पाहणी अहवालानुसार, २०१८ च्या वित्तीय वर्षाखेरीपर्यंत राज्याराज्यांतील आर्थिक तफावत विशेषत: दरडोई उत्पन्न तफावत खूप वाढलेली दिसून येते. काही कमी उत्पन्नांच्या राज्यांमध्ये (उदा. बिहार) काही वर्षांना अचानकपणे आर्थिक वृद्धिदरात घसघशीत वाढ दिसून येते. परंतु या वाढीत सातत्य दिसून येत नाही आणि त्यामुळे श्रीमंत राज्यांचे दरडोई उत्पन्न आणि गरीब राज्यांचे सरासरी उत्पन्न यातील तफावत कमी होताना दिसत नाही. या पाहणीनुसार, २००८ ते २०१३ या कालखंडात ही तफावत थोड्या प्रमाणात भरून निघालेली आढळली; परंतु २०१३ नंतर परत वाढली. एका बाजूला कमी उत्पन्न असलेली राज्ये त्यांच्या वृद्धिदरात सातत्य राखू शकली नाहीत तर दुसऱ्या बाजूस श्रीमंत ९ राज्यांपैकी ६ राज्यांनी त्यांची आघाडी सातत्याने कायम ठेवली परिणामत: विकासातील असमतोल वाढत गेला.

भारत सरकारच्या सांख्यिकी आणि उपक्रम अंमलबजावणी मंत्रालयानुसार, चालू वित्तीय वर्षाच्या (२०१९-२०) दुसऱ्या तिमाही अखेर महाराष्ट्र हे भारताच्या ३३ राज्यांपैकी सर्वांत श्रीमंत राज्य ठरले आहे आणि सलग ३ वर्षे महाराष्ट्राने आपला अव्वल क्रमांक १ हा दर्जा टिकवला आहे. भारताच्या एकूण सकल उत्पन्नात एकट्या महाराष्ट्राचे योगदान १४.६९% इतके आहे. तर दुसऱ्या क्रमांकावरील तामिळनाडूचे योगदान ८.२७% आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, ३३ राज्यांपैकी पहिल्या ५ राज्यांचा भारताच्या सकल उत्पन्नातील वाटा ४६.३% इतका आहे. म्हणजे सुमारे १६% राज्ये, ४६% उत्पन्न योगदान देतात तर उर्वरित ८४% राज्य फक्त ५४% योगदान देतात. ईशान्य भारतातील ८ राज्यांचा भारताच्या सकल उत्पन्नातील वाटा फक्त २.८% इतका आहे. यावरून राज्याराज्यांतील उत्पन्नदरी किती मोठी आहे, याची कल्पना येते. या अभ्यासानुसार, १९९१ ते २००४ या काळात पूर्वेकडील राज्ये दरडोई उत्पन्न व सर्वच सामाजिक परिणामांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत मागे होती.

आतापर्यंत आपण राज्यांचे सकल उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न यांच्या आधारे राज्याराज्यांतील विकास असमतोल बघितला. या व्यतिरिक्त उद्योगांचे स्थानीकरण, औद्योगिक उत्पादन व एकूण मूल्यवर्धन

**तक्ता क्र.१**

**सरासरी दरडोई उत्पन्नातील सर्वांत श्रीमंत ५ राज्ये आणि माध्यम राज्ये यातील फरक**

| वर्ष | फरक |
|---|---|
| २०१७-१८ | - |
| २०१०-११ | १०५: |
| २०००-०१ | ५१.१: |

स्रोत- Indian States by GDP - Ministry of Statistics and Programme Implementation.

**तक्ता क्र.२**

**सरासरी दरडोई उत्पनातील सर्वांत श्रीमंत ५ राज्ये आणि सर्वांत गरीब ५ राज्ये यातील फरक.**

| वर्ष | फरक |
|---|---|
| २०१७-१८ | ३३७.७ : |
| २०१०-११ | २८९.३: |
| २०००-०१ | १४४.९: |

स्रोत- Indian States by GDP - Ministry of Statistics and Programme Implementation

ही परिमाणे बघितली. परंतु या आर्थिक निकषांच्या पुढे जाऊन सामाजिक व कल्याणकारी परिमाणाच्या साहय्याने राज्यांच्या विकासाची तुलना केली. तरी चित्र फारसं बदलत नाही म्हणजे प्रादेशिक विकास असमतोल या परिमाणांमधून सुद्धा अधोरेखित होतो. पण त्याचबरोबर काही इतर वैशिष्ट्ये ही समोर येतात. त्यामुळे आता आपण आर्थिक विकास हा सामाजिक, परिणामातून पाहू या.

सामाजिक परिमाणात मुख्यत्वेकरून मानव विकास निर्देशांक, शिक्षण, स्त्रीशिक्षण, लोकसंख्या वैशिष्ट्ये, आरोग्य, प्रशासकीय कार्यक्षमता यांचा समावेश केला आहे.

कुठल्याही राष्ट्राची खरी संपत्ती म्हणे त्या राष्ट्राचे नागरिक. त्यामुळे मानव विकास निर्देशांक आणि आर्थिक विकास यांची सांगड घालणे आवश्यक आहे.

विविध अभ्यासानुसार तज्ज्ञांनी असा निष्कर्ष काढला आहे की, मानव विकास निर्देशाकांतील १ गुणाची वाढ सुद्धा दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येमध्ये ०.६२ इतकी घट करते. त्या दृष्टीने खालील तक्ता खूप बोलका आहे.

उपरोक्त माहितीनुसार, भारतातील कमी सकल आणि दरडोई उत्पन्नाच्या राज्यांनी मानव विकास निर्देशांकात गेल्या ३ वर्षांत भरीव कामगिरी केलेली दिसते आणि ही सर्व राज्ये माध्यम मानवविकास पातळीवर आलेली आहेत. परंतु पहिल्या ३ क्रमवारींच्या राज्यांपेक्षा त्यांना अजून खूप पल्ला गाठायचा आहे. या काळात जरी राज्याराज्यांमधील दरडोई उत्पन्न तफावत वाढली असली तरी मानव विकास निर्देशांकातील तफावत कमी झाली. त्यातही २०१५ ते २०१७ ह्या २ वर्षांत मानव विकास निर्देशांकात जास्त झपाट्याने सुधारणा झालेली दिसते. केंद्र सरकारने राबवलेल्या आयुष्यमान भारत सारख्या योजनांचा हा परिणाम असू शकतो. या दृष्टीने काही राज्यांची आयुष्यमान भारत आणि मुलगे आणि मुले यांचे जन्मदर गुणोत्तर यातील कल पाहाणे महत्त्वाचे ठरेल. २०१८ या आर्थिक वर्षांत आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या राज्यात पहिली चार राज्ये आहेत. पंजाब, हरियाणा, आसाम आणि केरळ तर नुकत्याच जाहीर झालेल्या (SRB-SEX RATIO AT BIRTH) म्हणजे जन्माच्या वेळी मुलगे व मुली यांचे गुणोत्तर या मापदंडावर हरियाणा, उत्तराखंड, दिल्ली, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांची कामगिरी अव्वल ठरली. २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीत या गुणोत्तरात १३ गुणांची सुधारणा झाली. केंद्र सरकारच्या 'बेटी बचाव बेटी पढाव' या कार्यक्रमांतर्गत या राज्यांनी जनभागीदारीच्या माध्यमातून ही किमया साधली.

**तक्ता क्र.३**

**निवडक राज्यांचे मानव विकास निर्देशांक (२००५, २०१०, २०१५, २०१७)**

| रँक | राज्ये | HDI 2005 | HDI 2010 | HDI 2015 | HDI 2017 |
|---|---|---|---|---|---|
| १. | केरळ | ०.६९४ | ०.७३२ | ०.७७० | ०.७९० |
| २. | गोवा | ०.६८४ | ०.७५१ | ०.७६३ | ०.७६४ |
| ३. | पंजाब | ०.६२० | ०.६६४ | ०.७०६ | ०.७२१ |
| ४. | हिमाचल प्रदेश | ०.६५३ | ०.६७५ | ०.७०६ | ०.७२० |
| ५. | तमिळनाडू | ०.६०५ | ०.६५५ | ०.६९४ | ०.७०८ |
| ६. | हरियाणा | ०.५९४ | ०.६३९ | ०.६८७ | ०.७०४ |
| ७. | महाराष्ट्र | ०.६०७ | ०.६५१ | ०.६८३ | ०.६९५ |
| ८. | कर्नाटक | ०.५६७ | ०.६१० | ०.६६२ | ०.६८२ |
| ९. | उत्तराखंड | ०.६५५ | ०.६४३ | ०.६६२ | ०.६७७ |
| १०. | गुजरात | ०.५७३ | ०.६०८ | ०.६५१ | ०.६६७ |
| ११. | तेलंगणा | ०.६५५ | ०.६४३ | ०.६५१ | ०.६६४ |
| १२. | आंध्रप्रदेश | ०.५२९ | ०.५८१ | ०.६२७ | ०.६४३ |
| १३. | पश्चिम बंगाल | ०.५४० | ०.५७६ | ०.६२० | ०.६३७ |
| १४. | राजस्थान | ०.५०५ | ०.५४७ | ०.६०१ | ०.६२१ |
| १५. | छत्तीसगड | ०.५८१ | ०.५७० | ०.५८६ | ०.६०० |
| १६. | ओरिसा | ०.४८९ | ०.५३३ | ०.५८० | ०.५९७ |
| १७. | मध्यप्रदेश | ०.४९३ | ०.५३३ | ०.५७७ | ०.५९४ |
| १८. | झारखंड | ०.५८३ | ०.५७२ | ०.५७८ | ०.५८९ |
| १९. | उत्तर प्रदेश | ०.४९६ | ०.५२९ | ०.५६६ | ०.५८३ |
| २०. | बीहार | ०.४६४ | ०.५११ | ०.५५१ | ०.५६६ |
| | भारत | ०.५३६ | ०.५८१ | ०.६२४ | ०.६४२ |

स्रोत- i) Shobha K and Ambiga Devi P. - Inter State Disparities in India : Linkages between Human Development and Economic Indicators.

विशेषत: हरियाणा राज्याने या क्षेत्रात भरपूर सुधारणा केल्याचे दिसते. २००१ च्या जनगणनेनुसार, हरियाणामध्ये हे गुणोत्तर १०००:८१९ इतके कमी होते. २०११ मध्ये ते १०००:८३४ एवढे होते आणि हरियाणा हे सगळ्यात शेवटच्या क्रमांकावर होते. परंतु NFHS राष्ट्रीय कौटुंबिक पाहणीनुसार २०१७-१८ मध्ये गुणोत्तर १०००:९१४ इतके झाले.

२०११ मध्ये भारतातील १० राज्ये ही मध्यम मानव विकास गटात होती. तर ९ राज्ये ही निम्न मानव विकास गटात होती. यूएनडीपीने भारतात २०११ साली केलेल्या पाहणीअंती उत्पन्न विषमता लक्षात घेऊन दोन प्रकारच्या मानव विकास निर्देशांकांची मांडणी केली. प्रचलित निर्देशांकाव्यतिरिक्त विषमतानुलक्षी (Inequality Adjusted HDI)

मानव विकास निर्देशांकांची राज्यनिहाय सूची तयार केली. त्यानुसार मध्यम मानवविकास गटातील राज्यांमध्ये या दोन्ही निर्देशाकांतील तफावत सुमारे २८% इतकी होती. तर निम्न मानव विकास राज्यांमध्ये हेच नुकसान सुमारे ३३% इतके होते. म्हणजे या राज्यांचे दुहेरी नुकसान होते किंवा त्यांच्यातील कमतरता, वैगुण्य दिसतात त्यापेक्षा जास्त प्रखर होती, असे म्हणावे लागेल आणि ही विषमता आणि त्याची प्रखरता सर्वात जास्त शिक्षण क्षेत्रात होती.

या सगळ्या अभ्यास पाहणीचा मुख्य निष्कर्ष असा आहे की, आर्थिक वा सामाजिक कुठल्याही निकषावर सुमार कामगिरी असलेल्या गरीब राज्यांची मुख्य अडचण अशी आहे की, ही राज्ये, दरडोई भांडवली निवेश मग तो मानव संसाधन विकास असो की स्थूल भांडवल असो जास्त प्रमाणात करू शकत नाहीत आणि त्यामुळे विषमतेचे एक दुष्चक्र तयार होते. अशा राज्यांची महसूल उभारण्याची क्षमता देखील फार मर्यादित असते त्यामुळे हे दुष्टचक्र भेदणे त्यांना शक्य होत नाही. ह्या राज्यांची शिक्षण व आरोग्य ह्या क्षेत्रातील खर्च क्षमता आणि खर्च खूपच कमी आहे आणि श्रीमंत राज्याच्या तुलनेत ही राज्ये शिक्षण व आरोग्य ह्या क्षेत्रांवर खर्च आणि गुंतवणूक करण्यात खूपच मागे पडलेली दिसतात. केंद्र सरकारच्या अनेकविध कल्याणकारी योजना आणि खासकरून विषमता/प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी तयार केलेल्या योजनांचा लाभ ही राज्ये घेऊ शकलेली दिसत नाहीत आणि त्यामुळे राज्याराज्यांमध्ये अभिसरण होण्याऐवजी विचलन झालेले दिसते.

क्रिसील या पतनामांकन संस्थेच्या अभ्यास पाहणीनुसार, राज्य सरकारांनी केलेल्या खर्चावर विशेषत: भांडवली खर्चावर राज्याचे सकल स्थूल उत्पन्न मोठ्या प्रमाणावर अवलंबून दिसते. विशेषत: २०१७, २०१८ मध्ये बिहार आणि आंध्रप्रदेशासंबंधी असे दिसून येते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अभ्यास पाहणीनुसार, केंद्र सरकारकडून राज्य सरकारांना मिळणाऱ्या आर्थिक अनुदानामुळे राज्यांमधील दरडोई वास्तव आणि वापरण्यासाठी उपलब्ध उत्पन्नामधील विचलन राज्यांमधील वास्तव दरडोई उत्पन्न विचलनापेक्षा कमी राखण्यास मदत झाली आहे. कृष्णा चैतन्य वादलामन्नती यांच्या भारतातील ३२ राज्यांच्या १९९१ ते २०१० या कालावधीत केलेल्या अभ्यासानुसार, आर्थिक सुधारणानंतरच्या कालखंडामध्ये भारतामध्ये उदयाला आलेली बाजारप्रणित अर्थव्यवस्था ही मुख्यत्वे राज्यपातळीवरून पुढे नेली जात आहे. आजमितीला देशांतील एकूण भांडवली खर्चात राज्य सरकारचा वाटा सुमारे ४५% आहे. २०१५ पूर्वी तो ३०% होता. केंद्र व राज्य सरकारमधील वित्तीय संबंध, त्यांची भूमिका यात खूपच बदल झाला आहे.

एकूणच खा-उ-जा रचनेमध्ये केंद्र सरकारचा विविध आर्थिक क्षेत्रावरील प्रभाव व ताबा कमी कमी होत गेला आहे. सरकारची भूमिका ही सुलभ संयोजक(Facilitator) अशी झाल्यामुळे राज्य सरकारची धोरणे, अंमलबजावणी आणि राज्य आणि स्थाानिक पातळीवर कारभाराचे सुलभीकरण महत्त्वाचे ठरू लागल्यामुळे राज्याच्या आर्थिक कामगिरीवर राज्य सरकारच्या ध्येयधोरणांचा प्रभाव वाढत गेला आहे. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्राची भूमिका आणि प्रभाव क्षेत्र कमी झाल्यामुळे राज्यांवरील केंद्र सरकारची वित्तीय पकड व त्यातून होणारा लाभ (Financial / Leaveraging) कमी होऊन राज्य सरकारची भूमिका महत्त्वाची झाली. त्यापूर्वी केंद्र सरकार आपल्या वित्तीय शक्तीचा फायदा राजकीय लाभात बदलण्यासाठी या निकषांनुसार निवेश धोरण ठरवित असे, असा दावा

**तक्ता क्र.४**

**निवडक राज्यांचा विषमतानुलक्ष्मी मानव विकास निर्देशांक (माविनि) यूएनडीपी २०११**

| राज्य | मानव विकास निर्देशांक | विषमता नुलक्षी माविनि | गुणोत्तर | नुकसान | माविनि क्रमावरी | विषमता नुलक्षी माविन क्रम | फरक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ०.४८५ | ०.३३२ | ०.६८५ | ३१.५५ | ११ | १२ | -१ |
| गुजरात | ०.५१४ | ०.३६३ | ०.७०५ | २९.५० | ८ | ७ | १ |
| हरियाणा | ०.५४५ | ०.३७५ | ०.६८८ | ३१.१८ | ५ | ६ | -१ |
| कर्नाटक | ०.५०३ | ०.३५३ | ०.६९६ | ३०.४४ | १० | ९ | १ |
| केरळ | ०.६२५ | ०.५२० | ०.८३२ | १६.७८ | १ | १ | ० |
| मध्यप्रदेश | ०.४५१ | ०.२९० | ०.६४३ | ३५.७४ | १६ | १९ | -३ |
| महाराष्ट्र | ०.५४९ | ०.३९७ | ०.७२२ | २७.७५ | ४ | ४ | ० |
| पंजाब | ०.५६९ | ०.४१० | ०.७२० | २८.०४ | २ | २ | ० |
| राजस्थान | ०.४६८ | ०.३०८ | ०.६६० | ३४.०२ | १४ | १३ | १ |
| तामिळनाडू | ०.५४४ | ०.३९६ | ०.७२७ | २७.२८ | ६ | ५ | १ |
| उत्तर प्रदेश | ०.४६८ | ०.३०७ | ०.६५५ | ३४.४७ | १३ | १५ | -२ |
| प. बंगाल | ०.५०९ | ०.३६० | ०.७०७ | २९.३० | ९ | ८ | १ |
| भारत | ०.५०४ | ०.३४३ | ०.६८० | ३२.०० | - | - | - |

स्रोत- Suryanarayana M.H., Agarwal Ankush and Prabhu Seeta - Inequality Adjisted Human Development Index for India's States 2011, UNDP India 2011.

खेमेनी (२००७) आणि अरूलमपालम (२००९) यांनी त्यांच्या अभ्यासात मांडला आहे. परंतु गेल्या दोन दशकात ही परिस्थिती झपाट्याने बदलून एक नवीन रचनात्मक ढाचा केंद्र आणि राज्य सरकारच्या परस्परसंबंधाबाबतीत तयार होताना दिसत आहे आणि त्याचे दूरगामी परिणाम राज्यांच्या आणि पर्यायाने आर्थिक विकासावर होणे साहाजिक आहे.

### केंद्र व राज्य परस्परसंबंध

स्वातंत्र्योत्तर काळात आपण 'संघराज्य सदृश्य' व्यवस्था स्वीकारली. आपल्या राज्यघटनेमध्ये कुठेही 'संघराज्य हा शब्द प्रयोग नाही' परंतु केंद्र व राज्य सरकार यांच्या परस्परसंबंधांचा, प्रभावक्षेत्र, कार्यक्षेत्र, कर लादण्याचे अधिकार, प्रशासकीय अधिकार याबाबत आपल्या राज्यघटनेनुसार ज्या तरतुदी आहेत त्यानुसार आपली व्यवस्था संघराज्यात्मक होते. म्हणून कायदेतज्ज्ञ फेली नरिमन यांच्या मते ही रचना संघराज्य सदृश्य

(Quasi Federal) अशी होते. केंद्र व राज्य सरकारे यांच्यामधील सहसंबंधानुसार दोन प्रकारच्या संघराज्य पद्धती विस्तारित झाल्या. एक म्हणजे सहकारी संघराज्य प्रणाली (Co-operative federalism) आणि दुसरी म्हणजे स्पर्धाशील संघराज्य प्रणाली (Competitive federalism) पहिल्या सुमारे ५ दशकात सहकारी संघराज्य पद्धती वापरात आली; परंतु गेल्या २ दशकांत हळूहळू स्पर्धाशील किंवा स्पर्धात्मक संघराज्य प्रणालीचा उदय होऊ लागला आहे.

**सहकारी संघराज्य प्रणाली**

केंद्र व राज्य सरकारांमध्ये उतरंड आणि राज्य सरकारांमध्ये समतल.

यामध्ये मध्यवर्ती केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यात परस्परावलंबी समतल समांतरता अपेक्षित असते. दोन्ही पातळीवरील सरकारांनी एकत्र येऊन व्यापक देशहिताच्या दृष्टीने ध्येयधोरणे ठरविणे व राबविणे अपेक्षित असते. परंतु असे असले तरी सत्ता आणि संसाधने विशेषत: कराधिकार यांचे पारडे केंद्र सरकारच्या बाजूने जास्त झुकलेले असते. त्यामुळे या संबंधात 'मोठा भाऊ छोटा भाऊ' तत्त्वानुसार मोठ्या भावाने द्यायचे, ठरवायचे (दिशा, उपक्रम, संसाधने) व छोट्या भावाने घ्यायचे (उपक्रम, तरतुदी, अंमलबजावणी, स्वीकृती) अशी प्रणाली विकसित होते. यामध्ये राज्य सरकारे समतल पातळी राखतात यामध्ये संविधानातील परिशिष्ट ७ नुसार केंद्र आणि राज्य सरकारांनी परस्पर सहकार्य करणे जरुरीचे आहे.

**स्पर्धात्मक संघराज्य प्रणाली**

या प्रणाली अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकारे एकमेकांशी स्पर्धा करतात. अर्थात या प्रणालीत ही राष्ट्रीय उद्दिष्ट्ये समान असतात. व्यापक देशहित साधणे, आर्थिक विकास हेच उद्दिष्ट असते. परंतु एकमेकांशी स्पर्धा करत हे उद्दिष्ट्ये साधने अभिप्रेत असते. 'एकच सदरा सगळ्यांच्या मापाला बरोबर' बसविण्याऐवजी प्रत्येक राज्य स्वत:च्या आवश्यकतेनुसार आणि राज्याच्या प्राथमिकतेनुसार आपआपले प्राधान्यता क्रम ठरवून राज्यनिहाय ध्येयधोरणे ठरवितात. प्रत्येक राज्य स्वत:चा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवते आणि त्यासाठी धोरणे आखून ती राबवली जातात. त्यासाठी लागणारी वित्तीय संसाधने स्वत:च उभारतात. गुंतवणूकदारांना आपल्या राज्याकडे आकर्षित करण्यासाठी राज्य सरकारे एकमकांशी स्पर्धा करतात. 'रेस टू टॉप' शिखर गाठण्याची स्पर्धा, जास्तीत जास्त सुविधा, सवलती, पायाभूत सुविधा उपलब्धता, स्नेहपूर्ण किंवा उद्योगस्नेही ध्येयधोरणे, महिलासक्षमीकरण धोरणे राबवून अशी स्पर्धा अधोरेखित होते अशा सशक्त स्पर्धेतून, सक्षमीकरण, सबलीकरण होऊन राज्यांतर्गत पायाभूत भांडवल, सामाजिक भांडवल वाढवून गुंतवणूकदार आकर्षित केले जातात आणि राज्याचा व पर्यायाने देशाचा विकास साधला जातो.

बाजारपेठप्रणित अर्थव्यवस्थेमध्ये अशा तौलनिक लाभाद्वारे (Comparative advantage) स्पर्धा अधिकाधिक तीव्र होते. १९९१च्या आर्थिक सुधारणानंतर हा कल आपल्याकडे रुजायला सुरुवात झाली.

खरं तर स्पर्धात्मक संघराज्य ही संकल्पना भारतीय संविधानाचा मूळ ढाच्यात नाही तर हा संसद आणि कॅबिनेट (सरकार) यांनी संमतीने केलेला बदल आहे. राज्य सरकारांना विस्तृत राष्ट्र उद्दिष्टांच्या कक्षेत राहून पण जास्तीत जास्त स्वायत्तता देऊन त्यांच्या प्राधान्यता क्रमानुसार आणि उपलब्ध संसाधनानुसार विकसित होण्याची मोकळीक यातून मिळते.

आधी म्हटल्याप्रमाणे सद्यपरिस्थितीत आर्थिक सुधारणा पुढे नेण्याची जबाबदारी मुख्यत्वे राज्य

सरकारांवर आहे. केंद्र सरकारचे बरेचसे चाप शिथिल तर झाले आहेतच; शिवाय गुंतवणूक विशेषत: पायाभूत सुविधांची तरतूद, प्रशासकीय कार्यक्षमता आणि इतर सामाजिक आणि तांत्रिक भांडवल ज्याला आपण सॉट इन्फ्रास्ट्रक्चर म्हणतो, त्यासाठी वित्तीय स्त्रोत उभारणे, गुंतवणूकदारांना आपल्याकडे आकर्षित करणे यासाठी विविध राज्य सरकारांमध्ये स्पर्धा सुरू होणे, अनिवार्यच होते.

या सगळ्या राज्यांमध्ये 'रेस टू बॉटम कर, पर्यावरण कायद्यांबद्दलच्या तरतुदींमध्ये शिथिलीकरण स्पष्ट दिसून येते. या संदर्भात परकीय गुंतवणुकीसंबंधात विविध संशोधकांच्या मते अशी स्पर्धा सुरू झाल्याचे दाखले बरेच दिसत असले तरी त्यांच्या परकीय गुंतवणुकीवर झालेल्या परिणामांचे ठोस पुरावे म्हणावे तितके दिसून येत नाहीत. अर्थात त्यामुळे राज्यांमधील स्पर्धा कमी होताना दिसत नाही. तरीही एकंदर स्पर्धात्मक संघराज्य प्रणालीची रुजवात या काळात जोमाने झाल्याचे दिसून येते.

**केंद्र सरकारची भूमिका**

१९९१ च्या सुधारणांनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत ढाचात्मक (Structure) असे बरेच बदल झाले. हे बदल आपण सहसा क्षेत्रनिहाय सकल स्थूल उत्पन्नात होणारा बदल किंवा रोजगार निर्मितीत क्षेत्र निहाय असणारे अपेक्षित बदल, चलनाची परिवर्तनीयता, बाजारपेठाधिष्ठित व्याजदर, वित्तीय क्षेत्रातील खुलेपणा या संदर्भात जास्त पाहतो, तसेच प्रादेशिक क्षेत्रनिहाय होणारे उद्योगधंद्यातील स्थानिकरण, प्रादेशिक आर्थिक असमतोलातील वाढ विषमतेतील वाढ असे परिणाम स्वरूप अनुभवतो. परंतु ह्या बदलांमागचे जे सूत्र (Mechanism) मग ते आर्थिक असो वा राजकीय अर्थव्यवस्थात्मक (Political Economy) असो अभावानेच पाहतो. त्या दृष्टीने स्पर्धात्मक संघराज्य प्रणालीकडे बघणे आवश्यक आहे.

अशा स्पर्धात्मक संबंधांची सुरुवात एन.डी.ए च्या कारकिर्दीपासून जोमाने झाली असे म्हणायला वाव आहे. २०१५ मध्ये पंतप्रधान मोदींनी जे महत्त्वाचे धोरणात्मक आणि मूलगामी बदल केले ते याची साक्ष देतात. एक म्हणजे ६५ वर्षे अस्तित्वात असलेला योजना आयोग बरखास्त झाला आणि त्या जागी नीती आयोगाची स्थापना केली गेली. तसेच 'मेक इन इंडिया' अंतर्गत फक्त कारखानदारीलाच चालना दिली असे नव्हे; तर राज्य सरकारांनी पुढाकार घेऊन आपआपल्या राज्यांमध्ये उद्योग स्नेही धोरणे, वातावरण तयार करण्यासाठी काही नावीन्यपूर्ण ठोस उपाययोजना सुरू केल्या. यातल्या बऱ्याचश्या योजना ह्या राज्याराज्यांत स्पर्धात्मकता वाढवून त्याद्वारे कार्यक्षमता सुधारण्यावर भर देणाऱ्या होत्या. खरं तर नीती आयोगाच्या स्थापनेमागचा एक हेतू म्हणजे स्पर्धात्मक संघराज्य प्रणालीला चालना देणे हा होता. योजना आयोगाच्या 'एक सदरा सगळ्यांच्या मापाचा' या दृष्टिकोनातून विविध राज्यांच्या गरजा, प्राधान्य प्राथमिकता, संसाधन उपलब्धता याचा म्हणावा तितका आणि परिणामकारक विचार झाला नाही. 'वरून खाली' हस्तांतरित होणाऱ्या ध्येयधोरणांमध्ये ही त्रुटी स्वाभाविकपणे राहतेच. त्यामुळे नीती आयोगाअंतर्गत हा दृष्टिकोन बदलून राज्यांना जास्त स्वायत्ता मिळावी हा हेतू आहे. त्या दृष्टीने एका बाजूने राज्यांना ध्येयधोरणे निश्चित करण्याच्या प्रक्रियेत जास्त क्रियाशील सहभाग वाढविण्यास प्रोत्साहन देणे आणि दुसऱ्या बाजूला ती स्वायत्तता परिणामकारकरित्या वापरता यावी यासाठी स्पर्धेच्या माध्यमातून जास्त सक्षम बनविणे हा प्रयत्न दिसतो. योजना आयोग आणि नीती आयोग यामधला हा एक फरक, दुसरे म्हणजे योजना आयोगाला संसाधने उभारून तिचे

वाटप करण्याचा अधिकार होता. वित्तीय पाठबळ आणि उद्दिष्ट होती. नीती आयोगाकडे मात्र असे वित्तीय पाठबळ किंवा वित्तीय उद्दिष्टे नाहीत तर विकसित भारताचे एक मोठे दृश्यचित्र (Vision) आहे. या चित्राच्या चौकटीत राज्यांनी आपापली धोरणे आखणे, उद्दिष्ट गाठणे अपेक्षित आहे.

या नव्या चौकटीत राज्य सरकारांना केंद्र सरकारकडे वित्तीय मदतीसाठी किंवा धोरण निश्चितीसाठी हात पसरावे लागणार नाहीत. राज्य सरकारे स्वतंत्रपणे आपली ध्येयधोरणे राबवू शकतात आणि त्यासाठी त्यांचे वित्तीय सक्षमीकरण वित्त आयोगातर्फे व्हावे म्हणून २०१५ साली १४ व्या वित्त आयोगाने सुचविलेले कर महसुलांचे वाटप केंद्र सरकारने मान्य करून केंद्राच्या कर संकलनातील राज्य सरकारांचा वाटा ३२ टक्क्यांवरून ४२% इतका घसघशीतपणे वाढवला आणि हा वाटा स्वत:च्या प्राधान्यताक्रमापणे खर्च करण्याची मुभा राज्यांना आहे.

राज्य सरकारांना त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार या विविध योजनांमध्ये सहभागी होता यावे म्हणून १४व्या वित्त आयोगाने महसूल विभागणीत काही महत्त्वाचे बदल केले. त्यानुसार २०१५ पूर्वी केंद्र सरकारकडून राज्य सरकारकडे हस्तांतर होणाऱ्या निधींमध्ये जास्त भर विशिष्ट योजनेच्या पूर्तीवर होता आणि सर्वसाधारण हस्तांतरण (General Transfer) कमी प्रमाणात होत होते. एक प्रकारे हा (Tied Aid) सांगड घातलेला निधी होता. असे हस्तांतरण कधी कधी राज्य सरकारच्या प्राधान्यता क्रमाला छेद देणारे ठरत असे. त्यामुळे राज्य सरकारच्या खर्चावर एक प्रकारे मर्यादा येत असे. परंतु १४ व्या वित्त आयोग्याच्या शिफारशीनुसार, सरसकट निधी हस्तांतरणाचे प्रमाण कमी झाले. एक प्रकारे ही राज्य सरकारांना जास्त स्वायत्तता देणारी शिफारस आहे. म्हणजेच आज घडीला आपल्या संघराज्यामध्ये सहकारी संघराज्य संकल्पना आणि स्पर्धाशील संघराज्य संकल्पना यांचा एक मिलाफ दिसतो आणि येणाऱ्या काळात प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी तो एक कळीचा मुद्दा ठरू शकतो.

याचा एक दृश्य परिणाम म्हणजे राज्यांनी त्यांच्या प्राधान्यता क्रमाप्रमाणे वेगवेगळ्या क्षेत्रांवर राज्य सरकारच्या अर्थसंकल्पनातून केलेला खर्च प्रत्येक राज्य त्यांच्या प्राधान्य क्रमानुसार क्षेत्र निवडून राज्याच्या अर्थसंकल्पाद्वारे खर्च करते.

अनुशेष भरून काढण्यासाठी त्या त्या राज्यांचे प्राधान्यक्रम दिसतात. छत्तीसगढ, झारखंड, ओरिसा, बिहार ही राज्ये हिरिरीने आर्थिक सुधारणा, खुलेपणा पायाभूत व सामाजिक भांडवल निर्मितीसाठी आपापल्या अर्थसंकल्पात भरघोस तरतुदी करताना दिसतात. उत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांना 'पुरस्कार' तर सुमार कामगिरी करणाऱ्या राज्यांना 'दंड' ह्या बाजारपेठेच्या सूत्रानुसार नीती आयोगाकडून वेगवेगळ्या मापदंडावर राज्यांची/ राज्यांमधील उपक्रम व फलित यांची पडताळणी केली जाते, त्यानुसार पुढील आर्थिक वर्षाची वित्तीय मदत सरकारतर्फे केली जाते. एकूण निर्देशित मदतीच्या २०% मदत अशा प्रकारे कामगिरीशी जोडली आहे. २०१७-१८ मध्ये नीती आयोगाच्या पडताळणीनुसार प. बंगाल, बिहार, उत्तराखंड, छत्तीसगड या राज्यांची आयुष्यमान भारत योजने अंतर्गत कामगिरी फारच सुमार होती. याचाच परिणाम म्हणून त्या पुढील वर्षात प.बंगाल व छत्तीसगडने आरोग्याला प्राधान्यताक्रम दिला असल्याचे सांगितले. केंद्राने अनुदानित केलेल्या योजनांमध्ये राज्य सरकारांना त्यांच्या स्थानिक आवश्यकतेनुसार आणि प्राधान्यक्रमानुसार बदल करण्यास केंद्र सरकारने मुभा दिलेली आहे.

**तक्ता क्र.५**

**विविक्षीत कारणासाठी आणि सर्वसाधारण निधी हस्तांतरण कल.**

| वर्ष | सर्वसाधारण हस्तांतरण | विशिष्ट कारणासाठी | एकूण चालू खात्यावर हस्तांतरण | विशिष्ट आणि सर्वसाधारण निधीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ३.६३ | १.९७ | ५.६० | ६४.७८ |
| २०१२-१३ | ३.६१ | १.६३ | ५.२४ | ६८.८९ |
| २०१७-१८ BE | ४.६१ | १.८० | ६.४१ | ७१.९३ |

Source : Budget documents of the Union Government.

**तक्ता क्र.६**

**राज्याच्या एकूण खर्चांपैकी पायाभूत सुविधा / सामाजिक भांडवल या क्षेत्रांमध्ये सर्वांत जास्त खर्च करणारी पहिल्या तीन क्रमांकाची राज्ये.**

| | **क्षेत्र** | **पहिल्या क्रमांकाचे राज्य** | **दुसऱ्या क्रमाकांचे राज्य** | **तिसऱ्या क्रमाकांचे राज्य** |
|---|---|---|---|---|
| १. | रस्ते व पूल बांधणी | ओरिसा | झारखंड | छत्तीसगड |
| २. | आरोग्य | केरळ | छत्तीसगढ | पश्चिम बंगाल |
| ३. | शिक्षण | छत्तीसगढ | महाराष्ट्र | केरळ |
| ४. | सिंचन | तेलंगण | आंध्रप्रदेश | ओरिसा |
| ५. | गृह | मध्यप्रदेश | छत्तीसगढ | बिहार |
| ६. | सामाजिक सुरक्षा | पश्चिम बंगाल | आंध्रप्रदेश | हरियाना |
| ७. | नागरी विकास | गुजरात | पश्चिम बंगाल | हरियाना |
| ८. | ग्रामीण विकास | झारखंड | बिहार | पश्चिम बंगाल |

Source : Crisil Report 2019.

अर्थात हे सर्व बदल राष्ट्रीय उद्दिष्टांच्या चौकटीत बसणारे हवेत. त्यासाठी राज्य सरकारांना अधिकाधिक स्वातंत्र्य आणि स्वायत्ता देत असतानाच राजस्व शिस्तीचे मानदंडही घालून दिले आहेत. त्यासाठी राज्य सरकारला त्यांच्या राज्य स्थूल सकल उत्पन्नाच्या ३% पर्यंतच तुटीची मर्यादा राखणे आवश्यक आहे. ही मर्यादा सरसकट सर्वच राज्यांसाठी आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या वित्तीय उद्दिष्टांसाठी त्यांना खाजगी भांडवल व उद्योगधंद्याची नितांत आवश्यकता असते. त्यामुळेच राज्य सरकारमध्ये परस्पर स्पर्धा वाढून जास्तीत जास्त गुंतवणूक आणि जास्तीत जास्त उद्योगधंदे आपल्या राज्यात खेचून आणण्याची चढाओढ

सुरू आहे. उद्योगधंद्यांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी धोरणे व त्यांची अंमलबजावणी 'उद्योगस्नेही' असणं आवश्यक आहे हे ओघानेच आले. त्यामुळे कुठली राज्ये जास्त उद्योग स्नेही आहेत, कुठल्या सुविधा कुठल्या राज्यात किती प्रमाणात आहेत. अशा सुविधा पुरविण्यासाठी आर्थिक सुधारणा करण्यात किती आणि कोणती राज्ये तयार आहेत याचा वार्षिक लेखाजोखा ठेवण्याचे सरकारने ठरविले आणि २०१५ पासून जागतिक बँकेच्या साहाय्याने हे गुणपत्रक तयार करायला सुरुवात केली. ह्या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक राज्याने काही प्रमुख बाबींबद्दल आपला वार्षिक 'सुधारणा कार्यक्रम' जाहीर करणे आवश्यक आहे. राज्याने दरवर्षी बिझनेस रिफॉर्म ॲक्शन प्लॅन आणि बिझनेस रिफॉर्म ॲक्शन मंडळ स्थापन करून वर्षाच्या शेवटी आपण या योजना किती आणि कशा पूर्णत्वास आणल्या ही माहिती एका विशिष्ट मसुद्यात वाणिज्य मंत्रालय आणि जागतिक बँक यांच्याकडे पाठवयाची असते. ती पडताळून जागतिक बँक प्रत्येक राज्यांचे गुणपत्रक/ प्रगतिपुस्तक तयार करते आणि त्यानुसार राज्यांची क्रमवारी ठरविण्यात येते. पहिल्या वर्षी म्हणजे २०१६ साली कुठल्याच राज्यांची ७०%पेक्षा जास्त पूर्तता होऊ शकली नाही. २०१८ साली मात्र १८ राज्यांनी १००% पूर्तता झाल्याचा दावा केला. तो पडताळून ७ राज्यांचे गुणपत्रक ९०% ते ९८% पर्यंत पोहचल्याचे दिसते आणि त्यानुसार 'उद्योगस्नेही' राज्यांची क्रमवारी कशी आहे आणि गेल्या ४ वर्षांत त्यांच्यात काय बदल झाले आहेत हे तक्ता क्र. ७ वरून स्पष्ट होईल.

छत्तीसगढ, झारखंड, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तरप्रदेश या राज्यांची कामगिरी खास नजरेत भरणारी आहे. ही सगळी राज्ये एकेकाळी 'बिमारू' म्हणून हेटाळल्या जाणाऱ्या प्रदेशांचा भाग होती. आजमात्र आपली मरगळ झटकून सुधारणा राबविण्यासाठी तत्परतेने पुढे येताना दिसत आहेत.

राज्याराज्यांतील स्पर्धा वाढवून गुणवत्ता वाढविणे आणि विकास साधणे या हेतूने केंद्र सरकारमार्फत स्वच्छता सर्वेक्षण मानांकन, प्रशासन, कुशलता मानांकन वगैरे बरेच नावीन्यपूर्ण उपक्रम सध्या राबवले जात आहेत. सर्व राज्ये त्यात हिरिरीने भाग घेत आहेत तर त्यांची कामगिरी लोकांपुढे व पर्यायाने गुंतवणूकदारांपर्यंत पोहचवण्यासाठी केंद्र सरकार सर्वत्र प्रयत्न करीत आहे.

२०१७ मध्ये केंद्र सरकारने या बाबतीत आणखी एक पाऊल उचलले. ते म्हणजे राष्ट्रीय उत्पादकता समिती व UNDP यांना मिळून 'इझ ऑफ डूईंग' बिझनेसचे गुणपत्रक लक्षित प्रेक्षकांकडे खेचून घ्यायचे. जेणेकरून गुंतवणूकदार व इतर निगडित घटकांकडे ती माहिती पोहचवून त्यांच्या निर्णयप्रक्रियेत मदत व्हावी.

नीती आयोगाचे अमिताभ कांत यांच्या म्हणण्यानुसार स्पर्धात्मकता आणि त्यातून येणारी कार्यक्षमता ही सांगड काळाच्या परिप्रेक्षात यशस्वी ठरली आहे. पूर्वी या संकल्पना फक्त खाजगी क्षेत्रासाठी वापरल्या जात होत्या; पण सद्यस्थितीत त्या प्रादेशिक स्पर्धात्मकतेच्या संदर्भातही उपयुक्त ठरत आहेत. अशा प्रकारची स्पर्धात्मकता राज्य सरकारांमध्ये भिनवणं ही आजची गरज आहे. त्याच अनुषंगाने केंद्र सरकारने नीती आयोगाच्या मदतीने त्यांच्या सर्व योजनांचे पुनःर्गठण करून केंद्र प्रायोजित एकूण २८ योजना कोअर योजना म्हणून जाहीर केल्या त्यातील ६ कोअर ऑफ द कोअर आहेत ज्यात प्रधानमंत्री आवास योजना, मनरेगा, सर्वशिक्षण अभियान, स्वच्छ भारत, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, अटल पेन्शन योजना, आयुष्यमान भारत यांसारख्या योजनांचा समावेश होतो.

**तक्ता क्र.७**

**राज्यनिहाय उद्योगस्नेह व सुलभीकरण क्रमवारी**

| राज्य/केंद्रशासित प्रदेश | २०१६ | | २०१७ | | २०१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Score** | **Rank** | **Score** | **Rank** | **Score** | **Rank** |
| आंध्रप्रदेश | ७०.१२ | २ | ९८.७८ | १ | ९८.३ | १ |
| आसाम | १४.४८ | २२ | १४.२९ | २४ | ८४.७५ | १७ |
| बिहार | १६.४१ | २१ | ७५.८२ | १६ | ८१.९१ | १८ |
| छत्तीसगढ | ६२.४५ | ४ | ९७.३२ | ४ | ९७.३१ | ६ |
| गोवा | २१.७४ | १९ | १८.१५ | २१ | ५७.३४ | १९ |
| गुजरात | ७१.१४ | १ | ९.२१ | ३ | ९७.९९ | ५ |
| हरियाना | ४०.६६ | १४ | ९६.९५ | ६ | ९८.०६ | ३ |
| हिमाचल प्रदेश | २३.९५ | १७ | ६५.४८ | १७ | ८७.९ | १६ |
| झारखंड | ६३.०९ | ३ | ९६.५७ | ७ | ९८.०५ | ४ |
| कर्नाटक | ४८.५० | ९ | ८८.३९ | १३ | ९६.४२ | ८ |
| केरळ | २२.८७ | १८ | २६.९७ | २० | ४४.८२ | २१ |
| मध्यप्रदेश | ६२.०० | ५ | ९७.०१ | ५ | ९७.३ | ७ |
| महाराष्ट्र | ४९.४३ | ८ | ९२.८६ | १० | ९.८८ | १३ |
| ओरिसा | ५२.१२ | ७ | ९२.७३ | ११ | ९२.०८ | १४ |
| पंजाब | ३६.७३ | १६ | ९१.०७ | १२ | ५४.३६ | २० |
| राजस्थान | ६१.०४ | ६ | ९६.४३ | ८ | ९५.७ | ९ |
| तामिळनाडू | ४४.५८ | १२ | ६२.८० | १८ | ९०.६८ | १५ |
| तेलंगण | ४२.४५ | १३ | ९८.७८ | १ | ९८.२८ | २ |
| उत्तराखंड | १३.३६ | २३ | ९६.१३ | ९ | ९४.२४ | ११ |
| उ. प्रदेश | ४७.३७ | १० | ८४.५२ | १४ | ९२.८९ | १२ |
| प.बंगाल | १३.३६ | २३ | ९६.१३ | ९ | ९४.२४ | ११ |
| चंदीगड | ४६.९० | ११ | ८४.२३ | १५ | ९४.५९ | १० |
| दिल्ली | ९.७३ | २५ | ०.३० | ३१ | १.२५ | ३१ |

स्त्रोत : उद्योगधोरण व विकास विभाग वाणिज्य मंत्रालय- भारत सरकार

स्पर्धात्मक संघराज्य प्रणाली ही सर्वच राज्यांनी आजमितीला तरी पूर्णपणे अंगिकारली आहे असे दिसत नाही. त्यासाठी अजून थोडा काळ आणि प्रयत्न आवश्यक आहेत. पण बऱ्याच राज्यांनी त्या दिशेने पावले उचलायला सुरुवात केली आहे हे आपण पाहिले. त्याचाच एक भाग म्हणून विविध राज्ये उदा.

'मॅग्नेटीक महाराष्ट्र गुंतवणूकदार मेळा २०१८', 'ॲडव्हान्टेज उत्तरप्रदेश २०१८' सारखे आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आपल्याला राज्याकडे आकर्षून घेणारे उपक्रम आयोजित करतात.

**नीती आयोगाची भूमिका**

नीती आयोगाचे पूर्वीचे अध्यक्ष श्री.अरविंद पंगारी यांच्या म्हणण्याप्रमाणे, नवभारताचा चेहरामोहरा तयार करण्याची जबाबदारी आता राज्य सरकारांची आहे. त्यादृष्टीने २०१७ मध्ये नीती आयोगाने केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्या संबंधांना एक नवीन आयाम देणारा विचार पुढे मांडला आहे. तो म्हणजे स्पर्धात्मक सहकारी संघराज्य अशी संकल्पना. नीती आयोग आपल्यापरीने राज्य सरकारांमधील स्पर्धात्मकता आणि सहकार्य वाढविण्यासाठी कार्यरत आहे. त्यानुसार विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची समिती स्थापन करून नवीन भारताच्या आराखड्यात राज्यांना सहभागी करणे, त्यांच्यात वैचारिक देवाणघेवाण वाढून प्रशासकीय कारभारातील सर्वोत्तम बाबी (Best Prachies) इतर राज्यांच्या समोर आणणे, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उद्दिष्ट व धोरण प्रक्रियेत राज्यांचा समावेश करणे अशा विविध अंगांनी सहकार्य आणि स्पर्धा यांना प्रोत्साहन देताना दिसतो. संघराज्यप्रणाली ही केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यातील 'विभंग रेषा' (Faultline), चीर नसून त्या दोन्ही स्तरांवर एक नवीन भागीदारी निर्माण करणारी नवीन उगवतीची दिशा ठरावी यासाठी होणाऱ्या प्रयत्नांना बळकटी आणणे ही आजची गरज आहे. त्या मार्गात अर्थात अडथळे अनेक आहेत. परंतु परस्पर विश्वास व सौहार्द, विविध राज्यांमध्ये सध्या असलेली आर्थिक घडी व त्याची परिचलन व्यवस्था ('Eco System') सीमावर्ती, दुर्गम, पहाडी राज्ये, अतिपूर्वेकडील राज्ये या सर्वांच्या खास वैशिष्ट्यपूर्ण गरजांप्रति संवेदनाशीलता तयार होणे आवश्यक आहे.

**भविष्यातील वेध**

राज्य सरकारांची ही बदलती भूमिका आणि त्यांच्यातील स्पर्धात्मकता उत्तरोत्तर वाढत जाण्याची शक्यता आहे. ही अधिक परिणामकारक व्हावी यासाठी नीती आयोगाने त्या दिशेने पावले उचलावी लागतील. अर्थशास्त्रज्ञ टिंबिरजीनच्या तत्त्वानुसार जितकी उद्दिष्ट्ये तितकी विविक्षित आयुधे धोरणकर्त्यांकडे हवीत म्हणजेच अर्थिक विकास व राज्यातील आर्थिक समतोल ह्या दोन उद्दिष्टांसाठी दोन आयुधे हवीत. २०१५ पूर्वी योजना आयोग व वित्त आयोग ही दोन संवैधानिक आयुधे याकरिता उपलब्ध होती. परंतु योजना आयोग बरखास्त करून त्या जागी स्थापन झालेल्या नीती आयोगाचे स्थान व महत्त्व आणि प्रभाव योजना आयोगाच्या तुलनेत बसत नाही. त्यामुळे भविष्यात धोरणकर्ते बदल्यास नीती आयोगाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते. शिवाय नीती आयोगाचे प्रभावक्षेत्र आणि निर्णायक धोरण सहभाग ही योजना आयोगाच्या तुलनेत नगण्य आहे. त्या दृष्टीने ही नीती आयोगाला बळकटी देणे, सातत्य राखणे आणि त्याचे प्रभाव क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. तसे झाले तरच भारताच्या नवनिर्माणाचे आणि समतोल विकास साधण्याचे उद्दिष्ट सफल करण्यात नीती आयोग महत्त्वाची भूमिका बजावू शकेल.

**संदर्भ :**


1) Ahluwalia M. S., (2000), Economic Performance of States in Post-Reform Period, McGraw-Hill, New York.
2) Bhattacharya B. B., Sakthivel S. (2003), Regional Disparities in Growth : A Comparision of Pre and Post- Reform Period.
3) Chakraborty, Pinaki and Manish Gupta (2016), "Evolving Centre-State

Financial Reslations", Economic and Political Weekly, Vol L1, No.16.

4) Ghosh, B and Prabir De, (2000), Linkages Between Infrastructure and Income Among Indian States : a Tale of Rising Disparity Since Independence. Indian J Appl Econ 391-431.

5) Krishna Chaitanya Vadlamannati a Race to Complete for Investment among Indian States – An empirical Investigation Alfred- Weber- Institute for Economics University of Heidelberg, Germany.

6) Ram R., (1982), International Inequality in the Basic Needs Indictors, J Dev Econ 10:113-117.

7) Rao M. Govinda I, Central Transfers to States in India : Rewarding Performance While Ensuring Equity.

8) Rao, M. Govinda (2002), "Poverty Alleviation under Fiscal Decentralisation" in M. Govinda Rao (Ed), Development, Poverty and Fiscal Policy, Oxford University Press, pp. 278-298.

9) Rao M. G., shand R.T., Kalirajan K.P., (1999), Convergence of Incomes Across Indian States.

◆

## 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोह्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. सदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०) (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

# भारतीय अर्थव्यवस्था - मंदीच्या उंबरठ्यावर ?

**अमृता सूर्यवंशी** †

## १. प्रास्ताविक

स्थूल देशांतर्गत उत्पन्न (Gross Domestic Product) हे देशाच्या आर्थिक आरोग्याचं प्रतिबिंब असते. देशाचा समग्र चेहरामोहरा जीडीपीच्या आकडेवारीतून दिसून येतो. प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक क्षेत्रात झालेल्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या सरासरीद्वारे जीडीपीचा दर ठरवला जातो. गेल्या दशकापासून भारत दोन अंकी विकासदराचे स्वप्न पाहत आहे; परंतु वास्तवात मात्र जीडीपी घटत जात आहे. गेल्या सहा तिमाहींमधील जीडीपीच्या वाढदराचे अधिकृतपणे जाहीर झालेले आकडे हे अनुक्रमे ८.०%, ७.०%, ६.६%, ५.८%, ५.०% आणि आता चालू आर्थिक वर्षातील दुसरी तिमाही म्हणजे जुलै ते सप्टेंबर २०१९-२० या कालावधीत जीडीपी दर घसरून ४.५% झाला आहे. गेल्या सहा वर्षातला हा न्यूनतम जीडीपी दर आहे. जपानच्या 'नोमुरा' या ख्यातनाम वित्तीय संस्थेने १२ डिसेंबर, २०१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालात भारतात २०१६ पासूनच मंदीची सुरुवात झालेली असून चालू तिमाहीत (डिसेंबर) भारताचा आर्थिक वृद्धिदर ४.३ % इतकाच राहील असे जाहीर केले. देशाच्या अर्थव्यवस्थेची हळूहळू पडझडच होताना दिसत असून ती अशीच चालू राहिल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचे पतन अटळ आहे.

## २. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती

सध्या देशात आर्थिक मंदी आहे असं जरी म्हणता येत नसलं तरी हळूहळू अर्थव्यवस्था त्याच दिशेने वाटचाल करत आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये सर्वसाधारण घट किंवा कुंठितता (stagnation) आढळून येत आहे. देशात मंदीसदृश वातावरण, म्हणजे 'स्लोडाऊन' असून भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या उंबरठ्यावर आहे हे नक्की.

कृषी विकास दर जो मागील वर्षी ५.१% होता तो यावर्षी (२०१९-२० मध्ये) केवळ २% इतकाच नोंदवला गेला. देशाचा औद्योगिक उत्पादन निर्देशांक (आयआयपी) सातत्याने घसरण दाखवत आहे. सप्टेंबर २०१९ मध्ये या निर्देशांकाने आठ वर्षातील तळ गाठत उणे ४.३% अशा निराशाजनक कामगिरीची नोंद केली आहे. क्षेत्रनिहाय सांगायचे झाले तर, भांडवली वस्तू उणे २०.७%, ग्राहकोपयोगी टिकाऊ वस्तू उणे ९.९%, खाण क्षेत्र उणे ८.५%, निर्मिती

† सहाय्यक प्राध्यापक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, बी.एम.सी.सी. मार्ग, डेक्कन, पुणे ४११००४
आजीव सभासद क्र.: १४७३, भ्रमणध्वनी : ८४२१३५६९६०, ई-मेल : amruta.econ@gmail.com

(मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्र उणे ३.९% आणि विद्युत क्षेत्र उणे २.६% असे आकसले आहेत. उद्योगनिहाय सांगायचे झाले तर, २३ पैकी १७ उद्योगांनी नकारात्मक वाढीची नोंद केली आहे. जीडीपी ठरविताना प्रमुख क्षेत्रांत झालेल्या वृद्धीचा अंदाज वर्तवला जातो. कोळसा, नैसर्गिक वायू, खनिज तेल, पोलाद, वीज निर्मिती, सिमेंट, खते, तेल शुद्धीकरण प्रकल्प अशी ही आठ क्षेत्रे आहेत. २०१९-२० च्या दुसऱ्या तिमाहीत या ८ गाभा क्षेत्रातील औद्योगिक वाढ ५.८% राहिली व याही आकडेवारीने दशकातील तळ गाठला. वरील आठपैकी खते वगळता इतर सातही उद्योगांनी नकारात्मक उत्पादनाची नोंद केली.

पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स (पीएमआय) हा कंपन्यांत येणाऱ्या नव्या ऑर्डर्स संदर्भातील आकडेवारीवरून ठरवला जातो. पीएमआय ५०% पेक्षा कमी झाल्यास तो अर्थव्यवस्थेला मोठा धक्का मानला जातो. आलेख क्र.१ जानेवारी २०१९ पासून ऑक्टोबर २०१९ पर्यंतच्या कालावधीत पीएमआयमध्ये झालेले चढउतार दाखवत आहे. या दहा महिन्याच्या कालावधीत पीएमआय ५३.९% वरून ५०.६% पर्यंत घसरला. दोन वर्षातील ही न्यूनतम पातळी असून त्यातून निर्मिती क्षेत्रात आलेल्या मरगळीवर शिक्कामोर्तब होते.

**आलेख क्र.१**




गेल्या ३-४ वर्षांपासून वाहन उद्योग मंदीचा सामना करत आहे. कार, ट्रॅक्टर, ट्रक इ. सर्वच श्रेणीतील वाहन विक्रीत घसरण झाली आहे. मागणी कमी असल्याने सर्वच कंपन्यांनी उत्पादनात १५ ते २०% कपात केली आहे. त्यामुळे बेकारीत वाढ होत आहे. वाहनांच्या निर्मितीतील महत्त्वाचा घटक

असलेल्या सुट्ट्या भागांची निर्मिती करणाऱ्या लघु आणि मध्यम उद्योगातील कामगारांवरही बेरोजगारीचे संकट कोसळले आहे. एप्रिल ते जुलै २०१९ या कालावधीत एक लाख कंत्राटी कामगार बेरोजगार झाले आहेत. ऑटोमोटिव्ह कंपोनन्ट मॅन्युफॅक्चर्स असोशिएशनच्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते सप्टेंबर २०१९-२० या कालावधीत सुटे भाग निर्मिती करणाऱ्या उद्योगाची एकूण उलाढाल १० टक्क्यांनी कमी झाली आहे.

वीजेचा वाढता वापर हा विकासाचा निदर्शक आहे; परंतु, वीज निर्मितीमध्येही घट होत आहे. गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी (२०१९-२०२०) वीजनिर्मितीतील वाढीचा वेग १२.५% इतक्या प्रचंड प्रमाणात कमी झालेला आहे. रेल्वे माल वाहतुकीतून मिळणारे उत्पन्न हा देखील आर्थिक प्रगती मोजण्याचा एक निकष आहे. रेल्वे माल वाहतुकीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा एप्रिल २०१९ मध्ये ४.३% होता. तो अवघ्या ५ महिन्यात म्हणजे सप्टेंबर २०१९ मध्ये उणे ७.७% एवढा घटला आहे..


या सर्वात भर म्हणजे जीडीपी घसरण्यासोबतच तुटीचे प्रमाणही वाढले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या (२०१९-२०) पहिल्या ७ महिन्यात (एप्रिल ते ऑक्टोबर) दरम्यान महसूल तूट ७.२ ट्रिलियन रुपये राहिली, जी अर्थसंकल्पात निर्धारित केल्या गेलेल्या लक्ष्यापेक्षा १०२% अधिक आहे. या काळात सरकारला ६.८३ ट्रिलियन रुपये महसूल प्राप्त झाला. तर खर्च १६.५५ ट्रिलियन रुपये झाला. मिळकतीपेक्षा खर्च जास्त झाल्यामुळे तुटीचे प्रमाण वाढले आहे. भारतात चालू आर्थिक वर्षात विविध क्षेत्रांतून, घटकांतून येणाऱ्या आकडेवारीने सर्वांनाच चिंताग्रस्त केले आहे.

### ३. मंदी - समस्या अल्पकालीन की दीर्घकालीन संरचनात्मक

उपलब्ध आकडेवारी भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या उंबरठ्यावर आहे याची साक्ष देते. आता समस्येचे नेमके स्वरूप काय हे समजून घेणे हे योग्य उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते. मंदी दोन प्रकारची असते. व्यापारचक्रातून जात असताना निर्माण होणारी मंदी अशी स्थिती तात्कालिक असते आणि संरचनात्मक मंदी या परिस्थितीतून वाट काढण्यासाठी कायमस्वरूपी परिणाम साधणाऱ्या संरचनात्मक सुधारणांची आवश्यकता असते. यापैकी नेमकी कोणती परिस्थिती भारतात आहे, हे खालील आलेख क्र.२ मधून स्पष्ट होते.

आलेख क्र.२ च्या वरील भागामध्ये चक्रीय वाढ आणि दीर्घकालीन वाढ हे दोन्ही भाग दर्शवले आहेत. तर आलेखाकृतींतील खालच्या भागामध्ये अनेक चढउतार असलेला भाग हा वृद्धीचा चक्रीय भाग आहे. यावरून असे दिसून येते की, २०१६ च्या सुरुवातीपासून शेवटापर्यंत वृद्धीचा चक्रीय भाग घटला होता. २०१७ च्या सुरुवातीला त्यात सुधारणा होऊन तिसऱ्या तिमाहीपर्यंत ती कायम होती. त्यानंतर त्यात पुन्हा घसरण सुरू झाली. २०१६ च्या सुरुवातीला असलेली उंची मात्र गेल्या दोन वर्षांत अर्थव्यवस्थेला पुन्हा गाठता आलेली नाही. याचा अर्थ, अशी परिस्थिती मंदीची आहे या मांडणीमध्ये तथ्य आहे. आलेखाकृतींच्या वरच्या भागामध्ये असलेली वक्ररेषा ही वृद्धीतील दीर्घकालीन वाढीचा क्रम दर्शविते. २०१२ पासून साधारण २०१५ च्या सुरुवातीपर्यंत दीर्घकालीन वृद्धीचा दर अत्यंत हळूहळू का होईना, पण वाढत होता. २०१५ नंतर मात्र ती वाढ दिसेनाशी होते. किंबहुना तिला अगदी हलकीशी उतरती कळा लागलेली दिसते. याचाच अर्थ, अर्थव्यवस्थेतील

**आलेख क्र.२**




दीर्घकालीन वाढसुद्धा खुंटलेली आहे आणि म्हणून सध्याची मंदी 'संरचनात्मक' आहे या मांडणीतसुद्धा तथ्य आहे. थोडक्यात, सध्याची आर्थिक मंदी व्यापारचक्रीयसुद्धा आहे, त्याचबरोबर संरचनात्मकदेखील आहे.

**४. मंदीची कारणे व उपाय**

**आंतरराष्ट्रीय कारणे**

जर्मनी या युरोपियन समुदायातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेचे उत्पादन क्षेत्र मंदीच्या विळख्यात आहे. इटलीला २०१८ च्या मध्यापासून तांत्रिक मंदीचा फटका बसतो आहे आणि यात अमेरिका-चीन व्यापार युद्ध, ब्रेक्झिटने भर घातली आहे. परिणामी, सध्या जगभरात आर्थिक पातळीवर अस्थैर्य दिसते आहे व त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही होत आहे. आता याबाबत जरी आपण काही करू शकत नसलो तरी आयात पर्याय (Import Substitution) आपण नक्कीच करू शकतो. जागतिक मागणीत तुटवडा आल्यामुळे भारतीय निर्यात कमी होत असून पर्यायाने देशाच्या परकीय गंगाजळीमध्ये (forgein exchange) घट होत आहे. अशा परिस्थितीत आयात कपात करून आपण मौल्यवान परकीय चलनाची बचत करू शकतो. त्यामुळे हळूहळू जागतिक बाजारपेठेवरील अवलंबित्व कमी करणे देशहिताचेच ठरणार आहे.

**अंतर्गत कारणे**

मध्यंतरी सरकारने उद्योग क्षेत्राचा कर कमी केल्याचे जाहीर केले; परंतु अर्थव्यवस्थेत काहीही फरक पडला नाही. याचे कारण म्हणजे समस्या पतपुरवठ्याचा अभाव नसून, मागणीचा तुटवडा ही आहे. व्याजदरापेक्षा अर्थव्यवस्थेत मागणी किती आहे, हे गुंतवणूकदारांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे असते.

त्यामुळे स्वस्त कर्ज हा या समस्येवरचा उपाय खचितच नाही. ग्राहक खर्चात (Consumer Spending) घट होत आहे. म्हणजेच ग्राहक खरेदी करत नाहीयेत, ग्राहकांकडून मागणी नसल्यामुळे उत्पादनक्षेत्र अडचणीत असून परिणामी उत्पादनकपात, कामगारकपात किंवा वेतनकपात पाहायला मिळत आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन (NSO) च्या अहवालानुसार ग्रामीण उपभोग खर्चात २०१७-१८ या आर्थिक वर्षात ८.८% इतकी घट झाली तर शहरी उपभोग खर्चात २% वाढ दिसून आली. याचाच अर्थ ग्रामीण भागातील घटती क्रयशक्ती हे समस्येचे मुख्य कारण आहे व ग्रामीण उत्पन्नात वाढ झाली तर या समस्येवर मात करता येणे शक्य आहे. ग्रामीण भागातील ७०% घरे अजूनही उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहेत; परंतु शेतीचा एकूण उत्पन्नातील वाटा अल्प आहे. २०१७-१८ चे आर्थिक सर्वेक्षणही हेच दर्शवते की ज्या शेती क्षेत्रात ४९% मनुष्यबळ कार्यरत आहे त्यांच्या वाट्याला जीडीपीच्या केवळ १०-१२% उत्पन्न येते. या अनुषंगाने शेतमालाला चांगली किंमत मिळावी यासाठी आवश्यक योजना हाती घेऊन त्यांच्या सुयोग्य अंमलबजावणीवर भर देण्याची नितांत आवश्यकता आहे.

द्वितीयक क्षेत्राचा विचार करता, मागणीचा अभाव असल्यामुळे गुंतवणूकदारांकडे, उद्योजकांकडे, व्यापाऱ्यांकडे पुरेसा पैसा असूनही ते नवी गुंतवणूक करण्यास, नवा प्रकल्प टाकण्यास आणि नवी उलाढाल करण्याचे पाऊल टाकण्यास कचरत आहेत. परिणामी, देशांतर्गत उत्पादनात व पर्यायाने जीडीपीमध्ये घट झालेली आहे.

अर्थव्यवस्थेला मंदीच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी अल्पकालीन तसेच दीर्घकालीन उपाय आवश्यक आहेत. अल्पकालीन उपायांचा विचार करता, सरकारी खर्च वाढवून म्हणजेच विस्तारात्मक वित्तीय उत्तेजनाद्वारे अर्थव्यवस्थेतील एकत्रित मागणीला नवसंजीवनी देऊन मंदावलेल्या अर्थव्यवस्थेस धक्का देणे हा एक उपाय असला तरी देखील सरकारी तिजोरीलाच ओहोटी लागल्याने यावर मर्यादा येतात. सरकारी खर्च वाढवायचा असेल, तर खुल्या बाजारातून पैसे उभे करावे लागतात. सरकारच्या पैशांच्या मागणीमुळे खुल्या बाजारातील व्याजाचे दर वाढल्यामुळे त्याचा खासगी गुंतवणुकीवर विपरित परिणाम होत असतो (Crowding Out Effect). मग यातून वाट काढण्यासाठी सरकार परकीय भांडवल, परदेशी कर्ज उभे करणे किंवा रिझर्व्ह बँकेसारख्या संस्थेकडे असलेला पैसा वापरणे असे मार्ग अनुसरते. पण अशा उपाययोजनांनासुद्धा मर्यादा आहेत. यावरून असे सिद्ध होते की, अर्थव्यवस्थेला सध्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रामुख्याने कायमस्वरूपी, दीर्घकालीन परिणाम साधणाऱ्या सुधारणांवर भर देणे आवश्यक आहे. साधारणतः सर्वच उद्योगांवर मंदीचे सावट आहे आणि ते अर्थव्यवस्थेला अहितकारक ठरत आहे. तरीही असे उद्योग जे अधिक रोजगारक्षम आहेत म्हणजे ज्यांचे पुरोनुबंधन व पश्चानुबंधन (backward and forward linkages) जास्त आहेत अशा उद्योगांना प्राधान्य देऊन, प्रोत्साहन दिले गेले तर रोजगारवाढीवर लक्षणीय परिणाम होऊ शकेल.

**समारोप**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने देखील २४ डिसेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक' या वार्षिक अहवालात भारतात सध्या लक्षणीय आर्थिक घसरण सुरू असून ती रोखण्यासाठी तातडीने आर्थिक सुधारणा व सर्वंकष धोरणात्मक उपाययोजनांची गरज असल्याचे नमूद केले आहे.

आर्थिक मंदीचे स्वरूप लक्षात घेऊन क्षेत्रनिहाय उत्पन्नवाढीचे तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केल्यास येऊ घातलेल्या मंदीस परतवून लावणे शक्य आहे.

**संदर्भ**


1) Chancel, L. and Piketty (2018) "Indian Income Inequality, 1922-2014: From British Raj to Billionaire Raj?' WID Working Paper No 2017/11.
2) Chodorow-Reich, Gabriel, Gopinath Gita, Mishra P. and Narayanan A. (2018), "Cash and the Economy: Evidence from India's Demonetization' NBER Working Paper 25370.
3) Dev, M. (2018) "Transformation of Indian Agriculture: Growth, Inclusiveness and Sustainability', Presidential Address at the 78th Annual Conference of the Indian Society of Agricultural Economics, November 13, New Delhi.
4) Editorial (2019), "Deepening Economic Crisis', Economic and Political Weekly, Vol. 54, Issue No. 48, December 07.
5) Goyal, A. (2015) "Sustaining Indian Growth: Interests Versus Institutions', India Review, 14(3), July-September.
6) Goyal, A. and A. Kumar (2018) "The Effect of Oil Shocks and Cyclicality in Hiding Indian Twin Deficits', Journal of Economic Studies, 45 (1).
7) Government of India, "Economic Survey, 2018-19'.
8) Handbook of Development Economics, Vol. 3: 2845-2924, North-Holland, Amsterdam.
9) Keynes, J M² (1936) "The General Theory of Employment, Interest and Money', Harcourt Inc (1964 edition).
10) Kundu, S. (2018) "Rural Wage Dynamics in India: What Role Does Inflation Play?' RBI Working Paper Series, Department of Economic and Policy Research.
11) Manna, G.C. (2017), "An Investigation into some contentious issues in GDP estimation', ISPE Journal.
12) Nagaraj, R. and Srinivasan (2016), "Measuring India's GDP Growth: Unpacking the Analytics  Data Issues behind a Controversy that Refuses to Go Away', India Policy Forum.
13) Sapre, Amey and Rajeshwari Sengupta (2017), "An analysis of revisions in Indian GDP data', National Institute of Public Finance and Policy Working Paper, 213.
14) Sweezy, P M² (1942), "The Theory of Capitalist Development', New York: Monthly Review Press.
15) Thomas, Ludvig S. Wier and Gabriel Zucman (2018), "The Missing profits of Nations,' NBER Working Paper, 24701.
16) World Economic Outlook, Annual report - 2019, Published by IMF.
१७) हातेकर, नीरज आणि पडवळ, राजन (२०१९), ‘आर्थिक गर्तेतून बाहेर पडण्यासाठी’, दैनिक लोकसत्ता  सप्टेंबर ८.


◆

इतरांना धक्का न देताही तुम्ही शिखर गाठू शकता

**- टेलर स्विफ्ट**

# अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक स्थिती

**सीमा विश्वनाथ भोसले**[†]

**प्रस्तावना**

समाजातील प्रत्येक व्यक्तीला दैनंदिन जीवन जगत असताना आपल्या आर्थिक गरजा पूर्ण कराव्या लागतात. त्यासाठी समाजात अर्थसंस्थेची निर्मिती झालेली दिसून येते. प्रत्येक व्यक्ती आणि समाज आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असते. अर्थसंस्थेच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करते. यासाठी विशिष्ट प्रणाली पद्धत त्यामध्ये मूल्ये, उद्देश, क्रमबद्ध पद्धतीने निर्माण केली जाते, त्यास अर्थसंस्था असे नाव दिले गेले आहे. अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या गरजा आणि क्रिया पूर्ण करते. जीवन जगण्यासाठी आणि संपत्ती संबंधित तसेच आर्थिक गरजासंबंधी जेवढ्या क्रिया आहेत त्या आर्थिक संस्थेकडून पूर्ण केल्या जातात.[१] आर्थिक संस्थेच्या माध्यमातून व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवरून त्या व्यक्तीचा दर्जा ठरविला जातो. व्यक्तीला समाजात मिळणारा दर्जा हा आर्थिकदृष्ट्या निश्चित होतो.[२] समाजात मिळणारे स्थानमान हे व्यक्तीच्या आर्थिक स्थितीवरून गरीब, श्रीमंत असे निश्चित होते. याप्रमाणेच आर्थिक दर्जा निश्चित करण्यासाठी जात व लिंग हे दोन्ही घटक महत्त्वाचे असलेले दिसून येतात. जात व लिंगानुसार श्रमाची विभागणी होते. श्रमविभागणीच्या आधारेच आर्थिक कार्य निश्चित होतात. लिंगाच्या आधारे स्त्री व पुरुष म्हणून श्रमविभागणी केली जाते. जातीमध्ये देखील लिंगाच्या आधारे श्रमाची विभागणी होते. त्या श्रमविभागणीच्या आधारे प्रत्येक व्यक्तीचा दर्जा निश्चित झालेला दिसून येतो. त्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम समाजातील अर्थसंस्था करते. आर्थिक दर्जा, जातिव्यवस्था, लिंगाधारित श्रमविभागणी हे तिन्ही घटक परस्परसंबंधित असलेले दिसून येतात.[३]

जगभरातील स्त्रियांच्या कामाचे तास पाहिले तर पुरुषांपेक्षा जास्त काम स्त्रिया करतात. परंतु स्त्रियांना त्यांच्या श्रमाचे मूल्य पैशात दिले जात नाही. त्यांना कनिष्ठ दर्जा मिळतो. महिलांना संपूर्ण घरकाम करावे लागतेच, शिवाय कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी बाहेरची कामे, मोलमजुरीही करावी लागते.[४]

अनुसूचित जातींना ग्रामीण भागात मिळणाऱ्या वागणुकीचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर होतो.

[†] सहाय्यक प्राध्यापक, यशवंत महाविद्यालय, नांदेड.
भ्रमणध्वनी : ८२७५९४९०४२, ई-मेल : seema.bhosale203@gmail.com

त्यामुळेच ग्रामीण क्षेत्रामध्ये अनुसूचित जातीतील स्त्रियांना जातिभेद, बहिष्कार, भेदभाव अशी स्थिती असल्यामुळे त्यांचे सामाजिक व आर्थिक जीवन प्रभावित होते. त्यामुळेच त्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये मागे आहेत.[५] शहरी भागात अनुसूचित जातीतील महिला असंघटित क्षेत्रात आहेत. उदा. वर्तमानपत्र, धूपबत्ती, कपडे विक्री करणे, कचरा वेचणे, रद्दी कागद, कोळसा, लोखंड वेचणे, भांडी-कुंडी साफ करणे यासारखे असंघटित क्षेत्र कठोर परिश्रमावर आधारित आहेत.[६] कुटुंबातील आर्थिक प्रक्रियेत सहभागी होऊनही अनुसूचित जातीतील महिलांचे स्थान कुटुंब व समाजामध्ये पुरुषांपेक्षा कनिष्ठच राहिले.[७] अनुसूचित जातीतील महिला ही जात व लिंग या आधारे आर्थिक शोषणाची बळी आहे.

भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार, अनुसूचित जातीतील स्त्रियांची संख्या ९ कोटी ७८ लाख ५८ आहे. तर महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील स्त्रियांची संख्या ६५ लाख ०८ हजार १३९ आहे. अनुसूचित जातीतील नांदेड जिल्ह्यातील महिलांची संख्या ३ लाख ११ हजार ६८६ आहे. असे असताना देखील या महिलांच्या आर्थिक स्थितीबद्दल फारसे अभ्यास झालेले नाहीत. स्त्री अभ्यासक, अर्थतज्ज्ञ, सामाजिक शास्त्राचे संशोधक यांनी अनुसूचित जातीतील महिलांचा अभ्यास व संशोधकांनी केलेले संशोधन फारसे उपलब्ध नाही. नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या लक्षात घेता ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या महार, मांग, चांभार या अनुसूचित जातीतील महिलांच्या अभ्यासाची गरज लक्षात येते. स्वातंत्र्योत्तर काळात नवीन व्यवस्था भारतात प्रस्थापित झाली. महिलांना समानतेचा अधिकार संविधानाने प्राप्त करून दिला. प्रत्येक क्षेत्रात महिला ही कार्यरत झालेली दिसून येत आहे. तिचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रातील सहभागही वाढलेला दिसून येऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातीमधील महिलांची आर्थिक स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) अनुसूचित जातीतील महिलांच्या रोजगार, व्यवसायविषयक स्थिती जाणून घेणे.

२) अनुसूचित जातीतील महिलांचे वस्तू उपभोगाचे प्रमाण जाणून घेणे.

३) अनुसूचित जातीतील महिलांचे आर्थिक प्रश्न व समस्या जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये**

१) ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील महिलांना पूर्णवेळ रोजगारसंधी उपलब्ध होत नाही. भांडवलाअभावी त्या स्वतः व्यवसाय करू शकत नाहीत.

२) अनुसूचित जातीतील महिलांचे वस्तू उपभोगाचे प्रमाण अत्यल्प आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची तयार करून नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या उत्तरदात्या अनुसूचित जातीतील स्त्रियांकडून प्रत्यक्ष भेटून तथ्ये संकलित करण्यात आले. दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करून संशोधनासाठी उपयुक्त असणारी माहिती संदर्भग्रंथ, मासिके, त्रैमासिके, प्रकाशित, अप्रकाशित शोधप्रबंध इंटरनेट सेवा इ. माध्यमातून दुय्यम तथ्य संकलित केले आहेत.

**संशोधन क्षेत्र**

नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे.

**नमुना निवड**

अनुसूचित जातीतील महिलांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने २४० उत्तरदात्या महिलांची निवड केली आहे.

तथ्य संकलनाचा कालावधी : प्रस्तुत अभ्यासासाठी संशोधिकेने १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंतची सांख्यिकी मुलाखतीच्या आधारे जमा केलेली आहे.

**अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक स्थिती**

अनुसूचित जातीतील महिलांच्या पुढे असलेल्या आव्हानाबद्दल डॉ.विमल थोरात म्हणतात, ‘‘बहुतांश अनुसूचित जातीतील महिला शेतमजूर आहेत. ज्या फारच कमी मजुरीवर काम करतात. त्यांना दररोज बेरोजगारीचा सामना करावा लागतो. कनिष्ठ जातीतील असल्यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या वरिष्ठ जातीतील श्रीमंतावर अवलंबून राहावे लागते.[८] अनुसूचित जातीतील महिलांची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती सवर्ण महिलांपेक्षा अधिक मागास, दयनीय आणि कमजोर असते.’’[९] अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाकडे उदरनिर्वाहासाठी जमीन आहे किंवा नाही. तसेच असेल तर ती किती एकर आहे हे जाणून घेण्याच्या उद्देशाने माहिती संकलित करून पुढील तक्ता क्र.१ मध्ये मांडली आहे.

**तक्ता क्र. १ : उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाकडे जमीनीचे असलेले प्रमाण**

| अ.क्र. | मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जमीन नाही | १२१ | ५०.४२ |
| २. | एक एकर | ४० | १६.६७ |
| ३. | दोन एकर | २० | ०८.३३ |
| ४. | तीन एकर | २० | ०८.३३ |
| ५. | चार एकर | ३० | १२.५० |
| ६. | पाच एकर पेक्षा जास्त | ०९ | ३.७५ |
| | एकूण | २४० | १००% |

उपरोक्त तक्ता क्र.१ वरून असे निदर्शनास येते की, ५०.४२% अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाकडे उदरनिर्वाहासाठी जमीन नाही. जमीन असणाऱ्या उत्तरदात्या ४९.५८% महिलांपैकी १६.६७% उत्तरदात्या महिलांकडे एक एकर जमीन आहे. १२.५०% महिलांकडे चार एकर जमीन आहे. दोन एकर जमीन असणाऱ्या महिलांचे प्रमाण ०८.३३% आहे तर ८.३३% तीन एकर जमीन असणारे आहेत.

उपरोक्त तक्त्यावरून असे आढळून येते की, केवळ ३.७५% अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांकडे पाच एकरपेक्षा जास्त जमीन आहे. उर्वरित महिला सीमांत शेतकरी आढळून आल्या. अल्पभूधारक उत्तरदात्या महिलांचे प्रमाण सर्वांत अधिक आहे.

अनुसूचित जातीतील महिलांचे बहुसंख्य कुटुंब हे भूमिहीन असल्याचे आढळून आले. यावरून स्पष्ट होते की, आजही या महिला आर्थिक हलाखीचे जीवन जगताना आढळून येतात. उदरनिर्वाहासाठी जमीन त्यांच्या कुटुंबाकडे नाही.

अनुसूचित जातीतील ५०.४२% उत्तरदात्या महिलांकडे उदरनिर्वाहासाठी जमीन नसल्याने त्यांना उदरनिर्वाहासाठी मजुरी करावी लागते. उत्तरदात्या महिलांना एका महिन्यातून किती दिवस काम मिळते हे जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते सारणी क.२ मध्ये मांडलेले आहे. यामधून शेतमजूरी बद्दलची स्थिती स्पष्ट होते.

**तक्ता क्र.२**

**उत्तरदात्या अनुसूचित जातीतील महिलांना महिन्यातून मिळणारे रोजगाराचे दिवस**

| अ.क्र. | मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मजुरी काम करीत नाहीत | ६० | २५.०० |
| २. | महिन्यातील १० दिवस | ४९ | २०.४२ |
| ३. | महिन्यातील २० दिवस | ११६ | ४८.३३ |
| ४. | महिन्यातील ३० दिवस | १५ | ६.२५ |
| | एकूण | २४० | १०० |

उपरोक्त तक्ता क्र.२ वरून असे लक्षात येते की, अनुसूचित जातीतील उत्तरदात्या ४८.३३% महिलांना महिन्यातून २० दिवस काम मिळते. उत्तरदात्या महिलांपैकी २५% महिला मजुरीचे काम करीत नाहीत. २०.४२% उत्तरदात्या महिलांना महिन्यातून १० दिवस काम मिळते. ६.२५% उत्तरदात्या महिलांना महिन्यातील ३० दिवस काम मिळते.

वरील तक्ता क्र.२ वरून असे लक्षात येते की, अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांपैकी केवळ ६.२५% उत्तरदात्या महिलांना महिन्यातील ३० दिवस रोजगार मिळतो. अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांना महिन्यातील कमीत कमी १० दिवस तरी बेरोजगार राहावे लागते. रोजगाराअभावी अनुसूचित जातीतील ग्रामीण भागातील महिलांचे बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. यामुळे निश्चितच त्यांचे उत्पन्न

**तक्ता क्र.३**

**अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या घरामध्ये वापरत असलेल्या उपभोग्य वस्तू**

| अ.क्र. | मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | रेडिओ | ०५ | ०२.०८ |
| २. | मोबाईल | २८ | ११.६७ |
| ३. | टी.व्ही. व डी.टी.एच. | ०८ | ३.३३ |
| ४. | खुर्ची व टेबल | ०२ | ०.८३ |
| ५. | पलंग, कपाट, घड्याळ, पंखा, मोबाईल | ३२ | १३.३३ |
| ६. | संगणक / लॅपटॉप | ०२ | ००.८३ |
| ७. | वरीलपैकी एकही वस्तू नाही | ३५ | १४.५८ |
| ८. | मोबाईल, टी.व्ही., डीटीएच, खुर्ची व टेबल, पलंग, कपाट, घड्याळ व पंखा | ३२ | १३.३३ |
| ९. | मोबाईल, पलंग, व पंखा | २२ | ०९.१७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | रेडिओ, मिक्सर, मोबाईल, टी.व्ही., पलंग, कपाट व पंखा | ४३ | १७.९२ |
| ११. | मिक्सर, मोबाईल आणि पंखा | ०१ | ००.४२ |
| १२. | मिक्सर, मोबाईल आणि घड्याळ | ०१ | ००.४२ |
| १३. | मोबाईल, पंखा | ०६ | ०२.५० |
| १४. | रेडिओ, मोबाईल, घड्याळ आणि पंखा | ०४ | ०१.६७ |
| १५. | मोबाईल, टी.व्ही. खुर्ची व टेबल, घड्याळ, पंखा | ०४ | ०१.६७ |
| १६. | रेडिओ, फ्रिज, मिक्सर, मोबाईल, टी.व्ही., खुर्ची, कपाट, पंखा व ॲटोरिक्षा | १२ | ०५.०० |
| १७. | कपाट, शिवणयंत्र व पंखा | ०१ | ००.४२ |
| १८. | रेडिओ, फ्रिज, मिक्सर, मोबाईल, टेलिफोन, टी.व्ही. डी.टी.एच., खुर्ची, पलंग, पंखा, कपाट, घड्याळ | ०२ | ००.८३ |
| | एकूण | २४० | १०० |

कमी आहे आणि कमी उत्पन्नामुळे त्यांचे राहणीमान देखील कमी दर्जाचे असते. राहणीमानाची स्थिती ओळखण्याचा महत्त्वाचा निकष म्हणजे त्या त्यांच्या दैनंदिन जीवनात कोणकोणत्या उपभोग्य वस्तूचा उपभोग घेतात. त्यामुळेच संशोधक म्हणून यासंबंधित तथ्य संकलित करून त्याची मांडणी सारणी क्र.३ मध्ये केलेली आहे.

उपरोक्त तक्ता क्र.३ वरून असे निदर्शनास येते की, उत्तरदात्या अनुसूचित जातीमधील महिलांच्या घरांमध्ये दैनंदिन जीवनात कोणकोणत्या वस्तूचा उपभोग घेतात हे पाहिले असता असे लक्षात आले की, रेडिओ, मिक्सर, मोबाईल, टी.व्ही., पलंग, कपाट व पंखा वापरणाऱ्या महिलांचे प्रमाण १७.९२% आहे तर वरीलपैकी एकही वस्तू वापरत नसलेल्या महिलांचे प्रमाण आजही १४.५८% आहे. तसेच पलंग, कपाट, घड्याळ, पंखा, मोबाईल वापरणाऱ्या १३.३३% महिला आढळून आल्या आहेत. फक्त मोबाईल वापरणाऱ्या महिला ह्या ११.६७% आढळून आल्या आहेत. तसेच ९.१७% महिला मोबाईल, पंखा, पलंग वापरतात. ०५.००% महिला रेडिओ, फ्रिज, मिक्सर, मोबाईल, टी.व्ही., खुर्ची, कपाट, पंखा व ॲटोरिक्षा वापरतात. त्याचप्रमाणे ०२.५०% उत्तरदात्या महिला मोबाईल व पंखा वापरतात. १.६७% महिला मोबाईल, टी.व्ही., खुर्ची, टेबल, घड्याळ, पंखा वापरतात. ००.८३% महिला रेडिओ, फ्रिज, मिक्सर, मोबाईल, टेलिफोन, टी.व्ही. डी.टी.एच., खुर्ची, पलंग, कपाट, घड्याळ, पंखा वापरतात. ००.८३% महिला संगणक व लॅपटॉप वापरतात. त्याचप्रमाणे ००.८३% महिला टेबल व खुर्ची वापरतात. त्याचप्रमाणे ००.४२% महिला कपाट, शिवणयंत्र व पंखा वापरतात.

उपरोक्त सारणीवरून असे लक्षात येते की, मोबाईल, पंखा, पलंग सारख्या वस्तू उपभोगाचे प्रमाण जास्त असून लॅपटॉप सारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूचा उपभोग अत्यंत कमी असल्याचे आढळून आले.

अनुसूचित जातीतील ५०.४२% महिलांचे कुटुंब

भूमिहीन असून उत्तरदात्या महिलांपैकी केवळ ६.२५% उत्तरदात्या महिलांना महिन्यातील ३० दिवस रोजगार मिळतो. या सर्वांचा संयुक्त परिणाम म्हणजे या महिलांना आर्थिकदृष्ट्या अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागते. या संदर्भात संशोधक म्हणून अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाचे नाव दारिद्र्य रेषेखालील यादीत आहे का? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने तथ्य संकलित करून ते सारणी क्र.४ मध्ये पुढीलप्रमाणे मांडले आहे.

**तक्ता क्र.४**

**अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाचे दारिद्र्यरेषेखालील प्रमाण**

| अ.क्र. | मत | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | होय | १६३ | ६७.९१% |
| २. | नाही | ७७ | ३२.०९% |
| | एकूण | २४० | १००% |

उपरोक्त तक्ता क्र.४ मध्ये असे आढळून आले की, अनुसूचित जातीतील एकूण उत्तरदात्या महिलांपैकी ६७.९१% उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाचे नाव दारिद्र्यरेषेखालील यादीत आहे तर ३२.०९% उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबाचे नाव दारिद्र्यरेषेखालील यादीत नाही. यावरून असे लक्षात येते की, आजही अनुसूचित जातीतील ६७.९% उत्तरदात्या महिलांचे कुटुंब दारिद्र्यरेषेखाली जीवन जगताना आढळून आले. यावरून त्यांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नसल्याचे आढळून आले. केवळ ३२.०९% उत्तरदात्या महिलांचे कुटुंब दारिद्र्यरेषेच्या वर आहेत. अनुसूचित जातीतील महिलांचे कुटुंब आजही दारिद्र्यात जीवन जगताना आढळून आलेले आहेत.

**गृहीतकृत्यांची पडताळणी :**

प्रस्तुत संशोधनासाठी मांडण्यात आलेल्या गृहीतकृत्यांची पडताळणी निष्कर्षांसोबत (सांख्यिकीय माहितीच्या आधारे) करून त्याद्वारे गृहीतकृत्यांची सत्यता तपासण्यात आली आहे.

**पहिले गृहीतक-** या गृहीतकृत्याची सत्यता तपासली असता अनुसूचित जातीतील महिलांना पूर्णवेळ ३० दिवस काम मिळते. अशा महिलांचे प्रमाण फक्त ६.२५% आढळून आले. त्यामुळे हे गृहीतकृत्य सत्य ठरलेले दिसून येते.

**दुसरे गृहीतक -** या गृहीतकृत्याची निष्कर्षांसोबत पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की, पलंग, पंखा, कपाट, खुर्ची यांसारख्या वस्तू उपभोगाचे प्रमाण तुलनेन जास्त असून लॅपटॉप सारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तुचा उपभोग अत्यंत कमी म्हणजे फक्त ०.८३ % आहे. यावरून अभ्यासासाठी घेतलेले दुसरे गृहीतकृत्य सुद्धा सत्य ठरलेले दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) नांदेड जिल्ह्यातील उत्तरदात्या अनुसूचित जातीतील ५०.४२% महिला ह्या भूमिहीन आहेत तसेच उर्वरित ४५.८३% महिला या सीमांत भूधारक आहेत.

२) अनुसूचित जातीतील उत्तरदात्या केवळ ६.२५% महिलांना महिन्यातील ३० दिवस रोजगार मिळतो.

३) अनुसूचित जातीतील उत्तरदात्या महिलांच्या उपभोगामध्ये मोबाईल, पंखा, पलंग, यासारख्या वस्तू उपभोगाचे प्रमाण तुलनेने जास्त असून संगणक किंवा लॅपटॉप सारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूचा उपभोग अत्यंत कमी असल्याचे आढळून आले.

४) अनुसूचित जातीतील ६७.९१% उत्तरदात्या महिलांचे कुटुंब दारिद्र्यरेषेखाली जीवन जगताना आढळून आले यावरून त्यांची आर्थिक स्थिती

स्पष्ट होते.

**शिफारशी**

१) नांदेड जिल्ह्यातील उत्तरदात्या अनुसूचित जातीतील महिलांना शासकीय योजनांमधून जमीन देणे, ग्रामपातळीवर नियमित रोजगार उपलब्ध करून देणे. या महिलांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे गरजेचे आहे.

२) उत्तरदात्या अनुसूचित जातीतील महिलांसाठी बचत गटाची चळवळ प्रभावी करून त्यांना स्वयंरोजगार, लघुउद्योगाचे प्रशिक्षण द्यावे. त्यांच्या उद्योगासाठी बँकामधून आर्थिक साहाय्य देण्यात यावे.

३) अनुसूचित जातीतील महिलांचा राहणीमानाचा खर्च वाढविण्यासाठी या महिलांचे नियमित उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे.

४) अनुसूचित जातीतील महिलांच्या कुटुंबांना दारिद्र्यातून बाहेर काढणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी त्यांचे सामाजिक, आर्थिक व शासकीय योजनांच्या बाबतीत प्रबोधन होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रबोधन कार्यक्रम घ्यावे.

५) जिल्हा उद्योगकेंद्र, जिल्हा परिषद, महिला व बालविकास विभागांनी समान्य साधून अनुसूचित जातीतील महिलांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**


१. खलसो रेश्मा (२००६) : जन जातिए महिलांए - सामाजिक, आर्थिक, राजनीतिक, सांस्कृतिक पर्यावरण के संदर्भ में, क्लासिकल पब्लिकेशन कंपनी, नई दिल्ली, पृ.४२.

२. Bhai, Nirmala P. (1986) : Harijan Women in Independent India, P.23.

३. Bhrochure on Reservation on for. C. and S.T. Seventh (1987) Edi. Govt. of India, New Delhi, P.303.

४. Khan Mumtaz Ali and Noor Ayesha (1982) : Status of Rural Women in India : A Study to Karnataka Uppal Pub. House, New Delhi, P.209.

५. योजना (मासिक), योजना भवन, संसदमार्ग, नई दिल्ली, २०१५, पृ.१५.

६. सुमन, मंजू (२००४) : दलित नारी एक विमर्श, सम्यक प्रकाशन नई दिल्ली, पृ.१७८.

७. सुमन, मंजू (२००४) : पूर्वोक्त, पृ.२३८.

८. सुमन, मंजू (२००४) : पूर्वोक्त, पृ.२७३.

९. थोरात सुखदेव, (२०१२) : दलित निरंतर विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.९६.


◆

प्रत्येक व्यक्तीने कठीण परिस्थितीला तोंड देण्यास आणि
जोखिम घेण्यास तयार असावं

**- प्रतिभाताई पाटील**

# महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार

**प्रतिभा एस. काळमेघ** †

**प्रस्तावना**

चार्ल्स फेरीयर यांच्या मते, एखाद्या राष्ट्राकडून स्त्रीला दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्त्वावरून त्या राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते. महिला सक्षमीकरण ही एक सक्रिय अशी बहुआयामी प्रक्रिया असून जिच्यामुळे सर्व क्षेत्रातील महिलांना त्यांची ओळख व सामर्थ्याची जाणीव करून देणे होय. म्हणून सक्षमीकरणाची प्रक्रिया म्हणजे महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वपूर्ण साधन आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात विसाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणात मोलाचे योगदान दिले. राजाराममोहन रॉय यांनी खरी स्त्री मुक्तीच्या कार्याची सुरुवात केली त्यानंतर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, रमाबाई रानडे यांनी स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान व दर्जा मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले. ॲड. निर्मला सावंत यांच्या मते, 'स्त्रियांचे सक्षमीकरण होणे म्हणजे तिचे व्यक्तिमत्त्व एक माणूस, व्यक्ती म्हणून विकसित करणे होय.'

व्हिनेसा ग्रिफन यांच्या मते, 'स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता निर्माण करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय.' सत्तावंचित व संधीवंचित महिलांना कोणत्याही भेदाशिवाय प्रगती करण्याची संधी म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिला सक्षमीकरण म्हणजे व्यक्तिच्या अंगभूत क्षमतांचा विधायक विकास होय.

खरंतर समाजाची धारणा करतो तो धर्म. परंतु समाजाचा अर्धा भाग असलेल्या स्त्रियांना धर्माच्या नावाने सर्वाधिक गुलाम ठेवले गेले. आर्यसमाजातील स्त्रियांचा आणि शुद्रांचा ओढा बौद्धधर्म स्वीकारण्याकडे वाढू लागताच मनूने शुद्रांबरोबरच सर्व स्त्रियांवर कडक बंधने लादली. हे निर्बंध म्हणजे स्त्रियांच्या अवनतीचे कारण होते. स्त्री स्वातंत्र्याकडे वाटचाल करण्यासाठी एक क्रांतिसूर्य जन्माला आला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने. डॉ. आंबेडकरांनी मनुप्रणित

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव, जि. यवतमाळ
आजीव सभासद क्र. : १५६० भ्रमणध्वनी : ९४२३६५४६५७ ई-मेल : pratibhakalmegh9761@gmil.com

भूमिकेविरुद्ध बंड पुकारून स्त्री-मुक्तीचे आणि स्त्री-समतेचे रणशिंग फुंकले. स्त्रीच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करावे असे मानणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी प्रारंभापासून स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. 'चूल आणि मूल' या कक्षेत गुंतून पडलेल्या तसेच पुरुष प्रधानता, रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, पूजाअर्चा, व्रतवैकल्ये यात गुरफटलेल्या स्त्रियांना शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, समाजकारण, राजकारण, अर्थकारण यात आणणे म्हणजे फार मोठे आव्हान होते. पण हे आव्हान त्यांनी सहज पेलले आणि स्त्री सक्षमीकरणातील अनंत अडचणी, संकटे, आव्हाने पेलून त्यांनी स्त्रियांना उन्नतीचा मार्ग दाखविला. स्त्री मुक्ती, स्त्री उन्नती व स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी अखंडपणे संघर्ष करणारे ते सारथी होते.

समाजाच्या निर्मितीत स्त्री व पुरुष यांचा समान सहभाग आहे. समाजाच्या प्रगती संदर्भात आंबेडकर म्हणतात की, ''कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरच अवलंबून असते. स्त्रियांच्या प्रगतीशिवाय समाज व राष्ट्राची प्रगती होणे ही अशक्यप्राय बाब आहे.'' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची, स्त्रियांच्या संदर्भात व्यापक व मूलभूत विचारसरणी होती. स्त्री ही समाजाचा आधार आहे त्यामुळे स्त्री शिक्षणाची, समाजाच्या उत्थानासाठी महत्त्वाची भूमिका आहे.

स्वच्छ राहण्यास शिका व सर्व दुर्गुणांपासून मुक्त राहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुष होणार आहेत हे त्यांच्या मनात बिंबवा. त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा करा. लग्न करण्याची घाई करू नका. लग्न म्हणजे जबाबदारी, लग्नामुळे निर्माण होणारी आर्थिक जबाबदारी पार पाडण्याइतपत आर्थिकदृष्ट्या समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लग्न लादू नका, जे लग्न करतील त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अतिजास्त मुले होणे हे दुष्ट कृत्य आहे. आपल्या लहानपणी आपल्याला मिळू शकली त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्याला प्रत्येक मुलाला देणे हे आई-वडीलांचे कर्तव्य आहे. सर्वात अधिक महत्त्वाचे म्हणजे लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या कार्यात सहकार्य द्यावे. मात्र गुलामासारखे वागण्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. या उपदेशाचे पालन तुम्ही केले तर तुम्हा सर्वांना मानसन्मान व कीर्ती मिळेल, याची खात्री आहे. असे मौलिक उद्गार २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुमेन्स कॉन्फरन्स'मध्ये महिलांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात काढले.

देशातील बहुजन, गिरीजन, दलित, शुद्रातिशुद्र स्त्रियांच्या उन्नतीच्या संदर्भात आगरकर, पंडित रमाबाई व मिशनरी संस्था स्त्री शिक्षणाचा प्रसार करीत राहिले. सोबतच देशातील स्त्रियांना ज्ञानदानाचे महत्त्वाचे कार्य महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी प्रथमत: केले. फुले दाम्पत्याने स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि हेच कार्य पुढे डॉ. आंबेडकरांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रामुख्याने तीन मुद्द्यांवर आघात करीत स्त्री मुक्तीचा विचार मांडला. त्यांच्या मते, जात, वर्ण व पुरुषसत्ता हे तीन घटक स्त्रीचे शोषण करतात. स्त्री शोषणाची कारणमीमांसा करताना स्त्री हे जाती व्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे असे सिद्धांत त्यांनी मांडले. जातीव्यवस्था स्त्रीचे शोषण परिदृढ करते. जाती अंतर्गत विवाहामुळे स्त्रीचे शोषण तीव्र होते त्यामुळे आंतरजातीय विवाहास त्यांनी पाठिंबा दिला. भारतीय स्त्रियांच्या समग्र व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा पर्याय उभा

केला. त्यासाठी त्यांनी कृती-कार्यक्रम हाती घेतले. मोर्चे, आंदोलन, प्रबोधन, लिखाण, भाषण या पद्धतीने विधायक कार्य त्यांनी केले. स्त्री-पुरुष हे उभयता जन्मत:च स्वतंत्र व सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र आहेत, असे पूर्वसूत्र त्यांनी मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री सक्षमीकरणा संदर्भात जे व्यापक असे विचार मांडलेत त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

**स्त्रीशिक्षण**

शिक्षणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट आणि सर्वसमावेशक होता. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असा संदेश समाजाला दिला. शिक्षण म्हणजे नवी उमेद, काही करण्याची जिज्ञासा असे ते म्हणत. स्त्री-पुरुष समानता असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आग्रही मत होते. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होण्यासाठी स्त्रीशिक्षणाचा मार्ग त्यांनी सांगितला. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी स्त्रीशिक्षणावर भर दिला. स्त्रियांना शिक्षण मिळाल्यास कुटुंबाचा खरा विकास होईल. जीवन सुधारण्यासाठी आणि चांगले संस्कार होण्यासाठी स्त्रियांना समाजात व कुटुंबात उत्तम वागणूक व समाज दर्जा मिळाला पाहिजे.

स्त्रीशिक्षणाने कुटुंब पुढे जाते. घरातील स्त्रीच अशिक्षित राहिली तर कुटुंबाची उन्नती होणे अवघड असते. स्त्रियांनी उत्तम कपडे, दागिने यासाठी हट्ट न धरता स्वच्छ व टापटिप राहावे. गुणवत्तेवर व चारित्र्यावर भर द्यावा. मुलामुलींवर चांगले संस्कार करावेत. मुलींना जीवनाला उपयुक्त व व्यवहारोपयोगी शिक्षण द्यावे. स्त्री-पुरुषातील परस्परभेदाची भावना नष्ट होण्यासाठी सह-शिक्षणाची गरज आहे. तसेच डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाबाबतीत विचार मांडले. बाबासाहेबांचे गुरू तथागत भगवान बुद्धांच्या आचार, विचार व तत्त्वज्ञानाचे शिक्षण देणारी नालंदा आणि तक्षशिला विद्यापीठे जगप्रसिद्ध होती. या विद्यापीठांमध्ये गणित, खगोलशास्त्र, राज्यशास्त्र, औषधशास्त्र, युद्धकला, वाङ्मय इत्यादी विषय आचार्याद्वारे शिकविले जात होते. जसे जीवक, महर्षी, चार्वाक, आचार्य धर्मपाल, आर्यभट, रत्नाकर शांती अशा या ज्ञानी आचार्यांच्या सान्निध्यात भारतातीलच नव्हे तर विदेशातील विद्यार्थी सुद्धा येत, असे वैभव त्या काळी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्राप्त केले होते. पण आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटून भारत समावेशी शिक्षण देऊ शकत नाही. याचे कारण इथल्या व्यवस्थेत दडले आहे.

आंबेडकरी शिक्षण समता, बंधुता या संकल्पनेवर आधारित आहे. सत्यान्वेशन, सत्याचे ज्ञान, सदाचरण हे शिक्षणाचे खरे मौलिक उद्दिष्टअसते.

**हिंदू कोड बील**

संपूर्ण सम्यक क्रांतीच्या प्रक्रियेत महिलांचा सहभाग असल्याशिवाय ती यशस्वी होणार नाही हे जाणून त्यांनी त्या काळातील स्त्रियांशी संबंधित कायद्यामध्ये सुधारणा करण्याला प्राधान्य दिले. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जुन्या कायद्यांची संहिता बदलली पाहिजे या हेतूने त्यांनी पूर्ण ताकदीनिशी हिंदू कोड बील मांडून स्त्री स्वातंत्र्याची आर्थिक वाट मोकळी करून दिली. जुन्या कायद्यात स्त्री वारसदारांमध्ये त्यांची आर्थिक परिस्थिती, वैवाहिक दर्जा, सापत्यत्व-विनापत्व अशा कारणांवरून भेदभाव केला जात असे. स्त्रियां-स्त्रियांमध्येच भेदभाव करणारे सर्व मुद्दे नव्या विधेयकात काढून टाकण्यात आले. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून हिंदू कोड बिलाचा आग्रह धरला. त्यासाठी

त्यांनी सत्तेचा त्याग करण्यासाठी मागेपुढे पाहिले नाही. स्त्री शिक्षणाचे महत्त्व बाबासाहेबांनी ओळखले होते. एवढेच नव्हे तर कायद्याचे संरक्षणही तिला मिळायला पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून दिले. भारतीय स्त्रीच्या विकासाचा, प्रगतीचा, उन्नयनाचा मार्ग मोकळा करून दिला. स्त्री ही पुरुषांप्रमाणेच एक व्यक्ती आहे हे सिद्ध केले. द्विभार्या प्रतिबंध, शारदा कोड बील ॲक्ट तसेच वारसा हक्काद्वारे पित्याच्या इस्टेटीत कायद्याने हक्क देण्यात आल्याने स्त्रीच्या डोक्यावरची सवतीची टांगती तलवार गळून पडली. स्त्री आता निराधार नाही तिला दत्तक घेण्याचा आणि पोटगीचाही अधिकार मिळाला. स्त्रीच्या हाती त्यांनी कायद्याची ढाल दिली. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या रूपाने युगप्रवर्तक कार्य केले. महात्मा फुल्यांनी सामाजिक परिवर्तनाचा पाया घातला तर डॉ. आंबेडकरांनी त्यावर कळस चढविला असे म्हणता येईल.

**संविधानात्मक तरतुदी -**

संविधानात समतेच्या अधिकारामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले. त्या स्वातंत्र्याच्या कक्षादेखील वाढल्या. भारताच्या संविधानाने दिलेल्या अधिकारांचा निश्चितच स्त्री लोकसंख्येवर परंपरागत प्रतिमा बदलण्याइतपत परिणाम झालेला दिसून येतो.

भारतीय संविधानात स्त्रियांच्या बाबतीत तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१. कलम-१४ अन्वये कायद्यापुढे समानता प्रदान करण्यात आली आहे.

२. कलम-१५ अन्वये राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्म, स्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणास्तव कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल, अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

३. कलम-१५(३) - या अनुच्छेदातील कोणत्याही बाबीमुळे स्त्रिया व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्यात प्रतिबंध होणार नाही.

४. कलम-१६(२) - अन्वये केवळ लिंगावरून राज्याच्या अखत्यारीखालील कोणतीही नोकरी किंवा पद त्याच्याकरिता पात्र असणार नाही अथवा त्यांच्याबाबतीत प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

५. कलम-३९(क)- अन्वये उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा.

६. कलम-३९(घ) - पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामाबाबत समान वेतन मिळावे.

७. कलम-३९(ड)- स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकास आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरकाव करण्यास भाग पाडू नये.

८. कलम-४२ - राज्य हे कामाबाबत न्याय्य व मानवेचित परिस्थिती उपलब्ध करण्यासाठी व प्रसूति साहाय्यासाठी तरतूद करील.

९. कलम-३२५ - कोणतीही व्यक्ती, धर्म, वंश, जात किंवा लिंग या कारणावरून मतदारयादीत समाविष्ट होण्यास अपात्र असावयाची नाही किंवा तिने खास मतदारयादीत समाविष्ट केले जाण्याची मागणीही करावयाची नाही.

या सर्व संविधानात्मक तरतुदींमुळे स्त्रियांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येत असल्याचे दिसून येते. स्त्रियांना दिल्या गेलेल्या समान संधीमुळे भारतीय स्त्री पंतप्रधान व राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचली. भारतात सन १९५१ ला स्त्रीशिक्षणाचे प्रमाण केवळ ८.८६% होते ते प्रमाण सन २०१९ मध्ये ६५.४६% इतके

झाले आहे.

### तत्त्वज्ञान व लिखाण

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या गुलामीचा अंत करण्यासाठी आवश्यक असे तत्त्वज्ञान आपल्या लिखानाद्वारे स्त्री चळवळीला दिले. त्यासाठी 'स्त्रिया व प्रतिक्रांती' (खंड-४), 'मनूचे वेड' (खंड-३,) 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' इत्यादींचा उल्लेख करता येईल. तथागत बुद्धापासून आरंभ झालेली स्त्री स्वातंत्र्याची चळवळ महात्मा फुलेंच्या नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे नेली. स्त्री वर्गाला त्यांनी करून दिलेल्या आत्मस्थितीच्या जाणिवेतूनच तिची अस्मिता जागी झाली. राष्ट्रनिर्मिती ही स्त्री-पुरुष समतेवर आधारित अशा मानवी संघटनेचा आधुनिक प्रकल्प असून माणसा-माणसातील निकोप संबंधातून व परस्पर सहकार्यातून तो सिद्ध होऊ शकतो, असे आंबेडकरांनी स्पष्ट केले. त्यांनी विविध विषयांवर महत्त्वपूर्ण लिखाण केले. त्यांनी एकूण १७ ग्रंथ इंग्रजीत लिहिले. त्यातील काही अर्थशास्त्रावरील काही सामाजिक विषयांवरील तर काही राजनैतिक विषयांवरील आहे.

'हिंदुस्थानातील जाती' आणि 'जातीप्रथेचे उन्मुलन' हे दोन ग्रंथ समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिले आहेत. जातीविरहित एकजिनशी समाज निर्माण झाला पाहिजे. समता, स्वातंत्र्य व बंधुत्व हे लोकशाहीचे अविभाज्य घटक आहेत. त्यामुळे लोकशाही मजबूत करावयाची असेल तर ती तिन्ही तत्त्वे समाजात रुजली पाहिजेत. 'हिंदू कोड बील' आणि 'भारतीय स्त्रीची उन्नती आणि अवनती' या दोन ग्रंथात त्यांनी भारतीय नारीच्या जीवनाची कहानी सांगितली आहे. स्त्रियांना पुरुषाप्रमाणे समान हक्क मिळाले पाहिजेत हे डॉ. आंबेडकरांचे विचार यात प्रकट होतात.

### स्त्री कामगार कायदे

सन १९२८ साली विधिमंडळात काम करीत असताना स्त्री कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मांडलेल्या विधेयकास जोरदार पाठिंबा दिलेला आहे. स्त्री कामगारांना प्रसूती नंतरच्या काळात विश्रांती मिळण्याच्या दृष्टीने त्यांचा ह्या काळातील आर्थिक भार सर्व मालकांनी सोसणे योग्य आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. समाजपरिवर्तनाच्या चळवळीत पहिला टप्पा आपल्याला दिसतो की, चळवळ ही स्त्री-शिक्षण, विधवा विवाह, बालविवाहास आळा घालणे, सतीप्रथा बंद करणे या भोवतीच केंद्रित झाली आहे.

सन १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेबांनी सन १९२३च्या खाण कायद्यात सुधारणा करणारे विधेयक पास करून घेतले. डॉ. आंबेडकरांनी प्रथम कामगार स्त्रियांसाठी वेतनासह प्रसूती रजा मंजूर केली. पुढे स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्रियांसाठी अशा प्रकारची सवेतन प्रसूती रजा मिळण्याची व्यवस्था करण्यात आली.

### कुटुंब नियोजन

सन १९२१ पर्यंत स्थिर असलेली लोकसंख्या सन १९२१ नंतर झपाट्याने वाढू लागली. सन १९२० पासूनच भारतात प्रा.र.धों. कर्वे संततीनियमनाचा प्रचार करीत होते. 'अमेरिकन बर्थ कंट्रोल लीग' सन १९२१ मध्ये स्थापन करून अमेरिकेत संततीनियमन चळवळीचा पाया घालणाऱ्या मार्गारेट सँगर सन १९३५ मध्ये संततीनियमनाचा प्रचार करण्यासाठी भारतात आल्या होत्या. महात्मा गांधींसोबत त्यांनी चर्चा केली. ही कुटुंब मर्यादित करण्याची आवश्यकता गांधींनी मान्य केली. याच पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लक्ष लोकसंख्येचे नियंत्रण व संततीनियमन या प्रश्नाकडे वेधले गेले. कुटुंब, कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्रियांचे आरोग्य, देशाची

आर्थिक उन्नती, दारिद्र्यनिवारण, अन्नपुरवठा अशा विविध दृष्टिकोनातून त्यांनी ह्या प्रश्नाचा विचार केला. संततीनियमनाची विज्ञानाधिष्ठित भूमिका स्वीकारून त्या संदर्भातला बिनसरकारी ठराव मुंबई प्रांताच्या विधिमंडळापुढे डॉ. आंबेडकरांच्या वतीने पी.जे. रोहम यांनी दि. १० नोव्हेंबर १९३२ मध्ये मांडला. हा ठराव मंजूर झाला नाही; परंतु या ठरावावरून बाबासाहेबांचा द्रष्टेपणा, काळाच्या पुढे जाऊन देशाच्या उन्नतीविषयी विचार करण्याची ताकद, दरिद्री लोक आणि स्त्रिया यांच्याबद्दलची कळकळ स्पष्ट होते. जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना त्या संकटातून मुक्त करून दिलासा देणाऱ्या संततीनियमनाचा पुरस्कार करण्यामागे बाबासाहेबांची दूरदृष्टी दिसून येते. मुलांना पाठोपाठ जन्म देणे, संतती टाळण्यासाठी अघोरी पद्धतीने गर्भपात करणे, जास्त अपत्यांमुळे मातेचे मुलांकडे दुर्लक्ष होणे, गरोदरपणाचा, बाळंतपणाचा, मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच वाहावा लागत असल्यामुळे त्याचा परिणाम तिच्या आरोग्यावर, व्यक्तिमत्त्व विकासावर होतो. तेव्हा मुले केव्हा व किती होऊ द्यायची हा निर्णय तिचाच असला पाहिजे. म्हणजेच डॉ. बाबासाहेबांच्या विचारात स्त्रीमुक्तीची बीजे सापडतात. कुटुंब नियोजनाची जबाबदारी स्त्री-पुरुष दोघांची आहे असे ते मानत. सन १९३८ साली बाबासाहेबांनी संततीनियमनविषयक ठराव मांडला. पण कुटुंब नियोजन वा संततीनियमनाला अधिकृत मान्यता मिळून त्याचा शासनाने अवलंब करायला सन १९५१ हे साल उजाडावे लागले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत प्रथमतः जाणीवपूर्वक कुटुंब नियोजन धोरणाचा सरकारने अवलंब केला. आपल्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने संततीनियमन करून राष्ट्रपातळीवर लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम शासनाने राबविला त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना द्यावे लागेल.

**स्वावलंबन**

स्त्रीला सामाजिक क्षेत्रात समानता प्राप्त होण्यासाठी आर्थिक क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याची गरज आहे. स्त्रियांना स्वयंनिर्णयाच्या अधिकारापासून वंचित करून आम्ही राष्ट्रीय आर्थिक विकासांची गती रोखली. सशक्तीकरणाची महत्त्वाची विशेषतः स्वावलंबनात आहे आणि त्यासाठी स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य आपल्याला विचारात घ्यावेच लागेल. कारण आर्थिक विषमता असलेल्या आपल्या भारतीय समाजात ज्या घटकांची आर्थिक बाजू कमकुवत, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा कमकुवत असते. परंपरेने स्त्रियांना आर्थिक गुलाम केले. तिला कोणाच्या तरी आश्रयाने जगायला साध्य केले जर देशाच्या लोकसंख्येमध्ये जवळपास ५०% प्रमाण महिलांचे असेल तर त्यांना विकासापासून वंचित ठेवणे म्हणजे देशाची प्रगती कूंठीत करणे होय. तेव्हा देशाला जर सर्वच क्षेत्रात उडाण भरायची असेल तर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांची प्रत्येक क्षेत्रात वाटचाल अपेक्षित आहे. स्त्री स्वयंपूर्ण, स्वावलंबी झाली तर देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. कमी वयात लग्न, अपत्यांची जास्त संख्या, पतीवर अवलंबून राहण्याची आश्रित प्रवृत्ती हेच तिच्या प्रगतीतील अडथळे आहेत. तेव्हा स्त्रीने तिची स्वतंत्र ओळख निर्माण करणे क्रमप्राप्त आहे. ती आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी झाली तर तिच्यातील आत्मविश्वास, नेतृत्वगूण, क्रियाशिलता, उद्योजकता, निर्णयक्षमता, वाढीस लागेल व तिचा आत्मसन्मान वाढीस लागेल. स्त्रिया व मुले यांचे वेठबिगार म्हणून सर्वाधिक शोषण होते म्हणून वेठबिगारी प्रथेला त्यांनी घटनात्मक मज्जाव केला.

**नीतिमत्ता व शील**

नीतिमत्ता व शीलाचा डॉ. बाबासाहेबांनी आग्रह धरला. त्यांनी म्हटले की, आपण शिकलो म्हणजे

सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाचे महत्त्व तर आहेच यात शंका नाही; मात्र त्याचबरोबर माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे. 'तव्याचा जाय बुरसा मग तो होई आरसा' असा शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे. यासाठीच धार्मिक संस्कारात 'प्रज्ञा-शील-करुणा' या संस्कारांना फार महत्त्व आहे.

आई ही मुलाची पहिली गुरू आहे. मूल आईकडून सर्व काही शिकत असते. कारण जन्मापासून मूल आईच्या सहवासात अधिक काळ असते. ती मुलांच्या वाढीसाठी, तो चांगला माणूस व्हावा यासाठी अमृताचे धडे देते. बौद्धिक वाढीसाठी ज्ञानामृत आवश्यक आहे. अशावेळी आईने स्वयंप्रकाशित झाले पाहिजे. स्त्रीच्या सहवासात राहूनही जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात राहूनही जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही याची खबरदारी घेते तेच नीतिमान होत, अशी त्यांची धारणा होती. मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये वेश्या व मुरळींच्या सभेत डॉ. बाबासाहेब नैतिकतेचा आग्रह धरताना म्हणाले होते, ''वैभवाकडे पाठ फिरवून वनवासाला निघालेल्या द्रौपदीप्रमाणे स्वाभिमानाने जगा, गरिबी आपल्या जन्मापासून आहे, तिला भिऊन अनीतीचा मार्ग धरू नका.'' केवळ भाषण देऊन बाबासाहेब थांबले नाहीत, तर ज्या वेश्या लग्न करून संसार करू इच्छित होत्या त्यांनी त्यांची लग्नं लावून दिली.

**स्त्रीमुक्ती**

स्त्री ही परिवर्तनवादी बनावी, जीर्णमूल्यांच्या संदर्भात रूढीचे गुलाम बनून स्त्रीला आसवे ढाळावी लागू नयेत. नव्या ज्ञान-विज्ञानाचे जतन करण्याची क्षमता तिच्यामध्ये यावी. स्त्रीचा खरा उद्धार केवळ बाह्यवेशातील बदलाने, भौतिक संपन्नतेने नाही तर मानसिक विकास घडल्याने होतो. विवाहप्रसंगी वधुवराने घ्यावयाच्या प्रतिज्ञा कोणत्याही कायद्यापेक्षा प्रभावी आहेत. स्त्री-पुरुषांनी समान भावनेने, एक दिलाने परस्परांवर विश्वास टाकून जीवन फुलविण्याची प्रतिज्ञा घ्यावी. वेदोनारायणाच्या व अग्नीच्या साक्षीने सप्तपदीपेक्षा ही प्रतिज्ञा किती उच्च व उदात्त आहेत हे प्रत्यक्ष अनुभवांतीच कळू शकेल. मानवी मूल्यात्मक बदल आंबेडकरी चळवळीचा आत्मा असून स्त्रीला मानव म्हणून जगण्याच्या अधिकाराची जाणीव करून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रीमुक्ती आंदोलनाचे प्रणेते मानावे लागतील. डॉ. आंबेडकरांचे साधे, सोपे पण स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे हे विचार आजही समाजाला दिशादर्शक व स्त्रियांना मार्गदर्शक आहे.

एकूण महिलांच्या परिपूर्ण विकासासाठी डॉ. आंबेडकरांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. आजही स्त्री अर्थकारण, समाजकारण, राजकारण, कला, क्रिडा, प्रशासकीय सेवा, अवकाश आणि इतर सर्वच क्षेत्रांत उंच भरारी घेत आहे. कोणतेही क्षेत्र तिला आज वर्ज्य नाही. पुरुषांच्या खांद्यास खांदा लावून ती अर्थार्जन करते आहे. प्राध्यापिका, वकील, डॉक्टर, न्यायाधीश, पोलीस अधिकारी, सैन्यदलात, नौदलात, रेल्वे अधिकारी, विमानचालक, व्यावसायिक, उद्योजक इत्यादी सर्वच स्तरांमध्ये तिने आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविला आहे. ती पुरुषापेक्षा बुद्धीने व कर्माने कुठेही कमी नाही हे तिने सिद्ध करून दाखविले आहे.

अजूनही स्त्रियांना बरीच वाटचाल करावयाची आहे. त्याकरिता प्रस्थापित समाजव्यवस्थेत बदल घडवून आणावयाचा आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन झाले तरच स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा व विकासाचा मार्ग खुला होणार आहे. आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत

महिलांनी सहभागी व्हावे, हीच आजच्या काळाची हाक आहे. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांसाठी ज्या चळवळी केल्यात त्यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळावं असं म्हणावं लागेल. त्यांच्यामुळेच भारतीय स्त्री आज मुक्तीचा, सुटकेचा श्वास टाकू शकली.

**संदर्भ सूची**


१. अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, खंड ४०, अंक १, एप्रिल-जून २०१६.

२. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, १४ एप्रिल २००९.

३. डाहाट धनराज, डॉ. आंबेडकरांची भाषणे व विचार, संकेत प्रकाशन, नागपूर, २००१.

४. डाहाट धनराज, आंबेडकर ग्रंथायन, संकेत प्रकाशन, नागपूर २००५.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३.

६. पाटील निरंजन, आंबेडकरी तत्त्वविचार दिशा आणि संघर्ष, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, दादर (पूर्व) मुंबई, २००८.

७. मून मीनाक्षी, फुले आंबेडकरी स्त्री चळवळ, समता प्रकाशन, नागपूर, २०११.

८. राष्ट्रीय परिसंवाद स्मरणिका, समाजसुधारकांचे सामाजिक सुधारणेत योगदान, २००५, प्राचार्य अणे, म.वि. यवतमाळ.

९. सूरवाडे दिलीप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री-सुधारणा, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २००९.


■

तिला भीती वाटत नाही म्हणून ती खंबीर नाही; तर
ती भयापुढेही नमत नाही म्हणून ती शक्तिशाली आहे

**- ॲटिकस**

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवादमधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# स्त्री-पुरुष समानता - काळाची गरज

**शोभा आर. पाटील**†

'कुठल्याही महिलेला यशस्वी होता येते आणि तिच्या कर्तृत्वाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळू शकते हे नोबेल पुरस्कारातून सिद्ध झाले आहे. यातून इतर महिलांना प्रेरणा मिळेल आणि पुरुषानांही महिला सन्मानास पात्र असतात हे समजेल', ही प्रतिक्रिया आहे अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्राप्त अर्थशास्त्रज्ञ इस्थर डफ्लो यांची.

२०१९ हे वर्ष खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरले ते फिनलँडच्या अध्यक्षा म्हणून सना मरिन यांची झालेली निवड व २०१९ च्या अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कारासाठी एस्थर डलो यांची झालेली निवड. सना मरिन ही ३४ वर्षीय युवती फिनलँड या विद्यार्थी केंद्रित शिक्षण व्यवस्था असणाऱ्या देशाची राष्ट्राध्यक्ष बनली व जगातील सर्वात तरुण राष्ट्रध्यक्ष होण्याचा मान तिला मिळाला. तर इस्थर डफ्लो यांना दारिद्र्य निर्मूलन संशोधनात महत्त्वाचे योगदान दिल्याबद्दल नोबेल पुरस्कार मिळाला. जगातील देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या अशा स्त्रिया पाहिल्या की असं वाटतं, स्त्रिया काय करू शकत नाहीत. आज त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी मारली आहे. मग ते राजकारण असो. अर्थकारण असो किंवा सामाजिक क्षेत्र असो. त्यांच्या यशाची पावले चमकलीच आहेत.

देशाचा अर्थिक विकास हा देशातील नैसर्गिक साधनसामुग्री व मानवी भांडवल यावर आधारित असतो. नैसर्गिक साधनसामुग्री मर्यादित आहे. पण मानवी भांडवलाचा सुयोग्य वापर करणे हे आपल्याच हातात आहे. आज जगाची लोकसंख्या ७ अब्जाच्या पुढे आहे. यामधील स्त्रियांची संख्या जवळपास निम्मी आहे. जेव्हा स्त्री व पुरुष हे विकास प्रक्रियेत केंद्रस्थानी असतील तेव्हाच मानवी विकास खऱ्या अर्थाने साध्य होईल. मानवी विकासाचा उद्देश उत्पन्न वाढविण्याशी नसून सर्वांना समान संधी मिळणे हा आहे.

मानवी विकासाच्या दोन बाजू येतात.

१) मानवाकडे असणाऱ्या ज्ञान, कौशल्य या क्षमतांचा विकास व आरोग्यात सुधारणा.

२) मानवी क्षमतांचा विकास करून उत्पादनक्षमता वाढविणे तसेच सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय सहभाग वाढविणे.

वरील दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की, मानवी

† वेणुताई चव्हाण महाविद्यालय, कराड
आजीव सभासद क्र. : १६१४, भ्रमणध्वनी : ८७८८५४८८९५, ई-मेल : shobhapatil4748@gmail.com

भांडवलाचा सुयोग्य वापर करून त्यांची उत्पादनक्षमता वाढविणे; तसेच अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रांत सहभाग वाढविणे महत्त्वाचे आहे. पण ही परिस्थिती स्त्रियांच्या बाबतीत लागू पडत नाही. कारण स्त्रियांना मिळणारी वागणूक ही दुय्यम दर्जाची आहे. भारतामध्ये ही परिस्थिती अधिकच विदारक आहे. प्रस्तुत शोधनिबंधात स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने येणाऱ्या अडथळ्यांची कारणे व परिणाम स्पष्ट केले आहेत.

मुख्य शब्द - अर्थिक विकास, मानव विकास निर्देशांक, शाश्वत विकास, समता, शिक्षण, आरोग्य, उत्पन्न इ.

**अभ्यासाचे उद्देश**

१) स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत येणाऱ्या अडचणीची तीव्रता अभ्यासणे.

२) स्त्री-पुरुष समानतेत येणाऱ्या अडथळ्यांच्या कारणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

अभ्यासासाठी दुय्यम तथ्यांचा वापर केला आहे. विविध ग्रंथ, अहवाल व इंटरनेटवरून दुय्यम तथ्ये प्राप्त केली आहेत.

**स्त्री-पुरुष समानता : काळाची गरज**

लोकांच्या राहणीमानात सुधारणा होणे. त्यांना दीर्घायुषी, आरोग्यदायी व चांगले जीवन व्यतित करता येणे म्हणजेच मानवी विकास होय. यातून खऱ्या अर्थाने देशाचा अर्थिक विकास घडून येतो. मानवी विकासाच्या प्रक्रियेत उत्पादकता (Productivity), समानता (Equity), शाश्वत विकास (Sustainability) व सर्वांना समान अधिकार (Empowerment) या चतु:सूत्रीचा प्रामुख्याने विचार होतो. या प्रक्रियेतूनच पुढे लोकांची कार्यक्षमता वाढावी, नवनिर्मिती होणे व उत्पादकतेत वाढ घडून येणे. त्या अर्थिक विकासाच्या निर्देशित गोष्टी घडून येतात. पुढे अर्थिक विकासाच्या समान संधी लोकांना वर्तमानकाळात व भविष्यकाळातही प्राप्त होतील व लोकांच्या जीवनाला नवीन आयाम निर्माण होईल ही विचारदृष्टी मानव विकास निर्देशांक, शाश्वत विकास या संकल्पनेत आढळून येते.

९ डिसेंबर, २०१९ ला मानव विकास निर्देशांक जाहीर झाला. यामध्ये भारत १८९ देशात १२९ व्या स्थानावर आहे. तसेच २०१८ मधील लिंग आधारित निर्देशांकात १६० देशांमध्ये १२७ व्या स्थानावर आहे. दोन्ही निर्देशांकातील भारताचे स्थान हे स्त्री-पुरुष समानता आणण्यात अडथळा करते. हीच असमानता भविष्यकाळात धोक्याची घंटाही असू शकते. स्त्री-पुरुष समानता ही एक विचारप्रणाली आहे. तशीच ती गतिमान (Dynamic) संकल्पना आहे. स्त्री व पुरुष हे विकासाचे निदर्शन घटक आहेत. पुरुष जसा उत्पादक घटक आहे तशाच पद्धतीने स्त्रियाही उत्पादक घटक आहेत. स्त्री ही प्रथम मानव प्राणी आहे आणि नंतर स्त्री आहे. लिंगसमानतेचा धागा हा अर्थिक विकासाशी निगडित आहे. लिंगसमानता हा केवळ मानवी हक्क नसून शांततापूर्ण, प्रगतशील व शाश्वत जगाची निर्मिती आहे.

पूर्वीपासूनच स्त्रियांच्या प्रश्नांविषयी परखडपणे लिखाण केल्याचे आढळते. कार्ल मार्क्स यांनी स्त्रियांच्या प्रश्नाविषयी 'The Communist Manifesto' या ग्रंथात लिखाण केले आहे. भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष आढळतो. वस्तूच्या किमतीवरून कामगारांचे उत्पन्न ठरत असते. औद्योगिक क्षेत्रात व शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया या उत्पादक स्त्रिया आहेत. त्यांना त्यांच्या वेतनानुसार मोबदला मिळतो. मात्र इतरही स्त्रिया अनेक प्रकारची कामे करतात पण ती अनुत्पादक स्वरूपाची मानली जातात. त्यांच्या

कामाला वेतन दिले जात नाही अशा स्त्रियांचे कार्य घरकाम, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी हे असते. कार्ल मार्क्स यालाच नैसर्गिक हिंसा (Natural Domain) असे म्हणतात. भांडवलदार जसे कामगारांचे शोषण करतो तसेच स्त्रियांचे शोषणही समाजाकडून होते.

अमर्त्य सेन यांच्या 'Development as freedom' या पुस्तकात म्हणतात की, जगाच्या प्रगतीपासून दूर असणाऱ्या लक्षावधी स्त्रिया आहेत आणि त्यामध्ये भारतातील स्त्रिया जास्त आहेत. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांना संधीच मिळालेली नाही. त्यामुळे अमान्य अशी विषमता अस्तित्वात आली आहे. म्हणूनच अंगीकृत असणाऱ्या स्त्रियांच्या क्षमतांकडे व संधीकडे दुर्लक्ष झालेले आहे. या त्रुटी दूर करण्याचे साधन म्हणजे स्त्रियांच्या संघटना होत.

अभिजित बॅनर्जी व इस्थर डफ्लो यांनी लिंगसमानतेच्या बाबतीत भारतात केलेल्या अभ्यासावरून असा निष्कर्ष काढला की, स्त्रियांच्या गतिशीलतेच्या बाबतीत भेदभाव केला जातो. हा भेदभाव दूर करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. वास्तविक भारताच्या राज्यघटनेतील १५ (अ) कलम स्पष्ट करते की सर्वांना स्वातंत्र्याचा हक्क आहे. मात्र वस्तुस्थितीत असे आढळत नाही. शिक्षण, आरोग्य, पुनरूत्पादन, राजकीय सहभाग, आर्थिक सहभाग इ. मध्ये अनेकांना भेदभावाला सामोरे जावे लागते आणि यातील मर्यादामुळेच ती खरे स्वातंत्र्य अनुभवू शकत नाही.

८ मार्च, २०१८ च्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे 'Think equal build smart and innovate for change' हे ब्रीद वाक्य होते. मुली व स्त्रिया यांना समान अधिकार आहेत. तसेच हिंसा व भेदभाव यांपासून स्त्रियांचे संरक्षण करणे हे समाजाचे व राष्ट्राचे कर्तव्यच आहे. १९९३ च्या व्हिएन्ना परिषदेतही स्त्री-पुरुष समान हक्क संमत केला आहे. असे असूनही समाज अजूनही अनभिज्ञ अशा अनिष्ट प्रवृत्तीत अडकून पडला आहे. स्त्रियांना अनेक भेदभावाला सामोरे जावे लागते.

**शिक्षण**

'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह' ज्याला ज्ञान नाही त्याला पशुहून श्रेष्ठ समजण्याचे कारण नाही. ज्ञानार्जनाने मनुष्य आपली मानवी बुद्धी, सद्सद्विवेकशक्ती यांना योग्य वळण लावू शकतो व आपले स्वत:चे जीवन उज्ज्वल करू शकतो. सामाजिक परंपरा, रूढीचा पगडा, सांस्कृतिक मागासलेपणा, धार्मिक भावना, निरक्षरता, दारिद्र्य यामुळे स्त्रीशिक्षणाबद्दल औदासिन्य आढळून येते.

पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात, 'You can tell the condition of a nation by looking at the status of its women?'

स्त्री हे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे आणि त्याचवेळी समाजाचा एक घटक म्हणूनही महत्त्वाची आहे. एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिचे स्थान मान्य केले पाहिजे. स्त्री आणि पुरुष जन्मत: निसर्गत: समान आहेत. म्हणून पुरुषाला जितका शिक्षण घेण्याचा हक्क आहे तितकाच तिलाही आहे. स्त्री एक व्यक्ती आहे तशी ती समाजाचा घटकही आहे. कुटुंब, समाज, देश या समाजाच्या विविध रूपांत तिचे कोणते स्थान आहे हे पाहणे आवश्यक आहे.

स्त्री शिक्षाबाबत दोन मत प्रवाह आढळतात. स्त्री ही सर्वप्रथम गृहिणी आहे, त्यामुळे घर हे तिचे स्वत:चे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळे इतर गोष्टी तिच्या दृष्टीने दुय्यम आहेत. दुसऱ्या मतानुसार स्त्री-पुरुषाची मैत्रीण व सहचारी आहे. तेव्हा तिने पुरुषाला साथ

दिली पाहिजे. जी जी कार्यक्षेत्रे पुरुषाला खुली आहेत ती सर्व स्त्रीला खुली असली पाहिजेत. व्यक्तिविकासासाठी व आर्थिक स्वावलंबनासाठी शिक्षण आवश्यक आहे. त्यांच्या शिक्षणावर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. स्त्री शिक्षण ही स्त्री स्वातंत्र्यासाठी प्राथमिक पण अत्यंत भक्कम अशी आधारभूत बाब आहे. मात्र भारतात स्त्री शिक्षणाबाबत असमानता दिसून येते. भारतातील साक्षरता दराच्या बाबतीत २०११ मधील आकडेवारी स्त्री साक्षरता दर ६४% तर पुरुष साक्षरता दर ८०.९% दर्शविते. तर २०१९ मधील आकडेवारी स्त्री साक्षरता दर ७४.८% तर पुरुष साक्षरता दर ८३.७% दर्शविते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या दृष्टीने प्रगती झाली असली तरी त्यांना म्हणावे तेवढे स्वातंत्र्य मिळालेले नाही. अजूनही काही क्षेत्रांमध्ये स्त्रियांना संधी दिली जात नाही. एवढेच काय गुणवत्ता असूनही आय.आय.टी. मध्ये जाणाऱ्या मुलींची संख्या नगण्यच आहे. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात आय.आय.टी. सारख्या संस्थामध्ये मुलींची गुणवत्ता असूनही मुली का येत नाहीत यावर प्रश्न उपस्थित केला होता. प्रतिकूल परिस्थितीत स्त्रिया अत्यंत खंबीरपणे तोंड देऊ शकतात, हे अनेक उदाहरणातून सिद्ध झालेले आहे. विदर्भात दुष्काळामुळे हवालदिल झालेला शेतकरी आत्महत्या करतो पण त्याच कुटुंबातील स्त्री कुटुंब चालविण्यासाठी सक्षमपणे उभी राहते. स्त्रियांची चिवट झुंज देण्याची बाब अमेरिकन अवकाश संस्था 'नासा' ने प्रत्यक्ष शास्त्रीय चाचण्या घेऊन सिद्ध केलेली आहे. म्हणूनच तर कल्पना चावलाची अंतराळ मोहिमेसाठी निवड करण्यात आली होती.

स्त्रिया या बुद्धिमान कष्टाळू, प्रामणिक असतात त्या उपक्रमशील असतात. पुरुषांपेक्षा अधिक कार्यक्षमपणे व भ्रष्टाचारविरहित प्रशासन चालवितात. एखादा समाज सुधारलेला आहे किंवा सुसंस्कृत व पुरागामी आहे. हे ठरविण्याचे प्रमुख साधन म्हणजे त्या समाजामध्ये स्त्रीशिक्षणाला देण्यात आलेले महत्त्व व करण्यात येत असलेले प्रयत्न होय. स्त्रियांच्या विकासावरच समाजाचा विकास अवलंबून असतो. त्यांच्या सक्रिय सहभागाशिवाय कोणतीही विकासाची योजना यशस्वी होणार नाही. कारण पुरुषांचे शिक्षण हे व्यक्ती म्हणून त्यांच्यापुरतेच मर्यादित असते. परंतु स्त्रियांचे शिक्षण कुटुंबव्यापी राहते.

**आरोग्य**

राष्ट्राचा विकास हा त्या देशातील साधनसंपत्तीवर अवलंबून असतो. तसाच तो देशातील मानवी संपत्तीवर व महिलांच्या आरोग्यावर अवलंबून असतो. World Economic Forum च्या अहवालानुसार, भारत लिंगसमानतेच्या बाबतीत अत्यंत विदारक स्थितीत आहे. लिंग आधरित निर्देशांकानुसार २०१८ मध्ये भारताचे स्थान १६० देशांत १२७ वे आहे.

लिंगसमानता हे आरोग्याचे सामाजिक निदर्शक आहे. उच्चप्रतिची लिंग असमानता ही स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम करते. त्यांच्या जन्मापासूनच ही असमानता सुरू होते. स्त्री अशा समाजात राहते की जिथे तिला काहीच हक्क प्राप्त होत नाही; पण पुरुष मात्र सगळे हक्क वापरतो. आरोग्याच्या बाबतीत पाहिले तर हॉस्पिटलमध्ये औषधोपचार घेण्यासाठी जाणारे पुरुष स्त्रियांपेक्षा अधिक असतात. अमर्त्य सेन यांच्या मते, भारतात आरोग्याच्या बाबतीतील सर्व फायदे पुरुषांनाच मिळतात.

भारतात आजही अशी परिस्थिती आहे की आजही ग्रामीण भागापर्यंत खऱ्या अर्थाने सुविधा पोहचल्याच नाहीत. आपल्याला किती मुलं व्हावीत याचा अधिकार स्त्रीला नाही. आपल्या देशातील महिलांचे जनन प्रमाण हे औद्योगिक व विकसनशील

राष्ट्रांपेक्षा अधिक झालेले आहे. हा अवाढव्य वाढणारा जननदर पाहिला की स्त्रियांचे आरोग्य किती निकृष्ट स्तराला पोहचले आहे याची कल्पना येते. स्त्रियांना मिळणारे पोषण २७०० उष्मांकापेक्षा कमी आहे. त्यामुळे भारतातील स्त्रिया ॲनिमिया ग्रस्त आहेत. महिलांच्या आरोग्याबाबत भारतीय खात्याचा निष्काळजीपणा आणि अपुऱ्या सोयी सुविधा तसेच भारतीय परंपराची मानसिकता आणि स्त्रियांचे परावलंबित्व यामुळे स्त्रियांचे सरासरी आयुर्मान घटलेले आहे. महिला सक्षम असेल तर त्या मुलांचे चांगले संगोपन करू शकतात त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण सहज कमी होऊ शकते.

**स्त्रियांचा आर्थिक सहभाग**

खऱ्या अर्थाने आर्थिक विकास तेव्हाच म्हणता येईल जेव्हा प्रत्येक व्यक्तीच्या उत्पन्नात शाश्वत रीतीने वाढ होईल. त्यासाठी प्रत्येक देशाने आपल्याकडे असलेल्या उत्पादन सामर्थ्याचा योग्य उपयोग केला पाहिजे. म्हणजेच मानवी साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर झाला पाहिजे. यासाठी स्त्री व पुरुष यांनी समानरीतीने आर्थिक सहभागात समाविष्ट झाले पाहिजे.

स्त्रियांचा आर्थिक प्रक्रियेत असणारा सहभाग ही त्यांची असणारी वैयक्तिक प्रगती व त्यांचे समाजातील असणारे स्थान यावरून ठरते. कार्ल मार्क्सच्या मते, ज्यावेळी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत स्त्रिया महत्त्वाची भूमिका घेतात ती अवस्था देशाच्या प्रगतीच्या टप्प्याकडे जाणारी पूर्वअवस्था ठरते. यामुळे स्त्रियांचीही प्रगती होते व पर्यायाने देशाचीही प्रगती होते. आज जगामध्ये अधिक विकसित पावणारी अशी भारताची अर्थव्यवस्था आहे. ज्या देशात स्त्रिया अधिक तास काम करतात त्या देशाची अर्थव्यवस्था आर्थिक वृद्धीकडे मार्गक्रमण करते. पण भारतात मात्र ही परिस्थिती विरुद्ध आहे. भारतातील स्त्रिया काम करतात आणि त्यांचे GDP चे प्रमाण फक्त १८% आहे. कारण भारतातील स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे. त्यांच्या कामाला मूल्यच नाही. त्या आर्थिकदृष्ट्या परावलंबी व रोजगाराशिवाय आहेत. स्त्रियांचा भारतातील आर्थिक सहभाग दर अवघा २७.२% आहे. हा जगातील सर्वात कमी दर आहे. फिनलँडचा हा दर ७०.६% आहे. स्वित्झर्लँडचा ६२.८८% आहे. नॉर्वेचा ६०% तर फ्रान्सचा ४९.२६% यावरून भारतात असणारी स्त्रियांची परिस्थिती लक्षात येते. म्हणजेच भारतातील चार स्त्रियांपैकी एकच रोजगारक्षम आहे. स्त्रियांच्या रोजगाराचा प्रश्न गौण मानला जाऊन त्याकडे दुर्लक्ष केले जाते. तर काही वेळा देशातील बेकारीच्या प्रश्नात स्त्रियांची रोजगारी असा हास्यास्पद व बिनबुडाचा विचार मांडला जातो. स्त्रियांची नोकरी ही पूरक नोकरी असाच समान दृष्टिकोन असल्यामुळे स्त्रियांना नोकरीत प्राधान्य मिळत नाही, कामगारांना कमी करण्याचा प्रश्न आला तर स्त्री कामगार प्रथम कमी होतात.

स्त्रियांचे उत्पन्न वाढल्यास स्त्रियांचा आत्मविश्वास वाढेल व त्या अधिक क्रियाशील उत्पादक घटक बनतील आणि त्याचा उपयोग देशाच्या विकासासाठी होईल.

**राजकीय सहभाग**

स्त्रियांना मतदानाचा अधिकार असणे यापेक्षा स्त्रियांना राजकीय निर्णयप्रक्रियेत भाग घेता येणे, राजकारणात कार्यरत राहण्याची संधी मिळणे म्हणजे राजकीय सहभाग होय. राजकारणात लिंगसमानता आणण्यासाठी भारतीय शासनाने स्त्रियांच्या जागांसाठी आरक्षण दिलेले असते तरी अद्यापही स्त्रिया अपेक्षित यश मिळवू शकत नाहीत. १९० देशांच्या यादीत भारताचा क्रमांक १५३ वा लागतो.

Inter parliamentary union ने काढलेला आकडेवारीनुसार, खाडा हा विकसनशील देश ६१% स्त्रियांच्या सहभागासह प्रथम क्रमांकावर आहे. नॉर्डिक देश ४०%, इंग्लंड ३२%, रशिया २३%, पाकिस्तान २०%, तर भारत ९% आहे.

भारतातील स्त्रियांचा असणारा राजकीय सहभाग हा अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने मारक आहे. प्रत्यक्षात ४९% इतके स्त्रियांच्या लोकसंख्येचे प्रमाण आहे. तर फक्त ९% इतकेच प्रतिनिधित्व राजकीय क्षेत्रात केले जात आहे. भारतामध्ये ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती होऊन पंचायतराज व्यवस्थेमध्ये सहभाग वाढण्यास मदत झाली असली तरी संसदीय क्षेत्रात त्यांचे अस्तित्व बोटावर मोजण्याइतकेच आहे.

मानव विकास निर्देशांक, लिंगसमानता निर्देशांक यामध्ये भारताला वरच्या स्थानावर न्यायचे असेल तर स्त्री-पुरुष समानता राखण्यात अडथळे येतात ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांचे असणारे दुय्यम स्थान आणि त्यामुळे शिक्षणाकडे होत असणारे दुर्लक्ष, आरोग्याची हेळसांड व त्या अनुषंगाने त्यांचा आर्थिक व राजकीय क्षेत्रातील कमी असणारा सहभाग याकडे जाणीवपूर्वक बदल घडवणे आवश्यक आहे. कमी उत्पन्न, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत कमी सहभाग, कमी आत्मविश्वास, कमी निर्णयप्रक्रियेत सहभाग अशा प्रकारचे दुष्टचक्र त्यांच्या आयुष्यात निर्माण होते. त्यामुळे त्यांच्या मानवी हक्काची पायमल्लीच होते.

स्त्रियांचे असणारे हे दुष्टचक्र भेद करायचे असेल तर त्यांना शिक्षणात योग्य संधी प्राप्त करून दिल्या पाहिजेत. आरोग्याच्या सुविधा व त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करणे हे महत्त्वाचे आहे. कुटुंबाकडूनही त्यांना या संदर्भात मदत मिळवली पाहिजे. त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास वाढेल त्या निर्णयप्रक्रियेत अधिकाधिक सहभागी होतील. उपक्रमशीलता, चिकाटी, परिश्रम, बुद्धिमत्ता यांसारख्या गोष्टी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांमध्येही असतात. त्यामुळे त्यांचाही सन्मान व आदर करून वाटचाल केली तर सर्वसमावेशक संस्कृतीचे वैभव आणखी वाढेल व त्यामुळे विकासास त्यांचा हातभार लागेल.

स्त्री ही कोणत्याही पुरुषापेक्षा कमी नाही हे कल्पना चावलाने सिद्ध करून दाखविलेले आहे तरीसुद्धा व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देण्यात स्त्री-पुरुष हा भेद करून डावलले जाते.

**निष्कर्ष**

वरील संशोधनातून संशोधिकेला खालील प्रमुख निष्कर्ष मिळाले आहेत.

१) स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. स्वत:चे स्वत्व कशात आहे, याची जाणीव स्त्रियांना झाली पाहिजे.
२) वैचारिक स्वातंत्र्य, पुरोगामी प्रवृत्ती, नेतृत्व करण्याची मानसिकता अंगी बाणवण्याचे धैर्य स्त्रियांनी दाखविल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत.
३) स्त्रियांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, सन्मानजनक रोजगार, आरोग्य व अन्य सुविधा पोहचत नाही, त्यामुळे त्यांचे नुकसान होते.
४) महिला आरक्षणामुळे स्त्रीला संधी मिळते पण कर्तृत्वाला वाव मिळत नाही.
५) स्त्री ही कोणत्याही पुरुषापेक्षा कमी नाही तरीसुद्धा व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देण्यात स्त्री-पुरुष हा भेद करून डावलले जाते.

**शिफारशी**

सदर अभ्यासातून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधिकेला खालील प्रमुख शिफारशी शासन व समाजाला सुचवाव्या वाटतात.

१) स्त्री-पुरुष समानता याविषयी विचार करताना या विचारात नेमकेपणा येण्यासाठी स्त्रियांसंबंधीचे गैरप्रवाह, मारक विचार, उथळ प्रवाह मूळातून नष्ट केले पाहिजेत.

२) स्त्रीला माता, बहीण, मुलगी, बायको या रूपातच न पाहता तिला नेता, अधिकारी, सहकारी, सल्लागार, संघटक यादृष्टीने पाहण्याची मानसिकता तयार झाली पाहिजे.

३) स्त्रियांना शिक्षणाच्या अधिकाधिक संधी मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

४) आरोग्याविषयी त्यांच्यातील असणारे अज्ञान दूर झाले पाहिजे, यासाठी त्यांना मार्गदर्शन व सल्ला मिळणे आवश्यक आहे. वैद्यकीय सोयी-सुविधांचा लाभ त्यांना मिळाला पाहिजे.

५) ज्या स्त्रिया मानसिक, राजकीय, पर्यावरणीय व आर्थिकदृष्ट्या परीघाबाहेर आहेत त्यांच्या गरजाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची**


१) पाटील हेमलता, (२००९), 'स्त्री आर्थिक व सामाजिक स्थिती' गोदा प्रकाशन, औरंगाबाद. पृ.- १२७ ते १३१.

२) पाटील लीला, (१९८८), 'भारतीय स्त्रीजीवन', मेघना पब्लिसिंग हाऊस, कोल्हापूर', पृ. ९६ ते ९९.

३) पाटील शोभा, (२००७), 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृ. ९४ ते ९७.

४) Dicarson Michael, (2019), 'Discriminatary attitudes towards the Female mobility', Economics and Political weekly VOL LIV No. – 9, 2019 pp. 57 – 61.

५) John Mary. E.- 'The Woman Question' Economics and Political weeklyVOL LIT No. – 50, 2017. pp – 71 - 75.

**Websites**

1) https://Human development index. hdr.undp. org. 25 Dec.,2019.
2) https://Gender development index. hdr. undp. org. 25 Dec. 2019.
3) https://data.worldbank.org 27 Dec. 2019.
4) https://iwpr.org 27 Dec. 2019.
5) https://en.m.wikipedia.org> wiki - 30 Dec. 2019.
6) https://womendeliver.org 30 Dec. 2019.


◆

जर तुम्हाला काही जाणून घ्यायचं असेल तर एखाद्या पुरुषाला विचारा; मात्र जर तुम्हाला एखादी गोष्ट पूर्ण करायची असेल तर ती एखाद्या महिलेलाच सांगा

**- मागरिट थेंचर**

# लिंगभावसापेक्ष अर्थसंकल्प (जेंडर बजेट) : भारतातील उपयोजन आणि आढावा

**युगंधरा एस. टोपरे**†

**प्रस्तावना**

भारतीय अर्थव्यवस्थेचा जसजसा विकास होतो आहे, त्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांचे योगदानही वाढत आहे. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्रापासून ते उद्योग आणि सेवा क्षेत्रापर्यंत महिलांचा सहभाग वाढत आहे. याचाच अर्थ महिला या देशाच्या उत्पादकतेतही भर घालत आहेत. भारताच्या लोकसंख्येत एकूण महिलांची लोकसंख्या विचारात घेतली तर ती ४८% टक्के इतकी आहे. थोडक्यात, निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या बाबतीत होणारा भेदभाव किंवा असमान वागणूक याचा त्यांच्या सामाजिक तसंच आर्थिक दर्जावरही परिणाम होत असतो. हा दर्जा सुधारण्यासाठी विशेष तरतुदी आवश्यक ठरतात. वर्ष २००० पर्यंत महिलांसाठीचे कार्यक्रम, योजना यांसाठीच्या वित्तीय तरतुदी विचारात घेताना महिला व बालकल्याण खात्यापुरत्याच मर्यादित असल्याचे चित्र साधारणपणे अर्थसंकल्पात दिसत होते. मात्र २००५ पासून भारत सरकारने महिलाकेंद्रित अर्थसंकल्प अर्थात जेंडर बजेटला सुरुवात केली. महिलांच्या विकासाचा अनुशेष भरून काढणे व महिलांचे सक्षमीकरण हेच यामागील उद्दिष्ट होते. जेंडर बजेट या संकल्पनेसाठी 'लिंगभावसापेक्ष अर्थसंकल्प', 'लिंगभावाधारित अर्थसंकल्प', 'स्त्री केंद्री अर्थसंकल्प' असे अनेक पर्यायी शब्द वापरले जातात. सामान्य माणसाच्या दृष्टीने अर्थसंकल्प हा देशाच्या जमाखर्चाचा ताळेबंद असतो. विविध करांद्वारे निर्माण होणारे उत्पन्न आणि विविध योजना व कार्यक्रमांसाठी त्यातून होणारा खर्च हे दोन मुख्य घटक अर्थसंकल्पाचा पाया आहेत. या अर्थसंकल्पाचा महिला सक्षमीकरणासाठी व अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढवण्यासाठी एक साधन म्हणून निश्चित वापर केला जाऊ शकतो हा विचार जगात मान्य झाला आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी सामान्य माणसाच्या जीवनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठा परिणाम घडवून आणतात. त्यामुळेच ज्या समाजात लिंगभाव असमानता आहे अशा ठिकाणी महिलांसाठीच्या तरतुदी आणि त्याची योग्य अंमलबजावणी महिलांच्या जीवनमानावर मोठा परिणाम घडवते.

† सहयोगी प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
आजीव सभासद क्र. : १०२३, भ्रमणध्वनी : ९८५०६८३७३९, ई-मेल : yugs1977@gmail.com

'जेंडर बजेट' हा खास वेगळ्या प्रकारचा अर्थसंकल्प नसून नेहमीच्याच अर्थसंकल्पात महिलांच्या दृष्टिकोनातून, तरतुदींच्या माध्यमातून केलेला विचार आहे. उपलब्ध साधनांचे वितरण करताना देशातील पुरुषांसोबतच महिलांसाठी असणे हा प्राधान्याचा विषय आहे. धोरणप्रक्रियेची सुरुवात करताना जेंडर बजेट ही अगदी सुरुवात आहे. २००५ पर्यंत महिलाकेंद्री अर्थसंकल्पाबद्दल बरीच विश्लेषणात्मक आणि महत्त्वपूर्ण भूमिका विविध संघटनांनी मांडली. २००५ नंतर मात्र वित्त मंत्रालयाने प्रत्येक खात्याने जेंडर बजेट कक्ष स्थापन करणे अत्यावश्यक केले. त्यानुसार भारतातील बहुतांश राज्यात जेंडर बजेट कक्ष स्थापन झाले आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात लिंगभावाधारित अर्थ-संकल्पाची संकल्पना, त्यासंदर्भातील प्रणाली, भारतातील त्याचे उपयोजन याचा सर्वसामान्यपणे विचार केला असून गेल्या पंधरा वर्षांचा आढावा घेतला आहे.

**स्थूल अर्थशास्त्रीय धोरण व महिला**

महिलाकेंद्री अर्थसंकल्पाच्या अभ्यासक डॉ.विभूती पटेल यांच्या मते, जागतिकीकरणाच्या धोरणामुळे महिलांच्या जीवनमानावर मोठा प्रभाव पडला आहे. भारतासारख्या विकसनशील देशासंदर्भात हे प्रामुख्याने जाणवते. महिला दिवसभर जे काम घरात करतात ते मोबदला नसलेले काम आहे. जागतिकीकरण आणि त्यामुळे कामाच्या स्वरूपावर व दर्जावर होणारा परिणाम महिलांच्या जीवनमान पद्धतीवर परिणाम करत असतो. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे ढासळलेपण, सार्वजनिक आरोग्यविषयक सुविधांची कमतरता, शिक्षणाचे खाजगीकरण, बेरोजगारी यामुळे महिलांसाठीच्या संधी कमी होतात. त्यांचा एकूण साधनसंपत्तीचा वापर करण्यातील वाटा कमी होतो. जीवनावश्यक वस्तुवरील अप्रत्यक्ष कर वाढवल्यामुळे किमती वाढून त्यामुळे अन्नसुरक्षा धोक्यात येते. थोडक्यात, पोषणयुक्त आहाराची कमतरता निर्माण होते. (पटेल, २००२) अप्रत्यक्ष करांतील वाढीमुळे किमती वाढतात त्यामुळे शिक्षण, आरोग्यसेवा महाग होतात. भारतातील पितृसत्ताक समाजरचनेमुळे सर्व सोयीसुविधांचा विचार मुख्यत: घरातील पुरुषांसंदर्भात प्राधान्याने केला जातो. त्यामुळे महिला या कायम वंचित राहातात. जर अर्थसंकल्पात महिलांचे शिक्षण, उत्पन्न व रोजगारसंधी यांचा प्राधान्याने विचार करून तरतूद केली तर महिलांचे सक्षमीकरण होईल.

**महिलाकेंद्री अर्थसंकल्पाच्या संरचनेतील टप्पे**

महिलाकेंद्री अर्थसंकल्प ही एक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये धोरण, उपयोजन, वित्तीय तरतूद आणि मूल्यमापन या सर्वच बाबींची विकासात्मक स्थिती काय आहे याचा क्षेत्रनिहाय आढावा घेतला जातो. दुसऱ्या टप्प्यात क्षेत्रानुसार नेमके धोरण काय आहे, त्यामधील कच्चे दुवे कोणते या बाबींचा विचार केला जातो. तिसऱ्या टप्प्यामध्ये लिंगभाव समानतेच्या दृष्टीने याचे मूल्यमापन केले जाते. चौथ्या टप्प्यात केलेली वित्तीय तरतूद ही नियोजित धोरणानुसार आहे की नाही व त्याचा फायदा कोणाला झाला आहे याचेही मूल्यमापन केले जाते व पाचव्या टप्प्यात लिंगभाव समानतेच्या दृष्टिकोनातून आखलेली धोरणे, याचा नेमका परिणाम काय आहे याचा अभ्यास केला जातो. महिलाकेंद्री अर्थसंकल्पात मुख्यत: दोन भाग समाविष्ट असतात.

भाग अ - यामध्ये महिलाकेंद्री योजना ज्यासाठी १००% निधीची तरतूद असते.

भाग ब - यामध्ये महिलांसाठी विशेष योजना ज्यामध्ये एकूण तरतुदींच्या किमान ३०% तरतूद असते.

भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास महिलाकेंद्री अर्थसंकल्पामुळे जे खाते लिंगभावसमानतेचा विचार न करता वित्तीय तरतूद करत होते. त्यांना देखील अर्थसंकल्पासाठी महिलाकेंद्री अर्थसंकल्पाच्या दृष्टीने तरतूद करणे अनिवार्य झाले आहे. महिलाकेंद्री अर्थसंकल्पासाठी मुख्य समन्वयक खाते म्हणून महिला व बालकल्याण मंत्रालय काम करते. २०१५ पर्यंत भारतातील एकूण १७ राज्यांनी व केंद्रशासित प्रदेशांनी महिलाकेंद्री अर्थसंकल्प मांडण्यास सुरुवात केली. ओरिसा, त्रिपुरा, उत्तरप्रदेश, कर्नाटक व गुजरात या राज्यांनी २००४ ते २००७ या काळातच महिलाकेंद्री अर्थसंकल्प धोरण स्वीकारले. महाराष्ट्र, राजस्थान, अंदमान, निकोबार या प्रदेशांत २०११ नंतर महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचे धोरण स्वीकारले गेले.

**भारतातील महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचे स्वरूप**

भारतात महिलाकेंद्री अर्थसंकल्पाला न्याय देताना मुख्यत: सार्वजनिक खर्चाचा साधन म्हणून उपयोग केला गेला आहे (रुद्रा २०१८) तक्ता क्र. १ मध्ये महिलाकेंद्री अर्थसंकल्पासाठी केलेली तरतूद स्पष्ट केली असून त्यानुसार २००५-०६ नंतर यासाठीच्या मागण्यांमध्ये व अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये वाढ झाल्याचे चित्र दिसते.

एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचा वाटा वाढताना दिसत असला तरीही

**तक्ता क्र.१**

| वर्ष | विविध खात्याअंतर्गत असलेली मागणी | एकूण महिला केंद्री अर्थसंकल्प (करोड रुपये) | एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेत टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००८-०९ | ३३ | २७,१६६.६७ | ३.६८ |
| २००९-१० | ३३ | ५६,८७.६१ | ५.५७ |
| २०१०-११ | ३३ | ६७,७४९.८० | ६.११ |
| २०११-१२ | ३४ | ७८,२५१.०२ | ६.२२ |
| २०१२-१३ | ३४ | ८८१४२.८० | ५.९१ |
| २०१३-१४ | ३५ | ९७,१३३.७० | ५.८३ |
| २०१४-१५ | ३५ | ९८,०२९.८४ | ५.४६ |
| २०१५-१६ | ३५ | ७९,२५७.८७ | ४.४६ |
| २०१६-१७ | ४७ | ९०६२४.७६ | ४.५८ |
| २०१७-१८ | ४८ | १,१७,२२१.४७ | ५.२८ |
| २०१८-१९ | ४९ | १,२१,९६१.३२ | ४.९९ |

स्रोत - रुद्रा, 2008, ORF Occasinal papers.

वर्ष २०१५ नंतर त्यामध्ये घट झालेली दिसते. ढोबळमानाने सरासरी ५% इतका महिलाकेंद्रित अर्थसंकल्पाचा वाटा आहे असे दिसून येते. चक्रवर्ती (२०१२) यांच्या संशोधनपर अभ्यासानुसार असे दिसून येते की, सार्वजनिक गुंतवणुकीचा भारताच्या आरोग्य क्षेत्रावर मोठा परिणाम झाला असून स्त्री आणि पुरुष दोघांच्याही संख्येत आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेण्यात वाढ झालेली आहे. मात्र आजही खूप मोठा वर्ग सार्वजनिक आरोग्य सुविधांवर अवलंबून असून त्यात महिलांचे प्रमाण जास्त आहे, असे हा अभ्यास स्पष्ट करतो.

२०१४ नंतर केंद्र सरकारने महिला सुरक्षेसंदर्भात निर्भयानिधीची तरतूद केली. परंतु हा निधी मोठ्या प्रमाणात वापरला गेला नाही असे काही अभ्यासक सांगतात (रुद्रा २००८). राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, एकात्मिक बालविकास योजना यामध्ये मोठ्या प्रमाणावर लिंगभावाधारित आर्थिक तरतूद करण्यात येत असून यापुढेही मोठ्या प्रमाणात तरतूद आवश्यक ठरणार आहे. २०१८ च्या अर्थसंकल्पातील ऊर्जा क्षेत्रातील उज्वला प्रकाश योजनेचा दारिद्र्य रेषेखालील महिलाच्या सामाजिक स्थितीवर आणि आरोग्यावर चांगला परिणाम झाला आहे. कारण स्वयंपाकाच्या गॅसची सुविधा मिळाल्यामुळे जळणासाठी लाकूडफाटा गोळा करणे किंवा चुलीसाठी इंधन जमवण्याचे कष्ट कमी झाले आहेत. मात्र धोरणाचा परिणाम अभ्यासण्यासाठी आजही लिंगभाव वर्गीकृत माहिती पुरेशी व शास्त्रशुद्ध पद्धतीने उपलब्ध नाही, असेही निष्कर्ष विविध अभ्यास मांडतात. राजकोषीय लक्ष्य म्हणून महिलाकेंद्री अर्थसंकल्पात खालील प्रमुख खात्यांतर्फे मागणीच्या प्रमाणानुसार तरतुदी केलेल्या आढळतात. खालील खात्याअंतर्गत केलेली मागणी व त्याचा एकूण अर्थसंकल्पाच्या तुलनेने केलेला खर्च तक्ता क्र.२ मध्ये दर्शवला आहे.

तक्ता क्रमांक २ नुसार, राजकोषीय लक्ष्यावर आधारित महिलाकेंद्री अर्थसंकल्पात कोणकोणत्या खात्याने लक्ष्य पूर्ण केले आहे, याची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करून कोणत्या खात्याने लक्ष्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे हे स्पष्ट होते. (चक्रवर्ती २०१८) यानुसार परराष्ट्र व्यवहार खात्याने ही लक्ष्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

NIPFP च्या अभ्यासानुसार, २००३-२००४ पर्यंत महिलांविषयक विचार करताना प्रामुख्याने कुटुंब नियोजनावर मोठा खर्च झाल्याचे दिसते. मात्र उच्च शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योजकता विकासाच्या क्षेत्रांमध्ये अर्थसंकल्पीय तरतूद कमी असल्याचे लक्षात येते. चक्रवर्ती यांच्या मते, गेल्या पंधरा वर्षाचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, भारताच्या संदर्भात स्थानिक समाजरचनेचा विचार करून महिलाकेंद्रित धोरण आवश्यक ठरते. ऑस्ट्रेलिया हा देश सर्वप्रथम महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचा विचार करणारा देश आहे. त्यानंतर काही युरोपियन देश या क्रमवारीत येतात. मात्र भारतासंदर्भात महिलासाठीच्या आर्थिक तरतुदींचा विचार या विकसित देशांच्या अर्थसंकल्प प्रतिमानावरून करता येणार नाही.

विभूती पटेल (२००७) यांच्या मते, पंचायत राज संस्थावर अधिक लक्ष केंद्रित करून महिलाकेंद्री अर्थसंकल्पाची उद्दिष्टपूर्ती शक्य आहे. त्यासाठी अर्थसंकल्पाचे विश्लेषण क्षेत्रनिहाय, योजनानिहाय, वर्गनिहाय आणि वर्षनिहाय करणे आवश्यक ठरते. विविध राज्यांचे महिलाविषयक धोरण आणि अर्थसंकल्पीय कागदपत्रांच्या विश्लेषणावरून स्थूल अर्थशास्त्रीय धोरण ठरवणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.२**

**राजकोषीय लक्ष्य साध्य करण्यासाठी खालील प्रमुख खात्यांतर्गत झालेला खर्च (%)**

| अ.क्र. | खाते | वर्ष - २०१८-१९ |
|---|---|---|
| १. | कृषी संशोधन व शिक्षण. | ०.४४ % |
| २. | परराष्ट्र व्यवहार | १.०० % |
| ३. | पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू | ०.७० % |
| ४. | महिला आणि बालकल्याण. | ०.९५ % |
| ५. | शालेय शिक्षण आणि साक्षरता. | १.०१ % |
| ६. | उच्च शिक्षण | १.०६ % |
| ७. | सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण. | १.०० % |
| ८. | सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग. | १.०४ % |
| ९. | वस्त्रोद्योग | १.०० % |
| १०. | आरोग्य आणि कुटुंब कल्याण. | १.१६ % |

स्रोत - चक्रवर्ती, नायर जैन २०१८ NIPFP

महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्यातही महिलाकेंद्री अर्थसंकल्प कक्ष उभारण्यास २०१७ साल उजाडले. यावरून हा विषय गांभीर्याने घेतला जाणे आवश्यक आहे हे स्पष्ट होते. महाराष्ट्राने केंद्राच्या धोरणानुसार 'बेटी बचाओ बेटी पढाओ', 'माझी कन्या भाग्यश्री योजना', 'नवतेजस्विनी अर्थसंकल्पावर आधारित योजना राबवल्या. स्त्री उद्योजिकांसाठी राज्यात कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांमध्ये अतिरिक्त फायदे दिले जात आहेत. या उद्योगांवर महिलांना अनुदान दिले जाते.

**राजकोषीय धोरणाच्या महिलाकेंद्री अर्थसंकल्पाच्या परिणामांचे मापन**

चक्रवर्ती (२०१६) आणि लाहिरी (२००२) यांच्या मते, महिला विकास आणि राजकोषीय धोरण यांच्यातील स्थूलअर्थशास्त्रीय निदर्शकांचे दुवे जोडणे. शक्य झाल्यास महिलाकेंद्री अर्थसंकल्पामुळे महिलांचे जीवनमान किती प्रमाणात सुधारले आहे हे मोजणे शक्य होईल. योजनानिहाय, क्षेत्रनिहाय आकडेवारीच्या संकलनातून हे परिणाम गणिती पद्धतीद्वारे मोजणे शक्य आहे. लाहिरी (२००२) यांच्या मते, सार्वजनिक खर्च आणि मानव विकास निर्देशांकाच्या माध्यमातून लिंगभाव असमानता दूर झाली आहे की नाही हे स्पष्ट होते. 'स्थूल राष्ट्रीय उत्पादनात'(GDP) होणारी वाढ ही जीवन जगण्याचा दर, अर्भक मृत्यूदर आणि साक्षरतेच्या दरावर परिणाम करत असते. त्यामुळे सार्वजनिक खर्चाच्या धोरणातून हा परिणाम अभ्यासणे शक्य आहे. शिक्षण आणि आरोग्य या मुख्य सामाजिक क्षेत्रातील निदर्शकांचे विचार महिलांच्या जीवनमान स्थितीतील सुधारणांचा अभ्यास करताना आवश्यक ठरतो.

महिलाकेंद्री अर्थसंकल्पाची आवश्यकता प्रतिपादन करून त्या समितीचे अध्यक्ष असणारे

डॉ. अशोक लाहिरी यांच्या मते १९९० नंतर मानव विकास या संकल्पनेचा परीघ विस्तारण्याची क्रिया सुरू झाल्यानंतर 'लिंगभाव सापेक्ष विकास', 'शाश्वत विकास' या संकल्पनांवर भर देण्यास सुरुवात झाली. यु. एन. डी. पी. अंतर्गत शाश्वत विकासाची उद्दिष्टे पूर्ण करताना लिंगभाव समानतेवर भर दिला आहे. आर्थिक विकास आणि जीडीपीद्वारे प्रतिबिंबित होणारी आर्थिक वृद्धी याही पलीकडे मानव विकास निर्देशांक (HDI), लिंगभावसमानता विकास निर्देशांक (GDI) आणि लिंगभाव असमानता निर्देशांक (GII) या तिन्हींना तेवढेच महत्त्व प्राप्त झाले आहे. लाहिरी यांच्या मते, मानव विकास निर्देशांकातील सुधारणा तसेच लिंगभावसमानता निर्देशांकातील सुधारणा व असमानता निर्देशांकातील घट या बाबी महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचे परिणाम स्पष्ट करतात. परंतु त्यासाठी माहितीचे योग्य संकलन आवश्यक ठरते.

२००५ पासून महिलाकेंद्री अर्थसंकल्प प्रत्यक्षात उतरवण्यास सुरुवात झाली. आजच्या घडीला यास पंधरा वर्षे पूर्ण होत आहेत. चालू वर्षाच्या २०१९-२०च्या अर्थसंकल्पात महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचा पंधरा वर्षाचा आढावा घेण्यासाठी एका समितीची स्थापना केली जाईल असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रतिपादित केले आहे. परंतु विविध अभ्यास याच निष्कर्षाप्रत येतात की, अजूनही महिलाकेंद्री धोरणाचा स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम झालेला नाही. यासाठी डॉ. लाहिरी यांचे विधान पुरेसे बोलके आहे. त्यांच्या मते, ''जोपर्यंत महिला लोकशाही प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होत नाहीत तोपर्यंत महिलाकेंद्री धोरणाची फळे समाजात रुजणार नाहीत. पाकिस्तानसारख्या विकसनशील देशात स्वर्गीय बेनझीर भुट्टों सारख्या महिला पंतप्रधान बऱ्याच काळ लाभल्या तरीही स्त्री विकास मागासलेला होता. कारण तेथील महिलांचा लोकशाही प्रक्रियेतील सहभाग नगण्य होता.''

लिंगभावसापेक्ष किंवा महिलाकेंद्री अर्थसंकल्पाचा मागोवा घेतल्यानंतर विविध अभ्यासातून झालेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

**निष्कर्ष**

१. लिंगभावाधारित अर्थशास्त्रानुसार वापरली जाणारी मुख्य साधने उदा. आर्थिक स्त्रोतांनुसार लोकसंख्येचे वर्गीकरण, व्यावसायिक वर्गीकरण, बाजारपेठांचे वर्गीकरण यांचा आधार लिंगभाव असणे आवश्यक आहे.

२. माहिती योग्य पद्धतीने संकलित होणे आवश्यक आहे ज्यामुळे महिलाकेंद्री धोरणाची परिणामकारकता अभ्यासणे सोपे जाईल.

३. विविध योजना राबवताना व विकास प्रकल्पांमध्ये स्थानिक सहभाग वाढवणे आवश्यक असून त्यातील निर्णयप्रक्रियेत महिलांची भूमिका आवश्यक आहे.

४. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला प्रतिनिधीसाठी कार्यशाळा, क्षमता विकास कार्यक्रम, माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर आवश्यक आहेत. ज्यामुळे महिलाकेंद्री अर्थसंकल्पातील आर्थिक तरतुदी योग्य पद्धतीने वापरल्या जातात की नाही हे महिला प्रतिनिधी समजू शकतील.

५. महिलांचे प्रश्न हे केवळ महिला व बालकल्याण खात्यापुरते मर्यादित नसून महिला या आर्थिक प्रक्रियेतही योगदान देत असल्यामुळे आणि विविध सामाजिक, आरोग्यविषयक, शिक्षण-विषयक सेवा विकत घेत असल्यामुळे केंद्र व राज्यातील प्रत्येक खात्यात महिलांसाठीच्या आर्थिक तरतुदींचा विचार अर्थसंकल्पाच्या

माध्यमातून आवश्यक ठरतो.

**संदर्भ :**

१. Chakravarty Lekha, (2016) Asia : A Survey of Gender Budgeting, IMF working Paper, WP/16/150.

२. Chakravarty Lekha Nair, Jain (March 2019) The Political Economy of Gender Budgeting : Empirical Evidence from India. NIPFP working papers.

३. Lahiri Ashok, (2019), Fifteen Years of gender budgeting in India : A retrospective (Ideasforindia.in).

४. Mira Yamini, Sinha, (April 2012), Gender Responsive Budgeting in India : What has gone wrong? EPW.

५. Patel Vibhuti, (2010), Gender audit of Budgets in India (2001-02 to 2009-10), Nivedini, Journal of gender Studies.

६. Patel Vibhuti, (March 2013) Gender Budget A Case Study of India, working paper, center for advanced study in economics university of Mumbai.

७. Rudra Shalini (March 2018), Gender Respective Budgeting A task ahead for Indian 15th finale commission OFR, Research Paper.

८. Zamb Bhumika, Mishra, Sinha (April 2012), The Paradox of Gender Resposive budgeting, EPW.

९. जेंडर बजेटिंग हॅण्डबूक, (ऑक्टो २०१५), भारत सरकार, महिला व बालविकास मंत्रालय.

◆

एखाद्या राणीप्रमाणे विचार करा. कारण राणी कधीच अपयशाला घाबरत नाही. शिवाय अपयश हे देखील यशाची एक पायरीच असते

**- ऑप्रा**

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्य ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या : एक चिंतन

**नीता सुधाकर वाणी** †

**प्रस्तावना**

भारतातील एकूण ३५ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक महत्त्वाचे प्रगती पथावरील राज्य असून भारताची आर्थिक राजधानी असलेले मुंबई याच राज्यात आहे हे महाराष्ट्र राज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हे असून, या राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,३१३ चौरस कि.मी. एवढे असून त्यात ५६.६% पेरणीयोग्य क्षेत्र, ८.४ % पडीक जमीन, १०.२% क्षेत्र बिगर शेती क्षेत्राखालील आहे. प्रशासकीयदृष्ट्या महाराष्ट्राचे पुणे, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, कोकण व नागपूर असे ६ भाग पडतात. महाराष्ट्र राज्यातील कोरडवाहू जमिनीचे प्रमाण जवळपास ८०% आहे.

गेल्या काही वर्षात शेतकरी आत्महत्येचा प्रश्न भारतात दिवसेंदिवस बिकट होत आहे. विशेष म्हणजे संपूर्ण भारतात शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक लागतो. त्यानंतर कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, छत्तीसगड या राज्यांचा लागतो. भारतात जवळजवळ ६७% लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्याचे कार्य शेती करते. तेजी, मंदीवर प्रभाव टाकणारा शेती हा महत्त्वाचा घटक आहे. एवढेच नाही तर शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाला सर्वात जास्त गरज सैन्य आणि शेतकऱ्यांची असते, म्हणूनच 'जय जवान जय किसान' असे म्हटले जाते. शेती टिकवायची असेल तर शेतकरी आत्महत्या थांबविणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकरी आत्महत्येची वास्तव कारणे शोधून त्यावर उपाययोजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१) शेतकरी आत्महत्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येच्या कारणांचा शोध घेणे.

३) शेतकरी आत्महत्या कमी करण्याचे उपाय सुचविणे.

**शोधनिबंधाची गृहीतके**

१) गेल्या काही वर्षात शेतकरी आत्महत्येत वेगाने

† स.व.प.कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर, ता.रावेर, जि.जळगाव
आजीव सभासद क्र. :१५३३, भ्रमणध्वनी : ८००७६९८५७०, ई-मेल : neetawani@hotmail.com

वाढ होत आहे.

२) शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती व आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.

३) दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.

४) शेतकरी आत्महत्येचा प्रश्न सर्वत्र सारखा नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सांख्यकीय व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम सामुग्रीच्या साहाय्याने आकडेवारी मिळविण्यात आली आहे.

**शोधनिबंधाचे विश्लेषण**

जेव्हा एखादी कमकुवत मनाची व्यक्ती कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय कारणातून निर्माण झालेल्या नैराश्यातून मृत्यूला जवळ करते तेव्हा त्याला आत्महत्या म्हणतात. आत्महत्या करणे हा गुन्हा असला तरी व्यक्ती नैराश्यातून व मनाच्या कमकुवत पणातून आत्महत्येचा निर्णय घेत असते. या कृत्यामुळे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या घरातील लोकांना, नातेवाईकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कायद्याच्या कचाट्यात ते अडकतात. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीने परिणामांचा विचार करणे गरजेचे आहे. जेव्हा एखाद्या वर्गातील लोक मोठ्या संख्येने आत्महत्येचा निर्णय घेतात तेव्हा गांभीर्याने या प्रश्नांकडे पाहिले जाते. भारतात २००१ पासून शेतकरी आत्महत्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. पारतंत्र्याच्या काळात अनेकवेळा दुष्काळ पडले पण तेव्हा भारतीय शेतकरी डगमगला नाही, धैर्याने त्याने दुष्काळाला तोंड दिले. त्यावेळचा शेतकरी अशिक्षित होता, शासकीय सहकार्य त्याला नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांना अनेक सवलती देण्यात येत आहे. उत्पन्न करातून त्यांना सूट देण्यात आली आहे. वेळोवेळी कर्जमाफी केली जाते, वीजदरात कपात केली जाते. तसेच आजचा शेतकरी ज्ञानी आहे, सुशिक्षित आहे, शासनाचे सहकार्य त्याला आहे तरी त्याची मानसिकता अशी का हा प्रश्न निर्माण होतो.

आजपर्यंत भारतात साडेतीन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्रात ७० हजारांवर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. देशात दररोज ४० ते ५० शेतकरी आत्महत्या करीत आहे.

नॅशनल क्राईम रेकार्ड ब्युरो (NCRB)ही गृह मंत्रालयामार्फत येणारी संस्था आहे. ही संस्था देशभरातील गुन्हे व त्यांच्याशी निगडित घटनांची आकडेवारी जाहीर करते. या संस्थेच्या आकडेवारीनुसार २०१८ मध्ये देशात १०,३४९ आत्महत्या झाल्या. त्यात ५,७६३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यात ४,५८६ शेतमजूर. ५४५७ पुरुष आणि ३०६ महिला होत्या. शेतमजुरांमध्ये ४०७१ पुरुष आणि ५१५ महिला होत्या. २०१८ मध्ये शेतकरी आत्महत्येत ३.६% ने वाढ झाली असे NCRB ने म्हटले आहे. तसेच २०१४ च्या तुलनेने २०१५ मध्ये शेतकरी आत्महत्येत ४२% ने वाढ झाली. २०१४ मध्ये ५,६५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर २०१५ मध्ये ८,००७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यात महाराष्ट्र आघाडीवर असून महाराष्ट्रात ३,०३० आत्महत्या त्यानंतर तेलंगणा १३५८, कर्नाटक ११९७ आत्महत्या झाल्या आहेत.

**महाराष्ट्र राज्यातील शेतकरी आत्महत्येची स्थिती**

संपूर्ण भारतात शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे आणि महाराष्ट्रातील विदर्भात आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त आहे. विदर्भाचे दोन उपविभाग पडतात. नागपूर आणि अमरावती, चंद्रपूर ,अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, वाशीम, गडचिरोली तर मराठवाड्यात

औरंगाबाद, नांदेड, लातूर, परभणी, जालना, बीड, उस्मानाबाद, हिंगोली यांचा समावेश होतो. विभागवार विचार केला तर अमरावती विभागात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त व सर्वात कमी कोकण विभागात दिसून येते. महाराष्ट्रातील विदर्भ, उत्तर महाराष्ट्रात दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारी यांमुळे आत्महत्येत वाढ होत आहे. विदर्भातील शेतकरी फक्त शेतीवर अवलंबून आहे. पूरक व्यवसाय तेथे फारसे नाही. ९१% शेतजमीन पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. कोकणात तसे नाही. कोकणातही शेतकऱ्याला नैसर्गिक परिस्थितीला तोंड द्यावे लागते. नुकसान सहन करावे लागते तरीही तेथील शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होत नाही. याला कारण कोकणातील शेतकरी फक्त शेतीवर विसंबून राहत नाही. तो शेतीबरोबर पूरक व्यवसाय करतो. त्यामुळे शेतीत नुकसान आले तरी पूरक व्यवसायातून त्याला उत्पन्न मिळत असते त्यामुळे त्याची आर्थिक चणचण तीव्र होत नाही. देशातील बिहार, पश्चिम बंगाल, गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, झारखंड, मिझोराम, नागालँड, उत्तराखंड या ९ राज्यांत मात्र एकही आत्महत्या झालेली नाही, असे आकडेवारीनुसार दिसून येते.

महाराष्ट्र राज्यातील अमरावती विभागात सर्वाधिक

**तक्ता क्र.१**

**महाराष्ट्र राज्यातील विभागवार शेतकरी आत्महत्येची आकडेवारी**

| महाराष्ट्रातील विभाग | वर्ष २००८ | वर्ष २०१३ | वर्ष २०१७ | वर्ष २०१८ |
|---|---|---|---|---|
| अमरावती | १०६१ | ७०५ | १०६४ | १०४९ |
| औरंगाबाद | २८५ | २०७ | ९९१ | ९४७ |
| नाशिक | १७२ | १७० | ४७५ | ४२१ |
| नागपूर | ३२६ | १७७ | २८० | २४८ |
| पुणे | १२० | ३७ | १०२ | ९४ |
| कोकण | ०२ | -- | ०५ | ०२ |

स्रोत : https//.indiaspend.com farmer suicide

शेतकरी आत्महत्या होत असून, वर्ष २००८ मध्ये १०६१, वर्ष २०१३ मध्ये ७०७, वर्ष २०१७ मध्ये १०६४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या तर वर्ष २०१८ मध्ये १०४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. त्या खालोखाल औरंगाबादमध्ये हे प्रमाण अनुक्रमे २८७,२०७,९९१ व ९४७ होते. सर्वात कमी प्रमाण कोकणात असून वर्ष २००८ मध्ये ०२ तर वर्ष २०१३ मध्ये एकही आत्महत्या झाली नाही. वर्ष २०१७ मध्ये ०५ आणि वर्ष २०१८ मध्ये ०२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

**महाराष्ट्र राज्यातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी**

महाराष्ट्रात पहिली शेतकरी आत्महत्या १९ मार्च १९८६ रोजी शेतकरी कुटुंबाने केली असून, साहेबराव करपे या शेतकऱ्याने स्वतः, पत्नी व ४ मुले यांच्या जेवणात विष कालवून आत्महत्या केली होती. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्येच्या संख्येत वाढ होत आहे. वर्ष २००८ ते २०१८ या ११ वर्षांच्या

**तक्ता क्र.२**

**महाराष्ट्र राज्यातील शेतकरी आत्महत्या (२००८-२०१८)**

| **वर्ष** | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्रमाण** | १९६६ | १६०५ | १७४१ | १५१८ | १४७३ | १२१६ | १९८१ | ३२६३ | ३०६३ | २९७१ | २७६१ |

स्त्रोत -www.loksatta.com

काळातील महाराष्ट्र राज्यातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी पुढील तक्त्यावरून स्पष्ट करण्यात येत आहे.

तक्ता क्र. २ वरून असे दिसते की, दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्येत वाढ होत आहे. २०१५ मध्ये हे प्रमाण सर्वात जास्त आहे. वर्षातून हजारो शेतकरी अशा रीतीने आत्महत्या करीत असतील तर शेतकऱ्यांची संख्या तर कमी होईलच तसेच समाजजीवनावर त्याचा विपरित परिणाम होऊन शेतीकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलेल. आत्मीयतेने शेती केली जाणार नाही. शेती करणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन शेती कशी टिकेल हा प्रश्न आहे. सृष्टी जिवंत राहण्यासाठी शेतीची नितांत गरज आहे. यांत्रिक तांत्रिक प्रगतीने माणसाचे पोट भरणार नाही, जिवंत राहण्यासाठी त्याला अन्नाची गरज आहे. हे अन्न शेती पुरविणार आहे म्हणून शेती टिकली पाहिजे आणि शेती टिकण्यासाठी शेतकरी टिकविला पाहिजे.

शेतकरी आत्महत्या शेतीच्या कारणास्तव झाली आहे हे सिद्ध झाल्यास आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबास शासनाकडून नुकसानभरपाई मिळत असते. २००८ मध्ये महाराष्ट्र राज्यात एकूण १९६६ शेतकरी आत्महत्या झाल्या होत्या. त्यात १२७९ प्रकरण अपात्र होती. ३८ प्रकरण लाभास पात्र ठरली. २०१३ मध्ये १२९६ पैकी ६२९ प्रकरण अपात्र ठरली तर २०१८ मध्ये २७६१ आत्महत्या झाल्या होत्या, त्यातील १३३० प्रकरण पात्र व १०५० प्रकरण अपात्र ठरली.

जळगाव जिल्हा शेतीच्या बाबतीत भरपूर समृद्ध आहे तरीही तेथे शेतकरी आत्महत्या होतच असतात. जळगाव जिल्ह्यात जानेवारी ते डिसेंबर २०१८ या काळात १४१ आत्महत्या झाल्या होत्या. त्यातील ५१ प्रकरणात कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या झाल्या हे मान्य झाले आहे.

**शेतकरी आत्महत्येची कारणे**

शेतकरी आत्महत्येची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१. वारंवार पडणारे दुष्काळ -** गेल्या काही वर्षात जागतिक तापमानवाढीचा परिणाम शेतीच्या उत्पादकतेत घट होण्यात झाला आहे. जागतिक तापमान वाढीचा परिणाम नैसर्गिक ऋतुचक्रावर होऊन पर्जन्य, हवामान यात बदल होऊन अधूनमधून ओला दुष्काळ किंवा कोरडा दुष्काळ पडत असतो. दुष्काळामुळे शेतकऱ्याला नुकसान सहन करावे लागते.

**२. कर्जबाजारीपणा -** शेतकरी शेतीसाठी किंवा इतर कारणासाठी कर्ज घेत असतो. हंगाम आल्यावर कर्जाची फेड करता येईल या अपेक्षेवर तो असतो; परंतु निसर्गाने योग्य साथ दिली नाही तर त्याचा खर्चही भरून निघत नाही. कर्ज वेळेवर परत केले नाहीतर आपल्या मालमत्तेवर जप्ती येईल, या विचाराने तो नैराश्यात असतो आणि यातून पळवाट शोधण्यासाठी

तो आत्महत्येचा मार्ग अवलंबीतो.

**३. बाजारभाव -** दिवसेंदिवस शेती करण्याचा खर्च वाढत आहे. शेती क्षेत्रातील आधुनिकीकरण, बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांच्या वाढत्या किमती, मजुरीचे वाढते दर यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे. शेतकऱ्याला करावा लागणारा उत्पादन खर्च लक्षात घेऊन शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळाला पाहिजे; परंतु तसे होत नाही. अनेकवेळा हमी भाव कमी मिळाल्यामुळे शेतकऱ्याचा खर्च भरून निघत नाही.

**४. व्यसनाधिनता -** शेतकरी आत्महत्येत लहान शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न आधीच कमी असते त्यात त्यांना दारू, गुटखा, जुगार, लॉटरी असे व्यसन असते. ही व्यसने पूर्ण करण्यात त्याचा फार मोठा खर्च होतो आणि उत्पन्न खर्चाचा ताळमेळ चुकतो. जीवनावश्यक गरजा पूर्ण करणे कठीण होते आणि नैराश्यातून तो आत्महत्येला प्रवृत्त होतो.

**५. आर्थिक सुधारणा -** १९९१ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्वीकार करून जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण धोरण राबविण्यास सुरुवात केली आणि बी-बियाणे, रासायनिक खते यावरील अनुदान कमी करण्यात आले, त्यामुळे त्यांच्या किमती वाढून शेतीचा उत्पादन खर्च वाढला. तसेच बहुराष्ट्रीय कंपन्याच्या मक्तेदारीमुळे शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नाही.

**६. वाढत्या गरजा -** जागतिकीकरण व उदारीकरणाच्या धोरणामुळे चंगळवादी संस्कृती निर्माण झाली आहे. आपल्या उत्पन्नाचा विचार न करता शेतकऱ्यांनी आपल्या गरजा विनाकारण वाढविल्या आहेत. गाडी, मोबाईल, कपडे, हॉटेलिंग, महागड्या शाळा यावर अफाट खर्च होत आहे. त्यामुळे खर्च जास्त उत्पन्न कमी अशी स्थिती झाली आहे.

**७. पूरक उद्योगांची कमतरता -** शेतकरी प्रामुख्याने एकट्या शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून राहत असल्यामुळे तो आर्थिक अडचणीत येतो. शेतीवर आधारित व शेतीशी संबंधित असणारे अनेक व्यवसाय कमीतकमी खर्चात शेतकऱ्याला करता येतात; पण आत्मविश्वासाचा अभाव आणि नकारार्थी वृत्ती यामुळे तो एकट्या शेतीवर अवलंबून राहतो.

**८. सामाजिक प्रतिष्ठा -** सर्वांचाच सर्वांत जास्त खर्च मुलीचा विवाह आणि अंत्यसंस्कार, क्रियाकर्म, श्राद्ध, मुलाचे बारसे, वाढदिवस, सणवार साजरे करणे यावर होत असतो. याला शेतकरीही अपवाद नाही. सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी हा फार मोठा खर्च होत असतो; पण त्यामुळे शेतीत तसेच आवश्यक त्या ठिकाणी खर्च करू शकत नाही आणि उत्पन्न खर्चाचा ताळमेळ बिघडतो.

**९. व्यापारी, दलाल यांच्याकडून होणारे शोषण -** अनेक नियम, कायदे करूनही भारतीय कृषी विपणन व्यवस्थेत अनेक दोष आजही आहेत. व्यापारी, दलाल यांच्याकडून वजनमापात भाव ठरविण्यात शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणावर होते. शेतकऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून फार मोठी कसर कापण्यात येते. त्याचा माल निकृष्ट प्रतीचा भासवून कमी किंमत दिली जाते. तसेच ऐन मोक्याच्या वेळेस कृत्रिम टंचाई निर्माण करून बी-बियाणे, रासायनिक खतांचे भाव वाढविले जातात.

**१०. शासकीय धोरण -** शासकीय कृषी धोरण चुकीचे आहे. शासनाकडून शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या जातात. पण त्यातील अनेक योजना गरजू लहान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव दिला जात नाही. पीक विमा योजना असो की कर्जमाफीची योजना

असो तिची अंमलबजावणी योग्यरीतीने होत नाही. पीक विम्याचे पैसे मिळण्यास विलंब होतो.

**शेतकरी आत्महत्या थोपविण्याचे उपाय**

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येच्या अध्ययना-वरून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी काही उपाय सांगता येतात.

**१.शेती पूरक व्यवसाय -** महाराष्ट्रातील शेतकऱ्याने शेतीबरोबरच शेतीवर आधारित पूरक व्यवसाय केले तर त्याच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच शेतीत नुकसान आले तरी त्याला बसणारी आर्थिक झळ कमी असेल. कारण त्याचे उत्पन्न शून्यावर येणार नाही. इतर व्यवसायातून त्याला थोडेफार तरी उत्पन्न मिळेल. शासनाकडून पूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहकार्य व सवलती पुरविण्यात याव्या. तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी.

**२.स्वावलंबन वृत्ती -** शेतकऱ्यामधील स्वावलंबी वृत्तीत वाढ झाली तर शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ येणार नाही. शेतकरी फार मोठ्या प्रमाणावर शासनाच्या मदतीवर अवलंबून राहतात. कर्ज घेताना कर्जमाफ होईल, या आशेने घेतले जाते. पीक विम्याचे पैसे मिळतील अशा आशेवर शेतकरी थांबलेला असतो; पण अपेक्षाभंग झाल्यास त्याचे उत्पन्न खर्चाचे नियोजन चुकते. शासकीय मदत व सहकार्यामुळे शेतकरी पंगु झाला आहे, असे खेदाने म्हणावे लागते.

**३. जाणीव जागृती -** साधारणपणे कमकुवत मनाची व्यक्ती आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत असते. पण त्यामुळे तिचे कुटुंबीय ,समाज व राष्ट्राला नुकसान सहन करावे लागते. राष्ट्राने तिच्यावर केलेला खर्च वाया जातो. शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये म्हणून आत्महत्येच्या परिणामाविषयी शेतकऱ्यामध्ये जाणीवजागृती करावी. आत्महत्येने प्रश्न सुटत नाही तर उलट वाढतात, हे शेतकऱ्यांना समजले पाहिजे.

**४. सिंचन व्यवस्था -** शेतकरी आत्महत्येच्या आकडेवारीवरून असे दिसते, कोरडवाहू जमीन असलेल्या विदर्भासारख्या भागात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. जर कोरडवाहू जमिनीत सिंचनाच्या सोयी केल्या, पाणीपुरवठ्याच्या सोयी केल्या तर शेतकरी वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेऊ शकेल आणि एकतरी हंगामातून त्याला पुरेसे उत्पन्न मिळेल.

**५. योजनाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता -** शेतकरी हितार्थ अनेक योजना शासनामार्फत राबविल्या जातात; पण त्यांची अंमलबजावणी दोषपूर्ण असते. गरजू लोकांपर्यंत योजना पोहोचत नाही किंवा त्यांना काही ना काही कारणामुळे योजनाचा लाभ मिळू दिला जात नाही. पीक विमा योजना, कर्जमाफी योजना यातही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे दिसते.

**६. उत्पादन खर्चावर आधारित भाव -** कृषिमालाचे भाव उत्पादन खर्चाचा विचार करून ठरविण्यात आले तर खर्च जास्त उत्पन्न कमी अशी स्थिती होणार नाही. तसेच कृषिमूल्य आयोग ज्या प्रमुख पिकांच्या किमती ठरविते त्यात आणखी काही महत्त्वाच्या पिकांचा समावेश होणे गरजेचे आहे. तसेच कृषिमूल्य आयोगातील सदस्य शेतीचे संपूर्ण ज्ञान असलेले, शेतकऱ्यांच्या समस्या जाणणारे, संबंधित भागाची व पिकाची परिपूर्ण माहिती असणारे असावेत.

**७. सुलभ कर्जपुरवठा -** शेतकऱ्यांना बँका व वित्तीय संस्थांद्वारे विनाविलंब पुरेसा वित्तपुरवठा करण्यात आला तर शेतीची कामे वेळेत करणे शक्य होईल. तसेच शेतीचे आधुनिकीकरण करून जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त करता येईल.

**८. शून्य टक्के व्याजाने कर्जमाफी -** नैसर्गिक परिस्थितीची प्रतिकूलता असेल तर शेतकऱ्याला

घेतलेले कर्ज परत करणे शक्य होत नाही. अशावेळेस त्यांना पूर्ण कर्जमाफी देऊ नये तर व्याज न घेता मुद्दल वसूल करण्यात यावे किंवा कर्ज परतफेडीची मुदत वाढविण्यात यावी.

**९. मृदा संवर्धन -** शेतजमिनीची सुपीकता तपासणे, सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी खबरदारी घेणे व योग्य ते उपाय अंमलात आणणे, जमिनीतील ओल टिकविण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण करणे, वात विरोधकांचा वापर करणे, जास्तीच्या तापमानापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतात सावली देणारे वृक्षांची लागवड करावी या उपायांचा अवलंब केल्यास होणारे नुकसान बऱ्याच प्रमाणात टाळता येते.

**१०. मदतीऐवजी शेतकरी आत्महत्या होणार नाही याची काळजी घ्यावी -** शेतकरी आत्महत्येची शासन दरबारी नोंद झाल्यावर चौकशी सुरू होते. लाभ मिळण्यास कुटुंब पात्र आहे की अपात्र आहे याची शहानिशा होते. कुटुंब शेतीच्या कारणास्तवच आत्महत्या आहे, असे भासविण्याचा प्रयत्न करीत असते यामुळे खरा प्रश्न सुटत नाही तर उलट वाढतो. कारण काही शेतकरी आत्महत्या करताना हाही विचार करतात आपण गेलो तर कुटुंबाला आर्थिक मदत मिळून त्याचं चांगलं होईल. तसेच फार मोठे कर्ज डोक्यावर असलेला शेतकरी विचार करतो, आपल्याने जिवंतपणी कर्ज फिटणार नाही पण आत्महत्या केली तर नुकसानभरपाईतून कर्जाची परतफेड होईल. म्हणून शासनाने मदतीऐवजी शेतकऱ्यांच्या समस्या जाणून ठोस उपाययोजना राबवाव्यात.

## निष्कर्ष

१. दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
२. कोरडवाहू शेती असलेला भाग आणि शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध आहे.
३. पुरुष शेतकऱ्यांपेक्षा महिला शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी आहे.
४. शेती पूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी आहे.
५. शासकीय मदतीऐवजी शासकीय आधाराने शेतकरी आत्महत्येचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

## संदर्भ


१. प्रा.स.श्री.मु.देसाई, प्रा.सौ.भालेराव, कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय, निराली प्रकाशन, पुणे.
२. Krishhi.Maharashtra.gov.in date 29/1/2020.
३. National Crime Records Bureau date 25/1/2020
४. https//www downearth.org.in date 28/1/2020.
५. https//.indiaspend.com farmer suicidedate 24/1/2020.
६. https//www.world data.com,date25/1/2020.
७. www.loksatta.com,date24.1/2020.


◆

स्वतःसाठी विचार करणे ही एक ध्यैर्यपूर्ण कृती आहे

**- कोको चॅनल**

# महिलांचे स्वावलंबन आणि स्त्री उद्योजकता

**जयश्री दिलीप सरोदे**†

**प्रस्तावना**

स्त्री म्हणजे विश्वकर्त्यानं आपल्या पहिल्याच साखरझोपेच्या वेळी टाकलेला एक हळुवार नि:श्वास असावा! त्या नि:श्वासात पुरुषाच्या जळणाऱ्या मनाला शांत करण्याची प्रचंड ताकद असते. आज स्त्री पुरुषाच्या बरोबरीने प्रगती करते आहे. म्हणूनच स्त्रीशक्तीचा आढावा घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. एखादा उद्योग किंवा सरकारी नोकरी म्हटले की, पुरुष डोळ्यांसमोर यायचे हा काळ होता. १९८०-९० च्या दशकातल्या त्या काळात स्त्रियांनी नोकरी करणे म्हणजे कमीपणा! आपल्या घरातील स्त्रियांनी 'चूल आणि मूल' एवढंच पाहावं, अशी मानसिकता त्यावेळी होती. त्यामुळे घरातील कर्तीधर्ती माणसं स्त्रियांना नोकऱ्या करू देत नसत. स्त्रियांनी कशाला नोकरी, उद्योग करायचा ते बायामाणसाचं काम थोडंच असतं, असे सूर ऐकायला येत.

परंतु सध्या ही परिस्थिती बदलली आहे. या बदलामुळे आजच्या काळात स्त्रीही पुरुषाच्या बरोबरीने काम करत आहे. यामुळे आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा वाढता सहभाग आपण पाहत आहोत. स्त्री आज स्वावलंबी बनत असल्यामुळे स्वत:च्या पायावर उभी राहण्याची क्षमता तिच्यामध्ये निर्माण झाली आहे. काही महिला नोकरी न करता स्वत:चा गृहउद्योग सांभाळत आहे. याबरोबरच बचत गटाच्या माध्यमातून लघुउद्योगाला आणि गृहउद्योगांना चालना मिळत आहे. यामुळे बचत गटाच्या माध्यमातून विविध प्रयोग राबवले जात आहे.

**शोधनिबंधाची आवश्यकता**

भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. त्यात महिलांना मानाचे स्थान पुरातन काळापासून प्राप्त झालेले आहे. विद्येची देवता 'सरस्वती' आणि संपत्तीची देवता 'लक्ष्मी' मानून त्यांची पूजा केली जाते. आता उद्योग, व्यवसायाच्या क्षेत्रातही महिलांना खूप वाव आहे. अर्थातच केवळ नोकरीत झेप घेणे एवढेच महिलांच्या दृष्टीने क्षेत्र आहे असे नाही. उद्योजक होण्याचे आवाहनही मोठे आणि त्यात आव्हानंही खूप आहे. उद्योग म्हणजे चरितार्थाचे साधन म्हणून मिळवायच्या पैशाचे क्षेत्र किंवा प्रयत्न. त्यामध्ये गुंतवणूक, धोका, स्पर्धा आणि धाडसही खूप आहे.

संशोधिकेच्या मते, उद्योजकांच्या अंगी काही

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, दादासाहेब दे. ना. भोळे महाविद्यालय, भुसावळ, जि. जळगाव
आजीव सभासद क्र. : ७३४, भ्रमणध्वनी : ९४२३९७५७२०, ई-मेल : jayshri68@rediffmail.com

महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये असणे आवश्यक आहे. सचोटी, कसोटी आणि हातोटी या त्रिसूत्रीची उपासना करण्याची त्याची तयारी असावी. यासाठी शोधनिबंधात उद्योजकांच्या अंगी आवश्यक गुणवैशिष्ट्ये, यशस्वी उद्योजक महिलांच्या यशापयशाचे विवरण विशद केले आहे. जेणेकरून नवीन होवू घातलेल्या उद्योजिकांना या अभ्यासाचा फायदा होईल.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

१) ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील स्त्रियांपुढील उद्योजकीय संघर्षाची भिन्नता.

२) महिला सक्षमीकरणासाठी महिला धोरणाचा अभ्यास करणे.

३) स्त्री एक आदर्श व्यवस्थापक आहे हे अभ्यासणे.

४) जगभरात उद्योजक क्षेत्रामध्ये भारतीय स्त्रियांचे योगदान अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती**

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करताना घटक विश्लेषण (Data Analysis) या पद्धतीचा वापर केला. त्यासाठी तथ्य संकलन व माहिती संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीचा आधार घेतला आहे.

**ग्रामीण व शहरी स्त्री उद्योजकीय संघर्षाची भिन्नता:-**

स्त्रियांच्या उद्योजकतेचा विकास करण्यासाठी धोरणांची आखणी करीत असताना शहरांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया व ग्रामीण परिसरात राहणाऱ्या व कार्य करणाऱ्या उद्योजक स्त्रियांचा वेगवेगळा विचार करावा लागेल. उद्योजकतेची वृत्ती हा घटक सन्माननीय अपवाद वगळल्यास ग्रामीण परिसरात राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांपुढील समस्या अनेक बाबतीत कमालीच्या भिन्न आहे.

१) शहरामध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया सुशिक्षित एवढेच नव्हे तर सुविद्य असतात. खेड्यांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य उद्योजक स्त्रिया या निरक्षर असतात.

२) शहरांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रिया या मध्यम वर्ग किंवा संपन्न कुटुंबातून आलेल्या असतात. याउलट खेड्यामधील बहुसंख्यांक उद्योजक स्त्रिया कपट करणाऱ्या कुटुंबातून आलेल्या असतात.

३) शहरामध्ये राहणाऱ्या बहुसंख्यांक उद्योजक स्त्रियांचे माहेर उपजीविकेसाठी नोकरीवर अवलंबून असणारे तर सासरी व्यवसायाची कौटुंबिक पार्श्वभूमी असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

खेड्यांमध्ये राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांचे माहेर व सासर उपजीविकेसाठी सर्वस्वी किंवा अंशत: शेतीवर निर्भर असणारे असते.

४) शहरांमधील बहुतेक स्त्रियांना ज्या उद्योजक बनण्यापूर्वी त्यांना फावला किंवा रिकामा वेळ आहे. या वेळेचा उपयोग करावयाच्या दृष्टीने त्या उद्योजकतेकडे वळलेल्या असतात.

ग्रामीण परिसरात राहणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत 'फुरसतीचा वेळ' शब्द त्यांच्या शब्दकोषातच नसतो. सूर्योदयापूर्वी आपला जीवनक्रम सुरू करणाऱ्या ग्रामीण स्त्रियांचे दैनिक कामकाज स्त्रियांच्या बाबतीत 'फुरसतीचा वेळ' ही एक मोठी काल्पनिक चैन ठरते.

५) शहरात राहणाऱ्या उद्योजक स्त्रियांच्या बाबतीत त्यांनी स्वत:ला व्यस्त ठेवणे, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करणे, स्वत:ची आवड किंवा हौस जोपासणे, पैसे मिळविणे, आव्हान स्वीकारणे अशा त्यांच्या प्रेरणा असतात.

ग्रामीण परिसरात राहून काम करणाऱ्या उद्योजक स्त्रियांच्या बाबतीत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीवर मात करणे, कुटुंबाकरिता उत्पन्नाचा स्रोत निर्माण करणे. कुटुंबांच्या परंपरागत व्यवसायाची विस्कटलेली

घडी नव्याने नीट बसविणे. परंपरागत औद्योगिक कौशल्यांचा वारसा सांभाळणे या त्यांच्या प्रमुख प्रेरणा असतात.

६) शहरात राहणाऱ्या बहुसंख्यांक उद्योजक स्त्रियांची घरची आर्थिक परिस्थिती चांगली असते. या उद्योजक स्त्रियांना घरातील पुरुषांकडून संपूर्ण किंवा अंशतः संरक्षण व साहाय्य होते. या स्त्रिया सुविद्य असल्यामुळे त्या अत्यंत आत्मविश्वासाने बाहेरच्या जगात वावरतात. अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व साहाय्य मिळवितात, आपले कामे करून घेतात आणि स्वतःच्या प्रश्नांची सोडवणूक करतात.

याउलट ग्रामीण परिसरातील स्त्रियांना प्रखरतेने परिस्थितीचा सामना करावा लागतो. पुरुषांचा विरोध मोडून काढावा लागतो. प्रथा, परंपरा व चालीरीतीशी संबंधित अडथळ्यांमधून मार्ग काढावा लागतो. उपहास व उपेक्षा सहन करीत स्वतःचे प्रश्न निर्धाराने सोडवावे लागतात.

**ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांपुढे असणाऱ्या समस्या**

ग्रामीण परिसरातील स्त्रिया उद्योजकांना वर उल्लेखिलेल्या समस्यांना तोंड द्यावे लागते हे तर खरेच, पण या स्त्री उद्योजकांना आणखीही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**१) दारिद्र्य, विषमता व विविधता**

दारिद्र्य, विषमता आणि आर्थिक विवशता ही ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांची प्रमुख समस्या आहे. त्यापैकी अनेक स्त्रियांच्या कुटुंबांना तर परंपरागत दारिद्र्याचा वारसा प्राप्त झालेला असतो. या स्त्रियांना आपल्या दैनंदिन कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शिवाय शेतीमध्ये किंवा अन्यत्र काम करून कुटुंबाकरिता उपजीविकेचे साधन मिळवावे लागते. या स्त्रियांजवळ त्यांच्या अत्यंत अपुऱ्या उत्पन्नामुळे बचत अशी काही नसतेच. त्यामुळे उपक्रमाला आवश्यक असलेली भांडवल निर्मिती कुठून व कशी होणार त्यामुळे ग्रामीण स्त्री उद्योजकांना बाजारात यश मिळत नाही.

**२) निरक्षरता, शिक्षणाचा अभाव**

निरक्षरता किंवा शिक्षणाचा अभाव ही ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांची फार महत्त्वाची समस्या आहे. ग्रामीण परिसरात राहणाऱ्या अनेक स्त्रियांना लिहिता-वाचता येत नाही. लोकांशी नीटपणे संपर्क साधता येत नाही. परिणामतः या स्त्रियांना नाइलाजाने त्यांच्या कुटुंबातील पुरुषांवर अवलंबून राहणे भाग पडते. स्वतंत्रपणे निर्णय घेणे हे तर त्यांच्याकरिता फार मोठे साहस ठरते. खेड्यांमध्ये प्रचलित असलेल्या समाज व्यवस्थेमुळे आजही ग्रामीण स्त्रिया अनेकांच्या टीकेचे लक्ष्य ठरतात.

**३) उपयुक्त माहितीचा अभाव**

उद्योजकतेची वाट चोखाळण्याची किंवा स्वतंत्रपणे एखादा प्रकल्प पूर्ण करण्याची आकांक्षा असणाऱ्या अभिप्रेरित स्त्रियांना अनेक प्रकारच्या माहितीची गरज असते. विशिष्ट खेड्यांमध्ये असलेली परिस्थिती तेथे उपलब्ध असलेला कच्चा माल, साधनसामुग्री, तंत्रज्ञान, कौशल्ये इत्यादी बाबींचा विचार करून तिथे कोणत्या प्रकारचा उपक्रम स्थापन करता येईल, हे ठरविले जाते. या उपक्रमाला भांडवल किती लागेल? हे भांडवल कुठून व कसे मिळवायचे? उपक्रमाला कोणती यंत्रसामुग्री आवश्यक आहे? ही यंत्रसामुग्री कशी मिळवायची? आवश्यक असणारा कच्चा माल कुठे मिळेल? उत्पादित वस्तूंची बाजारपेठ नेमकी कुठे आहे. उद्योजकतेची वाट चोखाळण्याची आकांक्षा असलेल्या ग्रामीण स्त्रियांना अशा व इतर किती तरी बाबतीत माहितीची आवश्यकता असते. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांना आपली वाट स्वतंत्रपणे चोखाळणे

शक्य होत नाही. आवश्यक माहितीचा अभाव ही ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांची एक फार महत्त्वाची समस्या आहे.

**४) जोखीम**

प्रत्येक उद्योजकाला स्थापनेमध्ये व नंतरच्या अवस्थांमध्ये विहित असलेल्या विविध प्रकारच्या जोखमींची जबाबदारी अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते. या नियमाला ग्रामीण स्त्री उद्योजक अपवाद नाहीत. उपक्रमांशी संबंधित असलेल्या विविध प्रकारच्या जोखमीची जबाबदारी स्पष्टपणे स्वीकारल्याशिवाय कोणत्याही उद्योजकाचा प्रकल्प अस्तित्वात येऊ शकत नाही. दुर्दैवाने बहुतेक ग्रामीण स्त्री उद्योजकांना त्यांच्या उपक्रमांमध्ये विहित असलेली जोखीम स्वीकारणे शक्य होत नाही.

**५) प्रशिक्षणाचा अभाव**

नवीन उपक्रमांची स्थापना करण्यासाठी उद्योजकांना कायद्यामधील तरतुदी व नियमांनुसार अनेक कार्ये करावी लागतात. उपक्रमाला आवश्यक असलेली घटकांची जुळवाजुळव करणे ही उद्योजकांना भेडसावणारी महत्त्वाची समस्या आहे. उत्पादनाच्या प्रक्रिया गुंतागुंतीच्या असतात. या प्रक्रियेचे नेमके स्वरूप समजून घेण्याकरिता उद्योजकांना उत्पादन प्रक्रिया व इतर बाबींबद्दल तांत्रिक ज्ञान आवश्यक असते. ग्रामीण विभागातील स्त्री उद्योजक जीवन संघर्षात होरपळलेल्या असतात. या स्त्रिया जेथे सुरक्षित नसतात तिथे त्या प्रशिक्षित कुठे असणार? प्रशिक्षणाच्या अभावी ग्रामीण विभागातील स्त्री उद्योजकांना तांत्रिक ज्ञान मिळविता येत नाही. आवश्यक कौशल्ये आत्मसात करून घेता येत नाही. उद्योजकांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या सरकारी यंत्रणा आपल्या देशात अलीकडे अस्तित्वात आल्या आहेत. पण या सरकारी यंत्रणांचे कार्यक्षेत्र व कार्याची व्याप्ती अत्यंत मर्यादित आहे. या सरकारी उद्योजकतेची प्रवृत्ती असणाऱ्या स्त्री-पुरुषांना या सर्व सरकारी यंत्रणांचा अद्याप फायदाही झालेला नाही.

**६) बाजारपेठेबद्दल अज्ञान**

ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांना भेडसावणारी एक महत्त्वाची समस्या आहे, वस्तूंच्या विक्रीची. या स्त्री उद्योजकांना आपल्या वस्तूंची नेमक्या कोणत्या बाजारपेठेत मागणी आहे याची सुतराम कल्पना नसते. या उद्योजकांची साधने इतकी कमालीची अपुरी असतात की, या वस्तू योग्य बाजारपेठेत पोहचविण्याची व्यवस्था करणेही त्यांना शक्य होत नाही. उपक्रम यशस्वी करण्याकरिता स्त्री उद्योजकांनी संभाव्य ग्राहकांच्या गरजा व अपेक्षा जाणून घेणे, त्यानुसार वस्तूंचे उत्पादन करणे व नंतर ग्राहकांना योग्य किमतीवर वस्तू उपलब्ध करून देणे आवश्यक असते. बाजारपेठेबद्दलचे अज्ञान व अत्यंत अपुरी साधने या कारणांमुळे ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजकांना ही तिन्ही कार्ये करणे शक्य होत नाही.

**७) वस्तूंची कमी गुणवत्ता जास्त उत्पादन खर्च**

शहरातील उद्योजकाजवळ उत्पादन कार्याचे आधुनिक तंत्र असते. त्यांना उत्पादन कार्याची अद्ययावत माहिती असते. त्यामुळे शहरात राहून उत्पादनाचे कार्य करणाऱ्या उद्योजकांच्या कारखान्यात उत्पादन होणाऱ्या वस्तू तुलनेने श्रेष्ठ दर्जाच्या व कमी उत्पादन खर्च असलेल्या असतात.

यांच्या नेमकी उलट परिस्थिती ग्रामीण उद्योजकांची असते. ग्रामीण क्षेत्रातील स्त्री उद्योजकांना सातत्याने सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेला तोंड द्यावे लागत असल्यामुळे या उद्योजकांनी स्थापन केलेल्या उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तू एका बाजूने तुलनेने कमी गुणवत्तेच्या असतात तर दुसऱ्या बाजूने जास्त

उत्पादन खर्चाच्या असतात. त्यामुळे ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक शहरांमधील उद्योजकांच्या स्पर्धेत टिकू शकत नाही. या ग्रामीण स्त्री उद्योजकांनी स्थापन केलेल्या उपक्रमांची नफा मिळविण्याची क्षमता मुळातच अत्यंत कमी असते. त्यातच बाजारपेठेत जीवघेणी स्पर्धा असल्यामुळे व या स्पर्धेत टिकून राहण्याची क्षमता नसल्यामुळे ग्रामीण परिसरातील स्त्री उद्योजक आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीच संघर्ष करीत असतात.

**महिला सक्षमीकरणासाठी**

'महिलांचे सक्षमीकरण म्हणजे देशाचा विकास' ही बाब लक्षात घेऊन पुरोगामी महाराष्ट्राने १९९४ मध्ये स्वतंत्र महिला धोरण आणून महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल टाकले; परंतु महिला सक्षमीकरणासाठी उपक्रमांबरोबरच निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग आवश्यक आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने २००१ मध्ये नवे महिला धोरण जाहीर केले. या दोन्हीही धोरणांद्वारे महिलांच्या विकासाच्या विविध बाबींवर विशेष लक्ष देण्यात आले. त्यामुळे महिलांमध्ये शैक्षणिक प्रगती, आरोग्यात सुधारणा, महिलांच्या मालमत्तेवरील हक्क, कायद्याची जनजागृती ही काही ठळक ध्येय पार पाडण्यास मदत झाली.

महाराष्ट्राच्या विकासाचा चढता आलेख विचारात घेतला तर त्यामध्ये महिलांचे असलेले योगदान ठळकपणे जाणवत आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहे. महिलांकरिता करण्यात आलेल्या धोरणाचा हा परिणाम आहे; परंतु असे करीत असताना २१ व्या शतकात येणाऱ्या नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून महिलांच्या या धोरणांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोरील आव्हाने वाढत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राने आपले दुसरे महिला धोरण २००१ मध्ये जाहीर केले होते. दरम्यान सामाजिक, आर्थिक तसेच मानसिक परिस्थितीतही अनेक बदल घडून आले या बदलांना लक्षात घेऊन तिसऱ्या महिला धोरणाचा मसुदा निश्चित करण्यात आला आहे. महिला धोरणाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- महाराष्ट्रातील महिलांचा सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी प्रागतिक दृष्टिकोन रुजविणे व पुरुषप्रधान मानसिकता बदलण्यावर अधिक भर देणे व स्त्री-पुरुष हितसंबंध अधिक सौहार्दपूर्ण व निकोप व्हावेत यासाठी प्रयत्न करणे. महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये समान संधी व त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करता येण्यासाठी आवश्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करून देणे.
- धर्म, वंश, जात, सत्ता, प्रदेश या कारणांमुळे वाढत्या हिंसेचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी स्त्रियांना पाठबळ देणे, किंबहुना या प्रकारच्या हिंसा होणारच नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे.
- मुलींची घटणारी संख्या थोपवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.
- स्त्रियांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे.
- सर्व क्षेत्रातील महिलांचा नियोजन व निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविणे. त्याद्वारे सर्व स्तरावरील महिलांच्या हिताचे संवर्धन होईल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
- समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या देवदासी, वेश्या, तमाशांतील स्त्रिया, तृतीयपंथी, एकल व असंघटित क्षेत्रातील स्त्रियांच्या

पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे. तसेच महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजणे.

अशा प्रकारे महिला धोरणांची उद्दिष्ट्ये आहेत. तसेच महिला धोरणांमध्ये महिलांसाठी सनद, जेंडर बजेट, साधन केंद्रनिर्मिती, शिक्षण आणि संशोधन, महिला वसतिगृहे, पाळणाघरे, आरोग्य, महिला व उद्योग, महिला आणि कायदा या सर्व बाबींची तरतूद करण्यात आली. जेणेकरून महिलांची असुरक्षितेची भावना कमी होऊन त्या उद्योजकतेकडे व त्याची परिणीती म्हणून त्यांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होण्यास मदत होईल.

**स्त्री : एक आदर्श व्यवस्थापक**

एक प्रकारची इमोशनल लिटरसी तिला जन्मताच असते. प्रत्येक गोष्टीकडे व्यावसायिक दृष्टीने पाहण्याची सवय तिला आपोआप पडते. आपल्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे तिला ही देणगी प्राप्त होते. लहानपणापासूनच अमुक असंच वागायचं, अमुक एक गोष्टच करायची अशी बंधने तिच्यावर लादली जातात. २० वर्ष आई-वडिलांकडे राहिल्यावर हे मायेचे पाश तोडून पतीच्या घरी जावे लागते. म्हणजे भावनिकदृष्ट्या कुठेच ती गुंतत नाही. आपोआप त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याची सवय तिला लागते. म्हणूनच उद्योजकतेतही ती पुरुषांपेक्षा जास्त यशस्वी होऊ शकते. पतीच्या घरी आल्यावरही मुलांचा सांभाळ, सासरच्या मंडळींची मर्जी सांभाळणे. या धकाधकीची तिला आपोआप सवय लागते. अशा प्रकारे अनेक समस्यांतून मार्ग काढणाऱ्या स्त्रीला उद्योगात ठरविल्यास निश्चितच यश मिळू शकते. कारण बालपणापासून प्रत्येक आघाडीवर लढणारी ही स्त्री कॅल्कुलेड रिस्क घेऊन उद्योगात अयशस्वी होऊ शकत नाही. हे कित्येक स्त्रियांनी आता सिद्ध केले आहे.

महात्मा ज्योतिराव फुल्यांनी सांगितले त्यानुसार घरातील एक स्त्री सुशिक्षित झाल्यास संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होण्यास मदत होते. तसेच कुटुंबातील एक महिला उद्योजक झाल्यास संपूर्ण उद्योजकीय होण्यास वेळ लागत नाही. सर्व स्त्रियांना नोकरी मिळण्याची आता परिस्थिती नाही त्यामुळे त्यांनी आता उद्योजकतेकडे वळणे आवश्यक आहे. स्त्रिया पटकन कुठलीही गोष्ट आत्मसात करू शकतात. फक्त गरज आहे हा दृष्टिकोन दृढ करण्याची आणि पुढे पाऊल टाकण्याची. भारतीय दूरदर्शन उद्योग असो, ट्रॅक्टर उत्पादन, वर्तमानपत्र, इंजिनिअरिंग कंपनी, अन्न व शीतपेय कंपनी, परदेशी बँक, सौंदर्य प्रसाधने, बायोटेक्नॉलॉजी, ऊर्जा-रिअल इस्टेट, शैक्षणिक, ट्रॅव्हल्स इ. सर्वच प्रकारच्या उद्योजक क्षेत्रामध्ये भारतीय स्त्रियांनी जगभरात नाव कमावले आहे. हे कित्येक स्त्रियांनी आता सिद्ध केले आहे. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे

**इंद्राकृष्णमुर्ती नूयी**

यांनी जगातील प्रसिद्ध अन्न व शीतपेय कंपनी पेप्सीच्या चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून कार्य करून अत्यंत यशस्वीपणे आपली कार्यक्षमता सिद्ध करून दाखविली व कंपनीचा वार्षिक महसूल त्यांनी ७२ टक्क्यांनी वाढविला व नफा दुप्पट मिळविला.

**एकता कपूर**

यांच्या बालाजी टेलीफिल्मस कंपनीने २५ पेक्षा अधिक दूरदर्शन मालिका तयार केल्यात व लोकप्रियतेचा उच्चांक मोडला.

**मल्लिका श्रीनिवासन**

यांनी ट्रॅक्टर उत्पादनाच्या उद्योगधंद्यात स्वत:चे वेगळे असे स्थान निर्माण केले. इकॉनॉमिक्स टाइम्सने २००६ साली त्यांना सर्वश्रेष्ठ महिला उद्योगपती

ठरविले. त्या ट्रॅक्टर क्विन म्हणून प्रसिद्ध झाल्यात.

**शोभना भारती**

यांनी भारतातील मुख्य अशा हिंदुस्थान टाइम्स ग्रुपच्या उपचेअरपर्सन आणि संपादकीय संचालक या पदावर काम करून हिंदुस्थान टाइम्सला अधिक प्रखर व तेजस्वी वर्तमानपत्र बनविले.

**सुज्जला फिरोदीया मोटवानी**

यांनी कायनेटिक इंजिनिअरिंग कंपनीला मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहून यशाच्या उच्च शिखरावर पोहचविले.

**नैनालाल किडवाई**

या भारतातील एच. बी. एस. सी. (HBSC) या परदेशी बँकेचे काम पाहणाऱ्या पहिल्या महिला जनरल मॅनेजर आहेत. त्यांना त्यांच्या कामाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**शहनाझ हुसेन**

यांनी जडीबुटी, विविध अर्क यांच्या साहाय्याने भारतीय सौंदर्य पद्धती शोधून काढली आणि सर्व जगात ती यशस्वी करून दाखविली. जगात ६०० केंद्राचे जाळे त्यांनी उभे केले असून त्यांची उलाढाल ४०० कोटी रुपयांवर आहे.

**फराह खान**

यांनी ८० भारतीय सिनेमात १०० पेक्षा जास्त नृत्याची कोरिओग्राफी करून प्रसिद्धी मिळविली. त्या फिल्म डायरेक्टर आणि कोरिओग्राफर आहेत.

**डॉ. किरण मुजूमदार**

ह्या भारतातील सर्वात मोठी जैवतंत्रज्ञानात्मक कंपनी बायोकॉन कंपनी लिमिटेडच्या चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर असून श्रेष्ठ उद्योगपती आहेत. २००४ मध्ये त्या भारतातील सर्वात श्रीमंत महिला होत्या. त्यांना पद्मश्री (१९८९), पद्मभूषण (२००४), सर्वोत्कृष्ट बिझिनेस वुमन हे पुरस्कार मिळाले आहेत.

अशा भारतीय स्त्रियांनी जगभरात नाव कमविलेले आहेत. वरीलप्रमाणे अशी कितीतरी उदाहरणे आहेत. या स्त्रियांनी जिवापाड मेहनत घेऊन देशभरातच नव्हे; तर जगात आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी दुर्बल न राहता आपल्या नव्या कल्पना, नवी ताकद, प्रतिभा, कौशल्य इ. जगाला दाखवून दिले. ह्या सर्व जर करू शकतात या क्षेत्रात जर मेहनत घेऊन यशाची शिखरे गाठता येतात; तर धीरूभाई अंबानी, टाटा-बिर्ला, बिल गेटस् सारखे भारतीय स्त्रियांनी सर्वोच्च असे उद्योजक होणे काय अवघड आहे.

**निष्कर्ष**

पुरुष आणि महिला हे विकास प्रक्रियेचे केंद्रबिंदू आहेत. त्यांच्या गरजाही सारख्याच आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांच्या कर्तबगारीला मर्यादा पडत होत्या. संधी मिळाल्यास कर्तबगारी सिद्ध करण्यात त्या पुरुषांपेक्षाही सरस आहेत हे आता सिद्ध झाले आहे. बदलती सामाजिक परिस्थिती, तंत्रज्ञानाच्या विस्तारणाऱ्या कक्षा, वाढती महागाई आणि परिस्थितीच्या हेव्याने स्त्रियांना संधीची दालने खुली होत आहेत. या संधीचा त्या पुरेपूर फायदा उचलत आहेत. हे सर्वच क्षेत्रांतील महिलांच्या नेत्रदीपक यशाने सिद्ध केले आहे. उद्योजकतेचे उपजत गुण असणारी स्त्री ही संधी आणि भावनिक आधार मिळाल्यास उंच झेप घेऊन कोणतेही आकाश छेदून जाऊ शकते. पुरुषाच्या संसाराची जबाबदारी आणि आता त्यांच्या आर्थिक प्राप्तीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारी महिला खऱ्या अर्थाने उद्योजक आहे. महिलांनी आता उद्योजकतेच्या क्षेत्रात पाऊल टाकणे गरजेचे आहे. महिलांना स्वत:तील उपजत गुण शोधण्यासाठी उपयुक्त अशी आणि त्यांना सबलीकरणासाठी उद्योजकतेची प्रेरणा देईल.

**संदर्भ**

१) निमकर आशिष सुधाकर, 'अर्थसंवाद', खंड ४०, ऑक्टोबर-डिसेंबर २०१६, पृ. २६६.

२) पवार कल्पना, 'उद्योजक', ऑक्टोबर २०१२, पृ. ३५.

३) भामरे संजय व्ही., 'महिलांचे सामाजिक सांस्कृतिक योगदान', अथर्व पब्लिकेशन, जळगाव, आवृत्तीः नोव्हेंबर २०१३, पृ. ९०.

४) मृणाली एम. यु., महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२, पृ. ४८ ते ५६.

५) शिंदे अशोकराव, 'सरकार महाराष्ट्रातील तेजस्वी स्त्री रत्ने', पुणे.

६) १०१ श्रेष्ठ महिला संक्षिप्त चरित्र आणि विचारधन, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

७) Sobyasachi Das – Self Help Groups and Micro Credit Synergic Integration, Kurukshetra, Vol 51, No 10, 2003.

◆

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/आर. बी. भांडवलकर गजानननगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | आर. बी. भांडवलकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | गजानननगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | विद्यापीठ क्वार्टर्स, डी ३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी आर. बी. भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**आर. बी. भांडवलकर**
मुद्रक व प्रकाशक

# अर्थसंवाद
# (खंड ४३, २०१९-२०)

## अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | नामदार गोखलेंच्या आर्थिक विचारांची सद्य:कालीन यथार्थता | ५-१५ |
| २. | महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पपूर्तीतील प्रदीर्घ विलंब व प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनातील त्रुटी आणि समस्या: स्थल वास्तव परिप्रेक्षातून पुनर्वसन नियोजनार्थ संक्षिप्त टिपण | १६-४२ |
| ३. | स्थानिक व स्थलांतरित संघर्षाचे सैध्दांतिक विश्लेषण | ४३-४७ |
| ४. | महाराष्ट्रातील शालेय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा | ४८-५४ |
| ५. | विकास दृष्टिकोनातून सार्वजनिक अंदाजपत्रक : विशेष संदर्भ केंद्रीय आणि महाराष्ट्र अंदाजपत्रक २०१९-२० | ५५-५९ |
| ६. | पुस्तक परिचय 'मोदीनॉमिक्स' | ६०-६४ |
| ७. | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची समर्पकता : निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा | ६५-६७ |
| ८. | भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनरावलोकन - निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा | ६८-७० |
| ९. | 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान -निबंध लेखकांसाठी विषय रुपरेषा | ७१-७३ |
| १०. | डॉ. नी. भा. सप्रे | ७४-७६ |
| ११. | प्रतिक्रिया : पाणी विपणन : एक उद्‌बोधन | ७७-७८ |
| १२. | अर्थ शब्दांची वाट पाहे : डिपॉप्युलेशन | ७९-८० |
| १३. | अर्थ शब्दांची वाट पाहे : सस्टेनेबल डेव्हलपमेंट | ८१ |
| १४. | संपादकीय | ८९-९० |
| १५. | पैसा आणि सामान्य असमतोल: सैद्धांतिक आणि वास्तव परिस्थितीजन्य परिप्रेक्ष्य | ९१-१२४ |
| १६. | लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांताशी मतदार वर्तणुकीची फारकत : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमा व चलांवरील द्विदशक आकडेवारीचे तुलनात्मक निष्कर्ष | १२५-१४० |
| १७. | स्टार्टअप उपक्रमांची भारतामधील आव्हाने : काही निरीक्षणे | १४८-१५० |
| १८. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - क्रांतिकारी विचारसरणीचे अर्थतज्ज्ञ | १५२-१६५ |
| १९. | बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे: सद्यस्थिती आणि भवितव्य | १६६-१६८ |

| | | |
|---|---|---|
| २०. | सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास | १६९-१७९ |
| २१. | दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी संकल्पना व वास्तव | १८०-१८४ |
| २२. | भारतातील आरोग्यावरील खर्चाचे विश्लेषण | १८५-१९९ |
| २३. | महाराष्ट्रातील महिलांची सद्यस्थिती व आव्हाने | २००-२०७ |
| २४. | महाराष्ट्रातील बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : वस्तुस्थिती आणि विशिष्ट समूहाचा दारिद्र्य निर्देशांक काढण्याची गरज | २०८-२१६ |
| २५. | आरोग्याचे अर्थशास्त्र | २१७-२२८ |
| २६. | भारतातील मंदी-२०१९-२० : कारणे व उपायांचे विश्लेषण | २२९-२३६ |
| २७. | २०१९ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक दारिद्र्याशी लढा देणाऱ्या संशोधनाला | २३७-२४८ |
| २८. | राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तत्कालीन इंदूर राज्याच्या विकासातील योगदान | २४९-२६५ |
| २९. | सामाजिक समावेशक शिक्षण आणि विकास कृतिशील धोरणकर्ता : छ. शाहू महाराज | २६६-२७३ |
| ३०. | भारतातील बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची सुवर्ण महोत्सवी ५० वर्षे | २७४-२८३ |
| ३१. | पुस्तक परिचय : 'लोकसंख्याशास्त्र' २०१९ | २८४-२८५ |
| ३२. | अर्थ शब्दांची वाट पाहे... : जागतिक भूक निर्देशांक | २८६-२८७ |
| ३३. | प्रतिक्रिया - अर्थसंवाद | २८८-२८९ |
| ३४. | अहवाल | २९०-२९६ |
| ३५. | संपादकीय | २९७-२९८ |
| ३६. | केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ : शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण योजनांवर दृष्टिक्षेप | २९९-३०४ |
| ३७. | स्थलांतराचे अर्थशास्त्र | ३०५-३१६ |
| ३८. | प्रादेशिक असमतोल आणि भारताची बदलती संघराज्य व्यवस्था | ३१७-३३१ |
| ३९. | भारतीय अर्थव्यवस्था - मंदीच्या उंबरठ्यावर ? | ३३२-३३७ |
| ४०. | अनुसूचित जातीतील महिलांची आर्थिक स्थिती | ३३८-३४४ |
| ४१. | महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | ३४५-३५२ |
| ४२. | स्त्री-पुरुष समानता - काळाची गरज | ३५३-३५९ |
| ४३. | लिंगभावसापेक्ष अर्थसंकल्प (जेंडर बजेट) : भारतातील उपयोजन आणि आढावा | ३६०-३६६ |
| ४४. | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या एक चिंतन | ३६७-३६६ |
| ४५. | महिलांचे स्वावलंबन आणि स्त्री उद्योजकता | ३७४-३८१ |

# अर्थसंवाद
# (खंड ४३, २०१९-२०२०)

**ब) लेखक सूची**


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | समित ल. माहोरे | ५-१५ |
| २. | ज्ञानदेव तळुले, विजय ककडे, महादेव देशमुख | १६-४२ |
| ३. | अविनाश कुलकर्णी | ४३-४७ |
| ४. | तृप्ती कवाळे | ४८-५४ |
| ५. | पी. एस. कांबळे | ५५-५९ |
| ६. | मंजुषा मुसमाडे | ६०-६४ |
| ७. | अविनाश निकम | ६५-६७ |
| ८. | विकास विनायक सुकाळे | ६८-७० |
| ९. | एस. एस. कावळे | ७१-७३ |
| १०. | संतोष दास्ताने | ७४-७६ |
| ११. | शि. ना. माने | ७७-७८ |
| १२. | शि. ना. माने | ७९-८० |
| १३. | जे. एफ. पाटील | ८१-८८ |
| १४. | राहुल शं. म्होपरे | ८९-९० |
| १५. | राजस परचुरे, ज्ञानदेव तळुले | ९१-१२४ |
| १६. | ज्ञानदेव तळुले, राजस परचुरे | १२५-१४० |
| १७. | डॉली सनी | १४८-१५० |
| १८. | विलास आढाव | **१५२-१६५** |
| १९. | धनश्री महाजन | १६६-१६८ |
| २०. | जी. एस. कांबळे | १६९-१७९ |
| २१. | उमेश मधुकर राजदेरकर | १८०-१८४ |
| २२. | रामदास यशवंतराव माहोरे | १८५-१९९ |
| २३. | सुभाष पाटील | २००-२०७ |
| २४. | नंदकुमार बाबुराव बोधगिरे | २०८-२१६ |
| २५. | रामदास यशवंतराव माहोरे | २१७-२२८ |

| | | |
|---|---|---|
| २६. | श्रीनिवास खांदेवाले | २२९-२३६ |
| २७. | प्रशांत हरमकर | २३७-२४८ |
| २८. | जे.एस.इंगळे | २४९-२६५ |
| २९. | पी. एस. कांबळे | २६६-२७३ |
| ३०. | गजानन भा. पाटील | २७४-२८३ |
| ३१. | मंजुषा मुसमाडे | २८४-२८५ |
| ३२. | जे. एफ. पाटील | २८६-२८७ |
| ३३. | शि. ना. माने | २८८-२८९ |
| ३४. | आर बी. भांडवलकर | २९०-२९६ |
| ३५. | राहुल शं. म्होपरे | २९७-२९८ |
| ३६. | तेजस्विनी बाजीराव मुडेकर | २९९-३०४ |
| ३७. | मंजुषा मुसमाडे | ३०५-३१६ |
| ३८. | सुनीती नागपूरकर | ३१७-३३१ |
| ३९. | अमृता सूर्यवंशी | ३३२-३३७ |
| ४०. | सीमा विश्वनाथ भोसले | ३३८-३४४ |
| ४१. | प्रतिभा एस. काळमेघ | ३४५-३५२ |
| ४२. | शोभा आर. पाटील | ३५३-३५९ |
| ४३. | युगंधरा एस. टोपरे | ३६०-३६६ |
| ४४. | नीता सुधाकर वाणी | ३६७-३६६ |
| ४५. | जयश्री दिलीप सरोदे | ३७४-३८१ |


**निवेदन : अर्थसंवाद वर्गणी**

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/- आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवून त्याची माहिती पोस्टाद्वारे संपादकांकडे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# अर्थसंवाद

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १. | पुस्तक परिचय 'मोदीनॉमिक्स' | ६०-६४ |
| २. | पुस्तक परिचय : 'लोकसंख्याशास्त्र' २०१९ | २८४-२८५ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १. | मंजुषा मुसमाडे, पुणे | ६०-६४ |
| २. | मंजुषा मुसमाडे, पुणे | २८४-२८५ |

**अर्थसंवाद अंकाचा तपशील : खंड - ४१**

| क्र. | अंक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १. | एप्रिल-जून २०१९ | ८६ |
| २. | जुलै-सप्टेंबर २०१९ | १२८ |
| ३. | ऑक्टोबर-डिसेंबर २०१९ | ७९ |
| ४. | जानेवारी-मार्च २०२० | ९२ |

जीवन ही एक परिक्षा आहे जिथे कोणताच अभ्यासक्रम नाही, प्रश्नपत्रिकादेखील सेट केलेली नाही एवढंच नाही तर तुमच्याकडे कोणत्याही उत्तरपत्रिकेचं आदर्श मॉडेलही नाही..

**- सुधा मुर्ती**

अशी कोणतीच गोष्ट नाही ज्या महिला करू शकत नाहीत

**- मिशेल ओबामा**

# मराठी अर्थशास्त्र परिषद


## कोविड-१९

**घाबरु नका... पण जागरुक रहा**

## हे करा....स्वत:ला व इतरांना सुरक्षित ठेवा

### कोविड-१९ संसर्गाची लक्षणे

खोकला । ताप । श्वासोच्छसाला अडथळा निर्माण होणे



साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुवा.




शिंकताना व खोकताना आपल्या नाकावर व तोंडावर रुमाल धरा.



सर्दी किंवा फ्ल्यू सदृश्य लक्षणे असलेल्या लोकांशी नजीकचा संपर्क टाळा.



मांस आणि अंडी पूर्णपणे शिजवून व उकडून घ्या.



जंगली अथवा पाळीव प्राण्यांशी निकट संपर्क टाळा.

## गर्दीच्या ठिकाणी शक्यतो जाणे टाळावे.

**अधिक माहितीसाठी आपल्या जवळील शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा.**

| राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. | राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. | टोल फ्री हेल्पलाईन क्र. |
|---|---|---|
| +91-11-23978046 | 020-26127394 | 104 |

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह | प्रमुख संपादक |
|---|---|---|---|
| रामदास य. माहोरे (नागपूर) | कैलास के. पाटील (परभणी) | रामदास बा. भांडवलकर (यवतमाळ) | राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर) |

सर्व कार्यकारिणी सदस्य - मराठी अर्थशास्त्र परिषद

जनहितार्थ प्रकाशित

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# ग्रामपंचायत सांजा

## ता. जि. उस्मानाबाद यांच्या वतीने

## सर्वांना



# आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या

## (८ मार्च)

# हार्दिक शुभेच्छा...

### शुभेच्छुक

सौ. अलका बापू सुर्यवंशी, सरपंच

श्री. संजय सुहास सुर्यवंशी, उपसरपंच

श्री. संभाजी तेगमपुरे, ग्रामविकास अधिकारी

सौजन्य : डॉ. मारोती वीरभद्र तेगमपुरे